सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, दि. १२ ऑक्टोबर २०२५ | वर्ष - तिसरे | अंक १८८ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### फटाक्यांच्या मुद्द्यावर केंद्र सरकार ॲक्शन मोडमध्ये



नवी दिल्ली : २० ऑक्टोबर रोजी भारत आणि जगभरात दिवाळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात एक मोठी आणि खास मागणी केली आहे. प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी कठोर नियम लागू असले तरी, मुलांना दिवाळी 'हिरव्या फटाक्यांसह' (ग्रीन क्रॅकर्स) पूर्ण उत्साहात साजरी करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी केंद्र सरकारने केली आहे. सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयाला विनंती केली की, आपल्या मुलांना दिवाळी पूर्ण उत्साहात आणि आनंदात साजरी करू द्या. हिरवे फटाके प्रदूषण कमी करतात आणि त्यांचा वापर पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित आहे, असे सरकारचे म्हणणे आहे .

### कर्नाटकात महिलांना मिळणार मासिक पाळीची भरपगारी सुट्टी

बेंगळुरू : महिलांच्या आरोग्याचा व कामाच्या ठिकाणी त्यांच्या सुसंवादाचा विचार करत कर्नाटक सरकारने एक ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. राज्यातील सर्व महिला कर्मचाऱ्यांना आता मासिक पाळीच्या काळात दरमहा एक दिवसाची भरपगारी सुट्टी मिळणार आहे. या निर्णयामुळे कर्नाटक हे संपूर्ण भारतातील पहिले असे राज्य ठरले आहे,जिथे सार्वजनिक आणि खाजगी दोन्ही क्षेत्रांतील महिलांना मासिक पाळीची सुट्टी देण्यात आली आहे. महिलांना मासिक पाळी दरम्यान होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक त्रासाचा विचार करून हा निर्णय घेण्यात आला आहे. कार्यालयीन कामकाजात सतत व्यस्त असणाऱ्या महिलांसाठी ही योजना मोठा दिलासा ठरणार आहे. या नव्या धोरणानुसार वर्षभरात महिलांना एकूण १२ भरपगारी सुट्ट्या मिळतील.

### २५१ पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त म्हणून घोषित

मुंबई, ११ ऑक्टोबर : राज्यात जून ते सप्टेंबर २०२५ या कालावधीत अतिवृष्टी, पूर आणि विविध नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या मोठ्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २५१ तालुके पूर्णतः तर ३१ तालुके अंशतः आपत्तीग्रस्त/अतिवृष्टीग्रस्त म्हणून घोषित करून आपत्तीमुळे बाधितांना विशेष मदत पॅकेज आणि विविध सवलती लागू केल्या आहेत.

# पंतप्रधान मोदींकडून ४२ हजार कोटींहून अधिक कृषी प्रकल्पांचे उद्घाटन

नवी दिल्ली, ११ ऑक्टोबर : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दूरस्थ प्रणालीच्या माध्यमातून ४२,००० कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या कृषी प्रकल्पांचे उद्घाटन आणि भूमिपूजन केले. यामध्ये २४,००० कोटी रुपयांच्या खर्चाची 'पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना' सुरू करण्यात आली असून, १०० आकांक्षित जिल्ह्यांमध्ये कृषी उत्पादन, सिंचन, कर्जप्राप्ती, पीक विविधीकरण आणि पश्चात हंगाम व्यवस्थापन सुधारण्याचा तिचा उद्देश आहे.

याशिवाय, ११,४४० कोटी रुपयांच्या 'डाळिंब (दलहन) आत्मनिर्भरता अभियानाचा' प्रारंभ करण्यात आला. या अभियानाचा उद्देश म्हणजे डाळींची उत्पादकता वाढवणे, लागवडीखालील क्षेत्राचा विस्तार करणे, पुरवठा साखळी मजबूत करणे आणि उत्पादनातील नुकसान कमी करणे.

पंतप्रधानांनी कृषी, पशुपालन, मत्स्य व्यवसाय व अन्न प्रक्रिया या क्षेत्रांमधील ५,४५० कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पांचे उद्घाटन केले, तसेच सुमारे ८१५ कोटी रुपयांच्या अतिरिक्त योजनांचे भूमिपूजनही केले.

सतत सुधारणा हवीच, -पंतप्रधान कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले, आज देशाची मानसिकता अशी झाली आहे की काही साध्य केले की समाधानी बसायचे नाही. आपल्याला सतत सुधारणा कराव्याच लागतील आणि प्रत्येक क्षेत्रात प्रगती करावी लागेल.

पंतप्रधान धन-धान्य कृषी योजना ही याच विचारधारेचे प्रतिबिंब आहे. त्यांनी सांगितले की ही योजना आकांक्षित जिल्हा योजनांच्या यशावर आधारित आहे आणि आज हे जिल्हे अनेक निकषांवर इतर जिल्ह्यांपेक्षा चांगली कामगिरी करत आहेत.

जिल्ह्यांची निवड विचारपूर्वक

या योजनेसाठी १०० जिल्ह्यांची निवड अत्यंत अभ्यासपूर्ण पद्धतीने करण्यात आली आहे. शेतीतील उत्पादन, एकाच जमिनीवर वर्षभरात होणारी लागवड आणि शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कर्ज व गुंतवणुकीची उपलब्धता - या तीन प्रमुख निकषांवर ही निवड झाली आहे.

पंतप्रधान म्हणाले, या योजनेत आम्ही ३६ शासकीय योजनांना एकत्र आणत आहोत. यामध्ये पशुधनावरही विशेष भर दिला जाणार आहे. या योजनेची जबाबदारी युवा अधिकाऱ्यांवर देण्यात येणार आहे.

शेती बदलली, की गावाची अर्थव्यवस्था बदलते

यावेळी मोदी म्हणाले की, माझा विश्वास आहे की युवा अधिकारी आणि शेतकरी एकत्रितपणे देशातील १०० जिल्ह्यांमध्ये शेतीचे चित्र बदलतील. एकदा एखाद्या गावातील शेती सुधारली की संपूर्ण गावाची अर्थव्यवस्था बदलते.

'डाळिंब आत्मनिर्भरता मिशन' बाबत त्यांनी सांगितले की, हे केवळ डाळींचे उत्पादन

# ठाकरे केवळ पक्षाला चर्चेत ठेवण्यासाठी रस्त्यावर उतरत आहेत : फडणवीस



मुंबई, ११ ऑक्टोबर - जेव्हा उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होते, तेव्हा त्यांनी अशाच कृषी संकटात पुरेसा दिलासा दिला होता का? त्यांच्या कार्यकाळात दिलेल्या भरपाईच्या पार्श्वभूमीवर अशा मोर्चाचे नेतृत्व करण्याचा त्यांचा अधिकार संशयास्पद आहे. ठाकरे हे केवळ आपल्या पक्षाला चर्चेत ठेवण्यासाठी रस्त्यावर उतरत आहेत. त्यांनी स्वतःला आरशात पाहावे आणि वास्तवाची जाणीव करून घ्यावी. त्यानंतर ते असे कोणतेही मोर्चे काढणार नाहीत, अशी टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.

शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने आज, शनिवारी छत्रपती संभाजीनगरात विविध मागण्यांसाठी हंबरडा मोर्चा काढला. त्यावर प्रतिक्रिया देताना फडणवीस बोलत होते. फडणवीस यांनी महाविकास आघाडी सरकारच्या काळात केलेल्या घोषणांची आठवण करून दिली. उद्धव ठाकरे यांनी शेतकऱ्यांसाठी २०,००० कोटी रुपयांची कर्जमाफी जाहीर केली होती. मात्र, त्यांनी फुटकी कवडी शेतकऱ्यांना दिली नाही, असा आरोप फडणवीस यांनी केला. परंतु भाजपाच्या नेतृत्वाखालील सरकारने ठाकरे यांच्या निर्णयाच्या तीन वर्षांपूर्वीच अशीच कर्जमाफी लागू केली होती. त्यांनी काहीही विशेष केले नाही. त्यांनी चालू खातेधारकांसाठी ५०,००० रुपये जाहीर केले, पण एक पैसाही खर्च केला नाही. जेव्हा आमचे सरकार आले, तेव्हा आम्ही १६ लाख शेतकऱ्यांची देणी साफ केली. सध्याच्या राज्य सरकारने शेतकऱ्यांसाठी ३१,००० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे आणि सुमारे २१,००० कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातील. आम्ही उद्धव ठाकरे यांनी त्यांच्या सरकारमध्ये जे काही केले त्यापेक्षा जास्त देत आहोत. याशिवाय, राज्य आणि केंद्र सरकार प्रत्येकी ६,००० रुपये देत आहे - म्हणजे एकूण १२,००० रुपये, तसेच विमा परतावाही मिळत आहे.

# कैद्यांना तुरुंगात मतदानाचा हक्क मिळणार?

## सर्वोच्च न्यायालयाने बजावली नोटीस

नवी दिल्ली : तुरुंगात असलेल्या विचाराधीन कैद्यांना मतदानाचा अधिकार मिळावा यासाठी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं केंद्र सरकारकडून उत्तर मागितलं आहे. ही याचिका वकील डॉ. सुनीता शर्मा यांनी दाखल केली होती आणि नुकतेच वकील प्रशांत भूषण यांनी सरन्यायाधीश बी.आर. गवई यांच्यासमोर त्यावर सुनावणी केली. या याचिकेत म्हटलं आहे की मतदानाचा अधिकार हा लोकशाहीचा पाया आहे. याचिकाकर्त्याचं म्हणणं आहे की भारत हा एक लोकशाही देश आहे, जिथं प्रत्येक नागरिकाला सरकार निवडण्याचा समान अधिकार आहे. संविधानाच्या कलम ३२६ मध्ये स्पष्टपणे म्हटलं आहे की प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार आहे. मात्र लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ च्या कलम ६२(५) नुसार तुरुंगात असलेल्या सर्व व्यक्तींना, दोषी ठरवले गेलेलं असोत किंवा नसोत, मतदान करण्यापासून बंदी आहे. ही संपूर्ण बंदी संविधानाच्या कलम १४ आणि २१ चं उल्लंघन करते. याचिकेत म्हटलं आहे की देशभरातील १,३३० तुरुंगांमध्ये अंदाजे ४.५ लाख कैदी आहेत, त्यापैकी ७५ टक्क्यांहून अधिक विचाराधीन आहेत. यापैकी अनेक व्यक्ती वर्षानुवर्षे खटल्याच्या प्रलंबित काळापासून तुरुंगात आहेत. म्हणून, त्यांचा गुन्हा सिद्ध न होता त्यांना मतदानाचा अधिकार नाकारणं हे निर्दोषतेच्या गृहीतकाच्या तत्त्वाचं उल्लंघन करतं. याचिकेत असंही म्हटलं आहे की भारतीय दंड संहिता किंवा नवीन न्यायिक संहितेत कैद्यांचा मतदानाचा अधिकार रद्द करणारी कोणतीही तरतूद नाही.

# आणखी किती वेळा हंबरडा फोडणार - एकनाथ शिंदे

मुंबई, ११ ऑक्टोबर (हिं.स.) - मुख्यमंत्रिपदाची खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला, खासदार पडले तेव्हा हंबरडा फोडला आणि विधानसभा निवडणुकीत आमदार पडले, तेव्हा हंबरडा फोडला, आता आणखी किती वेळा हंबरडा फोडणार आहात, असा सवाल करीत उपमुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांनी ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित हंबरडा मोर्चावर टीका केली.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आमच्या पॅकेजवर टीका करणारे उद्धव ठाकरे हे पैठण येथे आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला भेटायला गेले, तेव्हा ते एक लाख रुपयांचा धनादेश देणार होते, असे शेतकऱ्यांना सांगण्यात आले होते. मात्र त्या शेतकऱ्याला एक फुटकी कवडीही त्यांनी दिली नाही. तुम्ही मुख्यमंत्री होता, तेव्हाही तुम्ही शेतकऱ्यांना मदत केली नाही. नुसतेच रिकाम्या हाताने येता. त्यामुळे हंबरडा फोडायचा असेल, तर मुंबई हातून गेली की मग फोडा. जेव्हा कोणी बरोबर राहिले नाही, तेव्हाही तुम्ही तो फोडला होता. म्हणूनच शेतकऱ्यांनी तुम्हाला घरी बसविल्याची टीका शिंदे यांनी केली.

मला फक्त बाळासाहेब ब्रँड माहिती आहे, इतर कोणताही ब्रँड माहिती नाही, महापालिका निवडणुकीत महायुतीलाच यश मिळेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. कधी घराचा उंबरठा न ओलंडणारे आता हंबरडा



फोडत आहेत. जेव्हा द्यायची वेळ होती तेव्हा आमचे हात रिकामे आहेत-रिकामे आहेत असंच यांचं सुरू होतं. राज्यातील शेतकरी संकटात आहे, त्यांच्या डोळ्यात अश्रू आहेत, या वेळेस कोणी राजकारण करू नये असं आवाहन एकनाथ शिंदे यांनी केलं. यांना हे उशिरा सुचलेलं शहाणपण आहे. आम्ही शेतकऱ्यांच्या बांधा-बांधावर आम्ही जाऊन आलो. प्रत्यक्ष जाऊन तिथली परिस्थिती आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू आम्ही पाहिले आणि त्यावेळेस आम्ही ठरवलं की शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभ राहायचं. म्हणून आम्ही एनडीआरएफचे निकष असतील, अटीशर्ती असतील त्या सर्व बाजूला ठेऊन मोठ्या प्रमाणात भरीव देण्याचं ठरवलं. शेतकऱ्यांच्या डोळ्यातले अश्रू पुसण्याचं काम आम्ही केलं याच मला समाधान आहे. आम्ही ३२ हजार कोटींचं पॅकेज जाहीर केलं, आम्ही म्हणालो होतो की, शेतकऱ्यांची दिवाळी आम्ही काळी होऊन देणार नाही, दिवाळीपूर्वी त्यांच्या खात्यात पैसे जमा होऊ लागले आहेत. आम्ही ४७ हजार हेक्टरी मदत केली, जमीन खरडून गेलेल्या लोकांना पुन्हा मनरेगाच्या माध्यमातून ३ लाख रुपये हेक्टरी असे ३ लाख ४७ हजार रुपये मदत केली. आतापर्यंतच्या इतिहासात इतकी मदत शेतकऱ्याला कधीच मिळाली नव्हती.

शेतकऱ्यांची चिंता आम्ही मिटवली. हे करत आहेत ते निव्वळ राजकारण आहे. तुम्ही शेतकऱ्यांच्या बांधावर जाताना शेतकऱ्याच्या पोराच्या डोळ्यातले अश्रू पाहून त्याच्या हातात बिस्कीटचा पुडा तरी ठेवला का? आम्ही मोठं मोठे किट पाठवले, त्यांचा दसरा चांगला झाला, दिवाळी ही त्यांची चांगली होईल हे आम्ही पाहिलं. हा कसला हंबरडा मोर्चा? हे उंबरठा न ओलांडणारे आता हंबरडा फोडायला लागलेत. सत्ता गेली तेव्हा हंबरडा फोडला, खुर्ची गेली तेव्हा हंबरडा फोडला. हे पुतना मावशीचं प्रेम आहे, हे निव्वळ शेतकऱ्यांच्या नावावर केलेले राजकारण आहे.

# जिल्हा परिषदेवर भाजपाचा झेंडा फडकवणार - खा. अशोकराव चव्हाण

किनवट प्रतिनिधी दि.११ : आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर किनवट तालुक्यातील सारखणी येथे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या अध्यक्षते खाली भारतीय जनता पक्षाची आढावा बैठक व भव्य पक्ष प्रवेश सोहळा आयोजित करण्यात आला. यावेळी खा. अशोकराव चव्हाण यांच्यासह आ. भिमराव केराम, माजी आमदार अमरनाथ राजुरकर यांची देखिल प्रमुख उपस्थिती होती.



किनवट माहुर विधानसभा क्षेत्राच्या दौ-यावर असलेले खा. अशोकराव चव्हाण यांनी आगामी काळातील जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगर परिषद निवडणुकीच्या अणुषंगाने कार्यकर्ते व पदाधिकारी यांच्यात उत्साह निर्माण होईल असे मार्गदर्शन केले तर यावेळी बोलतांना त्यांनी केंद्रसरकार व राज्य सरकारने शेतकरी, कष्टकरी तसेच गरजवंत व्यक्तीसह समाजातील शेवटच्या घटका पर्यंत लाभ पोहचवले या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले ज्यामध्ये नुकतेच अतिवृष्टीग्रस्त शेतक-यांचे मदत पॅकेज असो, अनुकंपाधारकांचे राज्यातील वेटींगलिस्ट क्लिअर करुन सर्वांना नियुक्तीचे आदेश देऊन शासकीय नोकरीत सामावुन घेणे असो कि, केंद्र सरकारने जि.एस.टी दरांमध्ये केलेली कमतरता असो अशा विविध लाभकारी योजनांची माहिती यावेळी खा. चव्हाण यांनी दिली तर यावळे त्यांनी पक्षातील कार्यकर्त्यांना सांगितले कि, जनतेमध्ये राहणा-या कार्यकर्त्यांला आपण उमेदवारी देऊ व जे त्या भागातील जनता सांगेल त्याच पदाधिका-याला आपण उमेदवारी देऊ अशी त्यांनी यावेळी घोषणा केली व ज्या भागातुन कार्यकर्ते चांगले काम करुन उमेदवार विजयी करुन पाठवती त्यांना आपण योग्य ते बक्षिस देऊ असे त्यांनी यावेळी अध्यक्षिय भाषणात जाहीर केले.

कार्यक्रमामध्ये भाजपा नेते सुधाकर भोयर, जिल्हाध्यक्ष ड. किशोर देशमुख, दिनकर चाडावर, नारायणराव सिडाम, डॉ देवसरकर, दिनकर दहिफळे, किशोर स्वामी, जिल्हा उपाध्यक्ष संदिप केंद्रे, सौ. संध्या राठोड, प्रा. किसन मिरासे, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव नेम्मानिवार, अनिल तिरमनवार, दिपक नेम्मानिवार, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, नविन राठोड, बाबुराव केंद्रे, नारायण श्रीमनवार, सुर्यकांत अरडकर, श्रीनिवास नेम्मानिवार, स्वागत आयनेनिवार, गोपु महामुणे, यशवंत क-हाळे, रमेश बद्दीवार, उमाकांत क-हाळे, बाळकृष्ण कदम, निलकंठ मस्के, शेखर चिंचोलकर, सागरताई शिंदे, उशाताई धात्रक, भावना दिक्षित, पुनम दिक्षित, गंगुबाई परेकर, अनुजा किरण पाटील नेम्मानिवार, विभिषण पाळवदे, काशिनाथ शिंदे, विवेक केंद्रे, सागर पिसारीवार, यशवंत जाधव, विद्या पाटील, शिवाजी आंधळे, सतिष बिराजदार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आंध्र प्रदेशात उभारणार आशियातील सर्वात मोठा डेटा सेंटर

## 'गुगल' ची १० अब्ज डॉलर्सची मेगा गुंतवणूक

विशाखापट्टणम : टेक कंपनी गूगल भारताच्या डिजिटल क्षेत्रात आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक करणार आहे. कंपनी आंध्र प्रदेशातील विशाखापट्टणम येथे आशिया खंडातील सर्वात मोठे डेटा सेंटर क्लस्टर उभारणार आहे. या प्रकल्पात कंपनी सुमारे १० अब्ज डॉलर्स (सुमारे ८,७३० कोटी रुपये) गुंतवणार आहे. गूगल विशाखापट्टणममध्ये १ गिगावॉट (१ ऋथ) क्षमतेचा मेगा डेटा सेंटर क्लस्टर स्थापित करणार आहे. हा प्रकल्प केवळ भारतासाठीच नव्हे, तर संपूर्ण आशिया खंडातील सर्वात मोठा डेटा हब ठरणार आहे.

रिपोर्ट्सनुसार, हा क्लस्टर तीन वेगवेगळ्या कॅम्पसमध्ये विकसित केला जाईल. यामध्ये विशाखापट्टणम जिल्ह्यातील अदाविवरम आणि तरलुवाडा, तसेच अनकापल्ली जिल्ह्यातील रामबिल्ली यांचा समावेश असेल. गुगलचा हा महत्त्वाकांक्षी डेटा हब प्रकल्प जुलै २०२८ पर्यंत पूर्णपणे कार्यान्वित होण्याची अपेक्षा आहे. गुगलची ही १० अब्ज डॉलर्सची मेगा गुंतवणूक केवळ डेटा सेंटरच्या उभारणीपुरती मर्यादित नाही. या प्रकल्पात तीन उच्च क्षमतेच्या सबमरीन केबल्स, केबल लँडिंग स्टेशन, मेट्रो फायबर नेटवर्क आणि अत्याधुनिक दूरसंचार पायाभूत सुविधांचे देखील बांधकाम केले जाईल. या प्रकल्पामुळे आंध्र प्रदेशला 'डेटा इन्फ्रास्ट्रक्चर हब' बनवण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडणार आहे.

आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू आणि गूगल यांच्यात डिसेंबर२०२४ मध्ये सामंजस्य करार झाला होता. त्यानंतर राज्य सरकारने 'डेटा सिटी' विकासाला गती देण्यासाठी आयटी आणि कॉपीराईट कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची प्रक्रिया सुरू केली आहे.

# फिजिओथेरपी ही समकालीन काळाची गरज : मंत्री अतुल सावे

### एमजीएममध्ये 'फिजिकॉन २०२५' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन संपन्न


छत्रपती संभाजीनगर, दि.११ : फिजिओथेरपी हे क्षेत्र आज सर्वांच्या जीवनातील एक महत्वाचा भाग बनले आहे. आज खेळाडू, कलाकार आणि इतर क्षेत्रातील मान्यवर असतील त्यांच्यासमवेत कायम एक व्यक्ती आपणास पाहायला मिळतो, तो व्यक्ती म्हणजे 'फिजिओथेरपिस्ट' होय. या क्षेत्राचे महत्व दिवसेंदिवस वाढत असून फिजिओथेरपी ही सध्याच्या काळाची गरज बनली असल्याचे प्रतिपादन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी यावेळी केले.

एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी आणि एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी यांच्या संयुक्त विद्यमाने 'एमजीएम फिजिकॉन २०२५' या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय फिजिओथेरपी परिषदेचे आज महाराष्ट्र राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत रुक्मिणी सभागृह येथे उद्घाटन संपन्न झाले. यावेळी, मंत्री श्री.सावे यांनी उपस्थितांशी संवाद साधला.

या उद्घाटन सोहळ्यास एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम, एमजीएम इंस्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेसचे कुलगुरू डॉ.शशांक दळवी, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, सर्चचे सहसंचालक डॉ. आनंद बंग, वैद्यकीय अधिक्षिका डॉ.अपर्णा कक्कड, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, प्राचार्य डॉ. सरथ बाबू, प्राचार्य डॉ.रिंकल मलानी आणि संयोजक डॉ.प्रेरणा दळवी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत.

पुढे बोलताना मंत्री श्री.सावे म्हणाले, भारत आणि जगभरातून आलेल्या सर्व फिजिओथेरपी क्षेत्रातील तज्ञ मंडळींचे मी छत्रपती संभाजीनगर या ऐतिहासिक शहरात मनापासून स्वागत करतो. फिजिओथेरपी क्षेत्रात आता अत्याधुनिक तंत्रज्ञान आलेले असून यामुळे रुग्ण लवकर बरा होण्यास मदत होत आहे. एमजीएमचे मी विशेष अभिनंदन करतो की, त्यांनी या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आपल्या शहरात आयोजन केले.

आधीच्या काळात सर्व हालचाली या कामाच्या माध्यमातून होत असत मात्र, या बदलत्या काळामध्ये बसून काम होत आहे. या काळामध्ये फिजिओथेरपीचे महत्व वाढलेले आहे. फिजिओथेरपीने आरोग्य क्षेत्रात फार मोठी जागा घेतलेली आहे. आरोग्य चांगळे ठेवायचे




असेल तर माफक व्यायाम करणे आवश्यक असल्याचे एमजीएमचे सचिव अंकुशराव कदम यांनी यावेळी बोलताना सांगितले.

या परिषदेत देश आणि विदेशातील सहभागी तज्ञ मंडळींची नावे खालीलप्रमाणे आहेत :

१. डॉ.आनंद बंग, सह संचालक, सोसायटी फॉर एज्युकेशन, ॲक्शन अँड रिसर्च इन कम्युनिटी हेल्थ, गडचिरोली, महाराष्ट्र २. डॉ.सौरभ शर्मा, संशोधक, पेन मॅनेजमेंट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, फॅकल्टी ऑफ मेडिसिन अँड हेल्थ, युनिव्हर्सिटी ऑफ सिडनी, ऑस्ट्रेलिया ३. डॉ.करेन फिट, व्याख्याता, युनिव्हर्सिटी ऑफ मेलबर्न, ऑस्ट्रेलिया ४. डॉ. सिंथिया स्रीकेसावन, संशोधक, ऑर्थोपेडिक्स, रुमॅटॉलॉजी आणि मस्क्युलोस्केलेटल सायन्सेस विभाग, युनिव्हर्सिटी ऑफ ऑक्सफर्ड, युनायटेड किंगडम ५. डॉ.मरिया जियांदानी, प्राध्यापक, कार्डिओ-रेस्पिरेटरी फिजिओथेरपी विभाग, पी. टी. स्कूल अँड सेंटर, सेठ जी.एस. मेडिकल कॉलेज, मुंबई ६. डॉ. अशोकन अरुमुगम, प्राध्यापक, फिजिओथेरपी विभाग, कॉलेज ऑफ हेल्थ सायन्सेस, युनिव्हर्सिटी ऑफ शारजाह, संयुक्त अरब अमिरात ७. डॉ.प्रभात रंजन, प्राध्यापक, फिजिओथेरपी विभाग, अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था, नवी दिल्ली ८. डॉ.आर. वसन्थन, प्राचार्य, द ऑक्सफर्ड कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, बेंगळुरू, कर्नाटक ९. डॉ.प्रशांत मुक्कन्नावर, प्राचार्य, के. एल. ई. कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, हुबळी, कर्नाटक १०. डॉ.इर्शाद कुरेशी, प्राचार्य, रवी नायर फिजिओथेरपी कॉलेज, डीएमआयएचईआर, वर्धा, महाराष्ट्र ११. डॉ.विजय कुमार, प्राध्यापक, क्रीडा फिजिओथेरपी विभाग, मॉडर्न कॉलेज ऑफ फिजिओथेरपी, पुणे, महाराष्ट्र १२. डॉ.हरप्रीत सिंग, प्राध्यापक, न्युरॉलॉजी विभाग, भारतीय आयुर्विज्ञान संस्था (-खखचड), नवी दिल्ली १३. डॉ.कपिल गर्ग, प्राध्यापक, मस्क्युलोस्केलेटल फिजिओथेरपी विभाग, इन्स्टिट्यूट ऑफ फिजिओथेरपी, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र १४. डॉ.अश्विन क्षीरसागर, प्राध्यापक, क्रीडा फिजिओथेरपी विभाग, एमजीएम स्कूल ऑफ फिजिओथेरपी, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र १५. डॉ. चिराग वर्मा, संचालक व मुख्य प्रशिक्षक, अकॅडमी ऑफ एक्सरसाइज हेल्थ अँड थेरपी, नवी दिल्ली १६. डॉ.युवराज सिंह, क्रीडा फिजिओथेरपिस्ट, डी. वाय. पाटील स्पोर्ट्स अँड हाय-परफॉर्मन्स सेंटर, नवी मुंबई 'एमजीएम फिजिकॉन २०२५' ही आंतरराष्ट्रीय परिषद शनिवार, दिनांक ११ ऑक्टोबर २०२५ आणि रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ असे दोन दिवस असणार आहे. 'इम्पावरिंग मुव्हमेंट' या अर्थपूर्ण संकल्पनेवर आधारित या परिषदेचा उद्देश फिजिओथेरपी या मानवी शरीराच्या हालचाली पुनर्स्थापित करणाऱ्या आणि बळकट करणाऱ्या विज्ञानाच्या नव्या दिशांना अधोरेखित करणे हा आहे.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचा लातूर जिल्हा दौरा

**तभा वृत्तसेवा**
**लातूर, दि.११ ऑक्टोबर -**

राज्याचे सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट हे ११ ऑक्टोबर रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर असतील. दौऱ्याचे कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहेत.

सकाळी ११.३० वा. लातूर विमानतळावर आगमन, सकाळी ११.४५ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, लातूर येथे आगमन व सत्कार, दुपारी १२ वा. मोटारीने अहमदपूरकडे प्रस्थान, दुपारी १२.४५ वा. अहमदपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा सुशोभिकरण कामाची पाहणी. दुपारी १ वा. काळेगावकडे प्रस्थान, दुपारी १.१५ वा. काळेगाव, तक्षशीला बुद्ध विहार येथे वर्षावास सोहळा व तथागत बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण दुपारी २.१५ वा. अहमदपूरकडे परतीचा प्रवास. दुपारी २.३० वा. गोपीनाथराव जोंधळे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट, दुपारी २.४५ वा. माजी नगरसेवक डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट, दुपारी ३ वा. लातूरकडे प्रस्थान, दुपारी ३.४५ वा. लातूरहून विमानाने मुंबईकडे प्रस्थान

हा दौरा सामाजिक न्याय क्षेत्रातील विविध उपक्रमांचे मूल्यांकन व स्थानिक जनतेशी संवाद साधण्याचा उद्देश घेऊन आयोजित करण्यात आला आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### गुजरातच्या शिष्टमंडळाची दयानंद विज्ञान महाविद्यालयास भेट

**लातूर, दि.११ ऑक्टोबर -**

गुजरात राज्याच्या शिक्षण विभागाच्या वतीने गुणवत्तावाढीच्या उद्देशाने देशातील नामांकित महाविद्यालयांच्या अभ्यास दौर्यात दयानंद विज्ञान महाविद्यालयाची निवड करण्यात आली. या अनुषंगाने भेसन (गुजरात) येथील शासकीय कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरविंद मयेत्रा, डॉ. पंकज सोलंकी, डॉ. विश्वजीत कावा व डॉ. हार्दिक राजगुरू यांनी दि. ८ व ९ ऑक्टोबर २०२५ रोजी महाविद्यालयाला भेट दिली. दौऱ्यादरम्यान शिष्टमंडळाने दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, शैक्षणिक विकास अधिकारी प्राचार्य डॉ. जयप्रकाश दरगड व प्र. प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्याशी गुणवत्ता वृद्धीबाबत चर्चा केली. या वेळी नवीन शैक्षणिक धोरण, नॅक पूर्वतयारी आणि आयक्यूएसी कार्यप्रणाली यावर सादरीकरण करण्यात आले. शिष्टमंडळाने महाविद्यालयातील विविध विभाग, प्रयोगशाळा, ग्रंथालय, वसतिगृह, एनएसएस, एनसीसी विभाग व क्रीडा सुविधा यांना भेट देऊन प्रशंसा व्यक्त केली. अभ्यास दौरा यशस्वीपणे पूर्ण झाल्यानंतर शिष्टमंडळाला सायंकाळी महाविद्यालयात निरोप देण्यात आला.



### रास्तभाव दुकानदार संघटनेच्या चाकूर तालुकाध्यक्षपदी माधव वाघ यांची निवड

**चाकूर, दि.११ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र राज्य रेशन व केरोसीन दुकानदार संघटनेच्या चाकूर तालुकाध्यक्षपदी माधव वाघ यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. ही निवड शासकीय विश्रामगृह, चाकूर येथे झालेल्या बैठकीत जिल्हाध्यक्ष ज्ञानोबा जरीपटके यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर करण्यात आली. या बैठकीत उपाध्यक्ष विष्णूकांत तिकटे, सचिव नामदेव बुड्डे, कोषाध्यक्ष नानासाहेब धनशेट्टे, तसेच अनिल अलमले, उत्तमराव पाटील, बब्रुवान केसाळे, बंडू खांडेकर, तातेराव राठोड, एकबाल पठाण, भुजंग नाईकवाडे, सतीश जाधव, नबीसाब खुरेशी आदींची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. बैठकीत नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी जिल्हा सचिव सुरेश कांबळे यांच्यासह तालुक्यातील सर्व रास्तभाव दुकानदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या निवडीनंतर माधव वाघ यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून, त्यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे काम अधिक गतिमान होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

### सरन्यायाधीश गवई यांच्यावर हल्ल्याचा उदयगिरी परिवाराकडून निषेध

**उदगीर, दि.११ ऑक्टोबर -**

देशाचे सरन्यायाधीश माननीय न्यायमूर्ती गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय तर्फे तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या निषेध सभेत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजकुमार मस्के, उपप्राचार्य एस.जी. कोड, स्टाफ सेक्रेटरी प्रा.डॉ.ए.पी. मोरे, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. वक्ते प्रा.डॉ.जी.जी. जेवळीकर, प्रा. प्रवीण जाहुरे, प्रा.डॉ. दत्ताहरी होणराव यांनी हल्ला लोकशाहीसाठी धोकादायक असल्याचे सांगितले. सभेअंतर्गत सर्वांनी निषेध ठराव एकमताने मंजूर करून न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ ठेवण्याचा संकल्प व्यक्त केला.



### दयानंद विज्ञान महाविद्यालयात गांधी विचार संस्कार परीक्षेला प्रतिसाद

**लातूर, दि.११ ऑक्टोबर -**

दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद विज्ञान महाविद्यालय व गांधी रिसर्च फाऊंडेशन, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० ऑक्टोबर रोजी गांधी विचार संस्कार परीक्षा आयोजित करण्यात आली. महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा समन्वयक डॉ. नंदिनी कोरडे, प्रा. राहुल जाधव आणि ग्रंथपाल प्रा. किरण भिसे यांनी परीक्षेचे उत्तमरित्या आयोजन केले. एकूण ४४ विद्यार्थ्यांनी व प्राध्यापकांनी नाव नोंदणी केली होती, त्यापैकी २८ सहभागी झाले. परीक्षेचे उद्दिष्ट गांधी विचारांचा वारसा पुढील पिढीकडे पोहोचवणे आणि अहिंसक समाज निर्मितीचा संदेश प्रसारित करणे होते. या उपक्रमाला विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, तसेच महाविद्यालयात गांधी विचार समजून घेण्याचा मार्ग प्रशस्त झाला.

# शेतकऱ्यांच्या जीवनात नवी अडचण निर्माण होऊ नये यासाठी मदतीचा हात

## आ. अभिमन्यू पवार

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.११ ऑक्टोबर -**

सलग दोन महिन्यांच्या अतिवृष्टीमुळे औसा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असताना, शेतकऱ्यांच्या जीवनात नवी अडचण निर्माण होऊ नये या भावनेने आमदार अभिमन्यू पवार यांनी मोठा मदतीचा हात पुढे केला आहे.

सरकारने राज्यातील ९० लाख हेक्टरवरील बाधित शेतकऱ्यांना ३२ हजार कोटी रुपयांची ऐतिहासिक मदत जाहीर केली असून, औसा मतदारसंघातील सुमारे १,२०० शेतकऱ्यांना नुकसान झाले आहे. या शेतकऱ्यांना नव्याने उभारी मिळावी यासाठी आमदार पवार यांच्या पुढाकाराने क्रिएटिव्ह फाऊंडेशन व अभय भुतडा फाऊंडेशनच्या सहकार्याने १ कोटी २५ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. या मदतीचे वितरण १५ ऑक्टोबर रोजी करण्यात येणार आहे.

शासकीय विश्रामगृहात झालेल्या पत्रकार परिषदेत आ. पवार यांनी सांगितले की, शासनाची



आर्थिक मदत दिवाळीपूर्वीच वाटप करण्यात येईल. शेतकऱ्यांना नव्याने जनावरं घेण्यासाठी व संसार पुन्हा उभा करण्यासाठी ही मदत उपयुक्त ठरणार आहे.

बैल दगावला तर पुन्हा बैल घ्या, गाय गमावली तर गायच घ्या - हीच खरी मदतीची दिशा आहे, असे भावनिक आवाहन त्यांनी यावेळी केले.

पवार म्हणाले, शासनाकडून मिळणारी नुकसानभरपाई कोणतीही बँक थकबाकीच्या नावाखाली कपात करू शकत नाही, आणि अशा प्रकारच्या तक्रारी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे कराव्यात.

या पत्रकार परिषदेस बाजार समिती सभापती चंद्रशेखर सोनवणे, उपसभापती प्रा. भिमाशंकर राचट्टे, सुभाष जाधव, सुधीर पोतदार, प्रवीण कोपरकर, अक्रमखान पठाण, लहू कांबळे, कल्पना डांगे, शिवरुद्र मुर्गे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. पवार यांनी सांगितले की, 'औसा पॅटर्न' ही केवळ योजना नसून माणुसकीची प्रेरणादायी चळवळ आहे.

एक हात मदतीचा, विचार माणुसकीचा या मंत्राने दिवाळीपूर्वी सुमारे १२०० कुटुंबांच्या घरात नवजीवनाचा प्रकाश उजळणार आहे.

# वाळू चोरी करणाऱ्या सहा बोटी पकडल्या

**▶▶ महसूल विभागाची धडक कारवाई... ▶▶ वाळू माफियांचे धाबे दणाणले...**



**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.११ ऑक्टोबर -**

निलंगा आणि देवणी तालुक्यातील मांजरा नदीपात्रात महसूल विभागाने मोठी कारवाई करत वाळू चोरी करणाऱ्या सहा बोटी जप्त केल्या आहेत. या कारवाईनंतर परिसरातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.

राज्य शासनाने वाळू उपसा धोरणावर कायम स्वरूपी बंदी आणली असतानाही मांजरा नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा सुरू असल्याच्या तक्रारी जिल्हा प्रशासनाकडे पोहोचल्या होत्या. यावर जिल्हाधिकारी लातूर यांच्या आदेशानुसार गौण खनिज विभाग, निलंगा व देवणी महसूल आणि पोलीस प्रशासन यांनी गिरकचाळ व हेळंब परिसरात संयुक्त कारवाई केली.

गावकऱ्यांनी बोटीने वाळू उपसा होत असल्याचे व्हिडिओ महसूल आयुक्तांपर्यंत पोहोचवल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून देवणी व शिरूर अनंतपाळ पोलीस दलाने घटनास्थळी तैनाती ठेवली होती.

हद्दीच्या सीमावादामुळे गुन्हा नोंदणीबाबत थोडा गोंधळ निर्माण झाला होता; मात्र अखेरीस एक गुन्हा देवणी पोलीस स्टेशनमध्ये, तर दुसरा शिरूर अनंतपाळ पोलीस स्टेशनमध्ये नोंदविण्यात आला.

या संयुक्त कारवाईत जिल्हा गौण खनिज अधिकारी महेश राठोड, निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, देवणी तहसीलदार सोमनाथ वाडकर, नायब तहसीलदार कुलदीप देशमुख, पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर मुंडे, सहायक पोलीस निरीक्षक गायकवाड, पीएसआय वराडे, तसेच महसूल विभागाचे अधिकारी आणि मंडळ अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. अवैध वाळू उपसा करणाऱ्यांविरुद्ध कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा निलंगा तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिला आहे.

दरम्यान, सहा बोटी पकडण्यात आल्या असल्या तरी मांजरा आणि तेरणा नदीपात्रात इतर ठिकाणीही वाळू चोरी सुरू असल्याची चर्चा असून, पुढील कारवाईकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## विकास टू साखर कारखान्याकडून शेतकऱ्यांमध्ये नाराजी; दिवाळीपूर्वी साखर वाटपाची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**येरोळा, दि.११ ऑक्टोबर -**

शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शेतकरी वर्गात सध्या विकास टू साखर कारखान्याबाबत नाराजीचा सूर उमटू लागला आहे. कारखान्याकडून ऊसाला अपेक्षित दर न मिळाल्याने आणि दिवाळीच्या पार्श्वभूमीवर कोणताही गोडवा न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष दिसून येत आहे.



गेल्या २०२४-२५ च्या गाळप हंगामात विकास टू साखर कारखान्याने शेतकऱ्यांना प्रति टन ऊसाला २९६० रुपये भाव दिला होता, तर याच परिसरातील जागृती साखर कारखान्याने ३ हजार रुपये प्रति टन भाव देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला होता. त्यामुळे विकास टूच्या तुलनेत दरात ४० रुपयांचा फरक जाणवला.

याशिवाय, जागृती साखर कारखान्याने आपल्या सभासद शेतकऱ्यांना दरवर्षीप्रमाणे दिवाळीपूर्वी १५ किलो साखरेची बॅग कमी दरात वाटप करून गोडवा निर्माण केला. मात्र, विकास टू साखर कारखान्याकडून असा कोणताही उपक्रम हाती न घेतल्याने शेतकरी नाराज आहेत.

शेतकऱ्यांनी ऊस शेतीसाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली असून काहींनी २५ हजार रुपयांपर्यंत डिपॉझिट दिले आहे, तरीही अपेक्षित लाभ मिळत नाही, हे दुर्दैव असल्याचे शेतकरी म्हणत आहेत.

या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी दिवाळीपूर्वी साखर वाटपाची मागणी केली आहे.

## उजेड गावात पुरग्रस्त शेतकऱ्यांना जनावरांचा चारा वाटप

**कृष्णकांत चिटुपे यांच्या प्रयत्नांना यश**

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.११ ऑक्टोबर**

मांजरा नदीच्या महापुरामुळे उजेड गावातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले असून, शेतजमिनी खरडून गेल्या आणि जनावरांचा सर्व चारा पाण्याच्या प्रवाहात वाहून गेला. त्यामुळे जनावरांवर उपासमारीची वेळ आली होती. या गंभीर परिस्थितीत शेतकरी कृष्णकांत चिटुपे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून जनावरांच्या चाऱ्याची मागणी केली.

या पाठपुराव्याला अखेर यश मिळाले असून, १० ऑक्टोबर २०२५ रोजी उजेड गावात जिल्ह्यातील पहिल्या पुरग्रस्त लाभार्थी शेतकऱ्यांच्या जनावरांना शासनाकडून चारा वाटप करण्यात आले. यावेळी तहसीलदार किशोर यादव, एल.डी.ओ. शिवानंद मुकमवार, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शेख, मारोती हेंद्रे, सरपंच प्रतिनिधी आनंद जाधव, उपसरपंच फारुख पटेल, संतोष खांडेकर, सुभाष बिराजदार, संगमेश्वर पटणे आणि हणमंत गायकवाड यांच्या हस्ते चारा वाटप करण्यात आले. कृष्णकांत चिटुपे यांनी सांगितले की, काही शेतकऱ्यांना अद्याप या मदतीचा लाभ मिळालेला नाही; मात्र त्यांनाही न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासनाशी पुढील पाठपुरावा केला जाणार आहे.

या सामाजिक बांधिलकीच्या उपक्रमामुळे गावात मोठा दिलासा मिळाला असून, शासन, प्रशासन आणि प्रयत्नशील युवकांविषयी गावकऱ्यांनी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त केली आहे.

# राजमाने कुटुंबियांना डॉ. अरविंद भातांब्रे यांच्याकडून २१ हजारांची आर्थिक मदत

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.११ ऑक्टोबर -**

तालुक्यातील काटेजवळगा येथील वैजनाथ श्रीपती राजमाने वय ४५ वर्ष यांचे अतिवृष्टीच्या काळात ओढ्याला आलेल्या पूरात वाहून गेल्याने निधन झाले होते. या घटनेत घरातील कर्ता पुरुष गेल्याने राजमाने परिवारात दुःखाचे डोंगर कोसळले होते.

या कठीण प्रसंगी स्व. वैजनाथ राजमाने यांच्या काटेजवळगा येथील निवासस्थानी जाऊन त्यांच्या कुटुंबियांना निलंगा विधानसभा मतदार संघाचे काँग्रेस पक्षाचे नेते सामाजिक कार्यकर्ते डॉ. अरविंद भातांब्रे यांनी २१ हजार रुपयांची आर्थिक मदत केली. राजमाने कुटुंबियांना धीर दिला पुढील काळात कोणतीही अडचण असेल किंवा दवाखाना असेल आम्ही आपल्या सोबत आहोत असा शब्द राजमाने कुटुंबियांना दिला.



यावेळी काँग्रेस पक्षाचे औराद महसूल मंडळ निरीक्षक ॲड. संदीप मोरे पाटील, अंबुलगा महसूल मंडल निरीक्षक पंकज शेळके, प्रमोद मरुरे, ॲड. अपरजीत मरगने, धनाजी चांदुरे, गौतम कांबळे, इस्माईल सोनवणे, आनंदा रक्टे, संग्राम बिरादार, प्रकाश भोसले, श्रीनाथ माळी, ज्योतीराम सूर्यवंशी, कुमार पारेकर, बालाजी माळी, धिरज सोमवंशी, उद्धव पाटील, राम बडगे, दगडू सोमवंशी, अमर राजमाने व गावातील नागरिक उपस्थित होते.

# श्यामार्य कन्या विद्यालयात पालक मेळावा उत्साहात संपन्न




**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.११ ऑक्टोबर -**

श्यामार्य कन्या विद्यालयात वर्ग पाचवी व सहावी मधील विद्यार्थ्यांच्या पालकांचा पालक मेळावा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य, श्यामलाल स्मारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, तर प्रमुख पाहुणे अंजुमनीताई आर्य, सहसचिव उपस्थित होते.

मंचावर विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रवीण भोळे, पर्यवेक्षक विजय बैले, तसेच पालक प्रतिनिधी प्रेमाला बामणे आणि पुनम बोधले उपस्थित होते.

पालक मेळाव्यासाठी वर्ग पाचवी व सहावीतील विद्यार्थिनींच्या पालकांनी उपस्थिती दर्शवली. घटक चाचणीतील तीन सर्वोच्च विद्यार्थिनींना बक्षीस देण्यात आले. स्वागतगीत गीतमंचाद्वारे सादर करण्यात आले. मुख्याध्यापक प्रवीण भोळे यांनी सांगितले की, नूतन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, शिक्षणाचे बदलते स्वरूप, पाल्याच्या वाचन, लेखन आणि संभाषण क्षमतांचा विकास तसेच भविष्यातील नवी उपक्रम राबविण्यासाठी आणि पालकांशी हितगुज साधण्यासाठी हा मेळावा आयोजित केला गेला.

विद्यालयाचे अध्यक्ष सुपोषपाणी आर्य यांनी पालक मेळाव्याच्या महत्त्वावर भर देत सांगितले की, हा कार्यक्रम मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी, शिक्षक आणि पालक यांच्यात संवाद साधण्यासाठी उपयुक्त व्यासपीठ आहे. यामुळे मुलांच्या शिक्षण, आरोग्य आणि वर्तणुकीवर प्रभावी लक्ष ठेवता येते. तसेच शाळेच्या सुरक्षित वातावरणामुळे पालकांची समाधानाची भावना आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वाती मोरतळे, प्रास्ताविक वैशाली अनकल्ले, विषय मनोगत संगीता सुतार, आभारप्रदर्शन आम्रपाली गायकवाड यांनी केले. शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील होते.

पालक मेळावा विद्यार्थ्यांच्या प्रगतीस चालना देणारा ठरला असून, वर्ग पाचवी व सहावीतील विद्यार्थ्यांनी घटक चाचणीत उत्तम कामगिरी केली आहे.

## शिरूर अनंतपाळ तालुक्यात शिवसेना उबाठा गटाची कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.११ ऑक्टोबर**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या संघटनात्मक बांधणीस चालना देत शिरूर अनंतपाळ तालुक्यात नवे पदाधिकारी जाहीर करण्यात आले. साकोळ जिल्हा परिषद गटातील उजेड परिसरातील प्रमुख पदांवर नियुक्त्या करून नव्या पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली.

उजेड पंचायत समिती विभागप्रमुख म्हणून नुकतेच पोलीस सेवेतून सेवानिवृत्त झालेले रामराम केरबा हजारे (मेजर) यांची निवड करण्यात आली असून, त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा फायदा स्थानिक संघटन कार्यात होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

तसेच, उजेड शाखा प्रमुखपदी संजय सोपान मरडे, तर शाखा संघटकपदी आमूलाल बडेमिया देशमुख यांची नियुक्ती करण्यात आली. या सर्वांना शिवसेना तालुका अध्यक्ष भागवत वंगे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. याप्रसंगी शिवसेना अल्पसंख्याक विभागाचे लातूर जिल्हा समन्वयक मोहसीन बुखारी सय्यद, ॲड. पूंडलिक पवार, शहर प्रमुख सतिश शिवणे, प्रशांत शिरूरे यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.

कार्यक्रमात नवीन पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या नव्या नियुक्त्यांमुळे शिरूर अनंतपाळ तालुक्यातील शिवसेना संघटन अधिक बळकट होईल आणि आगामी काळात पक्षाची पकड आणखी मजबूत होईल, असा विश्वास कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

## ६० पूरग्रस्त कुटुंबांना साहित्य वितरित



छत्रपती संभाजीनगर– अतिवृष्टीमुळे मराठवाड्यात मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर पैठणच्या मायगाव येथील अनेक कुटुंबांचे नुकसान झाले. या संकटग्रस्त कुटुंबांच्या मदतीसाठी मॅजिक वीरा ग्रुप पुढे सरसावला असून, त्यांनी पूरग्रस्त ६० कुटुंबांना भांडी व घरगुती साहित्याचे वाटप केले. सचिव रीता पूरवार यांनी गावकऱ्यांच्या गरजांविषयी माहिती घेतली. मदत साहित्यात भांड्यांचे किट, बेडशीट, टॉवेल आदी वस्तूंचा समावेश आहे. वाटप शनिवारी करण्यात आले. सरपंच किशोर दसपुते यांनी आभार मानले. यात रीता पूरवार, स्नेहा बेलांगी, लता सिकची, सुनीता सेठिया, लुबना, रुपाली चौरडिया, दर्श फुलपगर यांच्यासह सर्व सदस्यांचे सहकार्य लाभले.

## एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच केला

नंदुरबार– एसयूडी लाइफ इन्शुरन्सने एसयूडी लाइफ निफ्टी अल्फा ५० इंडेक्स फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे, हा एक नवीन फंड ऑफर आहे जो निफ्टी अल्फा ५० इंडेक्सचा मागोवा घेते, भारतातील सर्वाधिक सातत्याने चांगली कामगिरी करणाऱ्या शेअर्सची ओळख करून देणारा स्मार्ट बीटा बेंचमार्क आहे. नवीन फंड ऑफर (एनएफओ) ६ ऑक्टोबर ते २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत खुला आहे.

## आयएफएटी इंडिया २०२५: हरित तंत्रज्ञान आणि व्यवसाय सहकार्यासाठी एक मेगा प्लॅटफॉर्म

मुंबई – पाणी, सांडपाणी, घनकचरा आणि पुनर्वापर तंत्रज्ञानासाठी देशातील सर्वात मोठा व्यापार मेळा, आयएफएटी इंडिया २०२५, १४ ते १६ ऑक्टोबर दरम्यान मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटर येथे आयोजित केला जात आहे. आयएफएटी इंडिया २०२५ चे आयोजन मेस्से म्युंचेन इंडियाने केले आहे. वाढत्या पर्यावरणीय आणि पायाभूत सुविधांच्या दबावादरम्यान, हा आतापर्यंतचा सर्वात मोठा कार्यक्रम आहे, जो जगभरातील नवोन्मेषक, देशांतर्गत खरेदीदार आणि धोरणकर्ते आकर्षित करतो. या वर्षीच्या व्यापार मेळ्यात ३० हून अधिक देशांतील ५०० हून अधिक संस्था त्यांचे व्यापार प्रदर्शन प्रदर्शित करतील. ५० हून अधिक देशांतील २८,००० हून अधिक व्यापार अभ्यागत भेट देतील अशी अपेक्षा आहे. कॅनडा, नेदरलँड्स, जर्मनी, दक्षिण कोरिया, हंगेरी आणि ऑस्ट्रेलिया सारख्या देशांतील मंडप प्रदर्शित केले जातील.

## चप्सने प्लॅनेट कॉन्शिअस बिलबोर्ड सादर केला

मुंबई – शाश्वततेच्या दिशेने एक अभूतपूर्व आणि प्रभावी पाऊल उचलत, भारतातील घरगुती ओपन-फूटवेअर ब्रँड, चप्स फूटवेअरने मुंबईतील वांद्रे येथे भारतातील पहिला बायोडिग्रेडेबल (बायोडिग्रेडेबल म्हणजे अशी वस्तू जी जिवाणू किंवा इतर सजीवांद्वारे सहजपणे विघटित होते आणि पर्यावरणात विलीन होते.) बिलबोर्ड लाँच केला आहे, जो अदृश्य कचऱ्याबद्दल दृश्य संदेश देतो. इनटू क्रिएटिव्ह द्वारे संकल्पित, पारंपारिक बिलबोर्ड जे संदेश पुसून टाकल्यानंतर बराच काळ टिकतात त्यापेक्षा वेगळे, हे बिलबोर्ड पाऊस पडल्यावर नैसर्गिकरित्या विघटित होण्यासाठी डिझाइन केले आहे, जे ब्रँडच्या नवीनतम नावीन्यपूर्णतेचे प्रदर्शन करते: लँडफिलमध्ये टाकल्यानंतर केवळ २४ महिन्यांत बायोडिग्रेड होणारे शूज. या मोहिमेच्या केंद्रस्थानी एक क्रांतिकारी कल्पना आहे: जर आमची उत्पादने जबाबदारीने गायब होऊ शकतात, तर आमच्या जाहिराती देखील होऊ शकतात. यामुळे चॅप्सची रोजच्या वापरासाठी असे शूज तयार करण्याची वचनबद्धता अधिक दृढ होते जे पृथ्वीवर कायमस्वरूपी प्रभाव सोडत नाहीत.

## लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडला यूएस एफडीए नोंदणी

मुंबई: लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीज लिमिटेडला त्यांच्या सर्जिकल कंज्यूमेबल्स, ऑर्थोपेडिक सपोर्ट्स आणि हायजीन उत्पादनांच्या मालिकेसाठी यूएस एफडीए नोंदणी मिळाली आहे – ही उपलब्धी कंपनीच्या उत्कृष्ट उत्पादन क्षमतेचे प्रतीक आहे आणि जागतिक हेल्थकेअर सप्लाय चेनमध्ये भारताची स्थिती अधिक मजबूत करते.यूएस एफडीए नोंदणी उत्पादन सुरक्षा, गुणवत्ता आणि अनुपालनाचे सर्वोच्च मानक दर्शवते. भारतीय उत्पादकांसाठी हे अमेरिके, युरोपियन युनियन आणि मध्य पूर्व यांसारख्या नियमनयुक्त आंतरराष्ट्रीय बाजारपेठांचे दारे उघडते, ज्यामुळे व्यवसाय वृद्धीच्या अपूर्व संधी निर्माण होतात. लॉर्ड्स मार्क इंडस्ट्रीजसाठी ही त्यांच्या जागतिक विस्ताराच्या प्रवासातील ऐतिहासिक क्षण आहे, जे निर्यात संधी वाढवते आणि हेल्थकेअर मॅन्युफॅक्चरिंगमध्ये भारताला जागतिक नेतृत्वाकडे घेऊन जाते.

## स्तन कर्करोग जागरूकता महिन्याचे महत्त्व सांगितले

ऑक्टोबर २०२५: जगभरात 'स्तन कर्करोग जनजागृती महिना' साजरा होत असताना, वोक्हार्ट हॉस्पिटल्स, नागपूर येथील प्रमुख सर्जिकल ऑन्कोलॉजिस्ट डॉ. सागर भालेराव यांनी भारतातील वाढत्या स्तन कर्करोगाच्या धोक्याचा सामना करण्यासाठी लवकर निदान, वेळेवर उपचार आणि योग्य जीवनशैलीबाबत जागरूकता यांचे महत्त्व सांगितले आहे. डॉ. भालेराव यांनी सांगितले स्तन कर्करोग म्हणजे मृत्युदंड नाही. योग्य जागरूकता, प्रतिबंधात्मक उपाय आणि लवकर निदान यांमुळे आपण अनेक जीव वाचवू शकतो. त्यांनी पुढे सांगितले की स्तन कर्करोगाविरुद्धची पहिली लढाई म्हणजे जागरूकता, जी फक्त रुग्णांसाठीच नाही तर त्यांच्या कुटुंबासाठी आणि संपूर्ण समाजासाठी देखील महत्त्वाची आहे.

## एण्ड टीव्हीवर होणार गोलमाल!

एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'च्या आगामी एपिसोडमध्ये प्रेक्षकांना हसवून-हसवून लोटपोट करणाऱ्या मनोरंजनाचा आनंद मिळणार आहे. हप्पू (योगेश त्रिपाठी) आणखी एका दुविधेमध्ये सापडतो. एका रात्री, त्याची टॉमी रिच नावाच्या माणसाशी भेट होते, जो गंभीर अवस्थेत असतो. तो हप्पूला सांगतो की, गुंडांनी त्याच्यावर हल्ला केला आणि त्याचा मोबाइल झुडपात पडला आहे. टॉमी हप्पूकडे मदत मागतो, पण न्योच्छावरची मोठी रक्कम घेऊन जाणारा संशयित हप्पू त्याला मदत करण्यास नकार देतो, त्याऐवजी पोलिसांकडे तक्रार दाखल करण्याचा सल्ला देतो. नंतर, हप्पूला आश्चर्यकारकपणे त्या झुडपांमध्ये सोन्याच्या दागिन्यांनी भरलेली बॅग सापडते.

## विप्रो केअर्सने महाराष्ट्रातील तरुणींसाठी सन्तूर स्कॉलरशिप प्रोग्राम सुरू केला

छत्रपति संभाजीनगर : विप्रो कन्झ्युमर केअर अँड लाइटिंगने विप्रो केअर्सच्या सहकार्याने यावर्षी महाराष्ट्रात आपला प्रमुख सन्तूर स्कॉलरशिप प्रोग्राम सुरू केला आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या आणि अविकसित जिल्ह्यांतील तरुणींना सशक्त करण्यासाठी तयारकेलेला हा उपक्रम त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देईल, त्यांच्या क्षमतांना प्रोत्साहन देईल आणि उज्ज्वल भविष्य घडविण्यास मदत करेल.या वर्षी, या कार्यक्रमाअंतर्गत महाराष्ट्रातील १२ वी नंतर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणींना शिष्यवृत्ती दिली जाईल. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या संपूर्ण कालावधीसाठी शिक्षण शुल्क आणि इतर शिक्षणाशी संबंधित खर्चांसाठी दरवर्षी ३०००० रुपयांची आर्थिक मदत मिळेल.

## पीएनजी ज्वेलर्स'सोबत साजरी करूया दिवाळी

छत्रपति संभाजीनगर : भारतातील सर्वाधिक विश्वासार्ह आणि मान्यताप्राप्त वारसा असलेल्या दागिन्यांच्या ब्रँड्सपैकी एक, पीएनजी ज्वेलर्स आपल्या भव्य दिवाळी मोहिमेची आनंदात सुरुवात करणार आहे. ही मोहीम २२ सप्टेंबर पासून २६ ऑक्टोबर २०२५ पर्यंत चालणार असून, ग्राहकांना आकर्षक दरांमध्ये अप्रतिम दागिने खरेदी करण्यासाठी एक अविस्मरणीय संधी उपलब्ध करून देणार आहे.

# 'छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्र गौरव यात्रा भारत'च्या समारोपाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना निमंत्रण

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ११ ऑक्टोबर: राष्ट्रीय एकात्मता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा तसेच शिवचरित्र राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याच्या उदात्त उद्देशाने १९ फेब्रुवारी २०२६ रोजी भारत क्रांती मिशन करुन जगन्नाथपुरी (ओडीसा) येथे आयोजित करत असलेल्या राष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळ्याचे निमंत्रण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना देण्यात आले.मागील काही वर्षांपासून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा राष्ट्रीय स्तरावर



गौरव व्हावा. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य संपुर्ण भारतातील प्रत्येकाला कळावे या उद्देशाने भारत क्रांती मिशनकडुन देशातील विविध भागात शिव जन्मोत्सव साजरा केला जातो दरम्यान डॉ .विलास पांगारकर (राष्ट्रीय अध्यक्ष, भारत क्रांती मिशन) यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने नागपूर येथे १० आक्टोंबर रोजी सरसंघचालक मोहन भागवत यांची भेट घेऊन ओडिशा राज्यातील जगन्नाथ पुरी येथे १९ फेब्रुवारी २०२६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय शिवजन्मोत्सव सोहळ्याच्या समारोप समारंभाचे निमंत्रण देण्यात आले .याप्रसंगी भारत क्रांती मिशन तथा राष्ट्रीय शिव जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डॉ. विलास पांगारकर , राजे मधोजी भोसले (नागपूर) , शिवाजीराजे जाधव (लखुजीराजे जाधव यांचे वंशज), विजय काकडे , परमेश्वर नलावडे , अतुल पांगारकर आदी उपस्थित होते.

# वि.हिं.प.मंदिर आयाम १२ ऑक्टोबरला संभाजीनगर जिल्ह्यात ५०० मंदिराचे महास्वच्छता अभियान राबवणार

छत्रपती संभाजीनगर : मंदिर स्वच्छता महाअभियानांतर्गत वि.हिं.प. मंदिर अर्चक पुरोहित आयामातर्फे रविवार दिनांक १२ ऑक्टोबरला संभाजीनगर जिल्ह्यातील मंदिरे बौद्धविहार जैन मंदिरे यांची सकाळी सात ते अकरा या वेळेत स्वच्छता मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती संभाजीनगर जिल्हामंत्री अभिषेक कादी, सहमंत्री पंकज पाडळकर, अनंत जोशी, सुभाष कुमावत, सिताराम कीर्तीकर, गोपाळ डोंगरे मंदिर आयामाचे राजेंद्र पाथरीकर ज्ञानेश्वर जाधव शिवाजी दहिवाल पद्मनाभ चौधरी यांनी दिली

दिनांक ८ ऑक्टोबर रोजी भक्ती गणेश मंदिर सिडको संभाजीनगर येथे आयोजित केलेल्या बैठकीत ते बोलत होते ते पुढे म्हणाले विश्व हिंदू परिषद आणि मंदिर अर्चक पुरोहित आयाम देवगिरी प्रांतातर्फे दीपावलीच्या पार्श्वभूमीवर मंदिर बौद्ध विहार जैन मंदिर गुरुद्वारे स्वच्छता रोषणाई व भगवा ध्वज पूजनाचे महाअभियान राबविण्यात येणार आहे. मंदिराचा गाभारा ते अंगण या संकल्पनेवर आधारित १२ ऑक्टोबरला सकाळी ७ ते ११ असे ४ तास सर्व भाविक बंधू-भगिनी व सर्व सेवाभावी संस्थांनी मंदिर स्वच्छता अभियानात सहभाग नोंदवावा असे आवाहन केले

या बैठकीला विश्व हिंदू परिषद, मंदिर आर्चक पुरोहित आयाम जय जय रघुवीर समर्थ सेवाभावी संस्था यासह विविध संस्था संघटनेचे कार्यकर्ते उपस्थित होते. माझे मंदिर,माझी जबाबदारी* हा अभियानाचा मुख्य संदेश आहे दीपावलीच्या उत्सवामध्ये घराघराप्रमाणेच मंदिरावरही रोषणाई करून त्यांना प्रकाशमय आकर्षक करण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे तसेच या काळात मंदिरावरील भगवा ध्वज बदलून नवीन भगव्या ध्वजाची प्रतिष्ठापना करण्यात येईल. भगवा ध्वज मंदिरावर लावण्यापूर्वी हिंदू समाजाच्या विविध घटकातील तरुण जोडप्याच्या हस्ते ध्वजाचे पूजन करून नंतरच लावण्यात येणार आहे. यातून समरसतेचा व एकतेचा संदेश दिला जाणार आहे.

# चनकवाडी पाणी फिल्टर चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा

पैठण दि ११ : चनकवाडी ग्रामपंचायत वॉटर फिल्टर, पाणीपुरवठा योजना आणि ग्रामपंचायतीतील विविध विकासकामांमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत तातडीने चौकशी करून सर्व शासकीय निधी स्थगित करण्याची छावा महाराष्ट्र सेनेकडून मागणी करण्यात आली आहे.



चनकवाडी ग्रामपंचायतीतील सर्व विकासकामांची सखोल व स्वतंत्र चौकशी करण्यात यावी. प्रशासनाने या गंभीर भ्रष्टाचाराची दखल घ्यावी नसता छावा महाराष्ट्र सेना महाराष्ट्र राज्य संघटना व गावकऱ्यांच्या वतीने पंचायत समिती पैठण येथे तीव्र प्रकारचे आंदोलन करण्यात येईल असे निवेदन गटविकास अधिकारी यांना देण्यात आले या वेळी छावा महाराष्ट्र सेनेचे प्रदेश सल्लागार किशोर सदावर्ते,प्रदेश सरचिटणीस रामेश्वर बावणे,मराठवाडा अध्यक्ष मनोज मुरदारे,जिल्हाप्रमुख साईनाथ कर्डिले,सदस्य गणेश गिरगे, प्रीतम आडसुल आदी उपस्थित होते.

# पाणंद रस्ते व जलजीवन मिशन कामातील भ्रष्टाचार चौकशीसाठी सत्याग्रह आंदोलन

तभा वृत्तसेवा,

कन्नड – दि. ११ ऑक्टोबर-तालुक्यात मंजूर झालेल्या पाणंद रस्ते आणि जलजीवन मिशनच्या कामात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत या कामांची सखोल चौकशी व्हावी, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते बापू गवळी यांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर दि. १० ऑक्टोबर रोजी सत्याग्रह आंदोलन केले.



आंदोलनकर्ते गवळी यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील शिव पाणंद रस्ते कोणतीही अधिकृत परवानगी न घेता मनमानी पद्धतीने करण्यात आले आहेत. तसेच जलजीवन मिशन अंतर्गत ठेकेदार व अधिकाऱ्यांनी मिळून मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.याचबरोबर महराजस्व अभियानांतर्गत मकरणपूर ते रेल शिव रस्ता मोकळा करावा, चिमणापूर व नागापूर येथील शिव रस्ते तत्काळ मोकळे करावेत तसेच औरंगपूर शिवारातील शेती वहिताचा रस्ता खुला करावा अशा विविध मागण्याही आंदोलनातून करण्यात आल्या.

या आंदोलनाची दखल घेत उपविभागीय अधिकारी संतोष गोरड यांनी तत्काळ संबंधित विभागांना चौकशीचे आदेश दिले. तसेच तहसिलदार विद्याचरण कडवकर यांनी ३० दिवसांच्या आत दोषींवर कारवाई करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर अखेर बापू गवळी यांनी सत्याग्रह आंदोलन मागे घेतले.या आंदोलनामुळे तालुक्यातील प्रशासन व स्थानिक विकास कामांमधील पारदर्शकतेबाबत नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

# श्री तुकोबाराय वारकरी शिक्षण संस्था पाथरी येथे विद्यार्थ्यांना स्नेहभोजन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ ऑक्टोबर

बुलडाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष राधेश्यामजी चांडक उपाख्य भाईजी यांच्या अमृत महोत्सव सोहळा ७५ व्या वाढदिवस व बुलडाणा अर्बन चे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ.सुकेश झंवर यांच्या सुवर्ण महोत्सव ५० व्या वाढदिवसानिमित्त व सहकार विद्या मंदिर च्या अध्यक्ष पदी कोमलताई झंवर यांना २५ वर्ष पुर्ण झाल्याबद्दल कैलास कासट सरव्यवस्थापक यांच्या मार्गदर्शनाखाली व संजय दळवी विभागीय व्यवस्थापक विभाग सिल्लोड व ह.भ.प. सुशांत महाराज पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शाखा वडोद बाजार व फुलंब्री विभाग सिल्लोड तर्फे श्री तुकोबाराय वारकरी शिक्षण



संस्था पाथरी येथे विद्यार्थांना स्नेहभोजनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता.

सर्वप्रथम श्री गणेशाचे पूजन करून हरिभक्त परायण सुशांत महाराज तुकोबाराय वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक यांचा संस्थेतर्फे शाल,श्रीफळ,बुके देऊन सत्कार करण्यात आला. त्यांनी संस्थेचे अध्यक्ष डॉक्टर सुकेश झंवर यांच्याबद्दल त्यांच्या कार्यातून व त्यांच्याशी स्वतःभेटून आलेल्या अनुभवातून त्यांच्या कार्याचा गौरव करून त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन पुढील चांगल्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी स्थानिक सल्लागार गणेश वानखेडे,तसेच शाखा सिल्लोडचे वरिष्ट शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे,विभागीय लेखा परिक्षक अनिल बोर्डे,शाखा बाजार सावंगी शाखा व्यवस्थापक हरिश्चन्द्र गोराडे,शाखा बाबरा शाखा व्यवस्थापक गणेश निकोत,शाखा फुलंब्री शाखा व्यवस्थापक दिवाकर राजहंस,शाखा वडोद बाजार शाखा व्यवस्थापक गजानन नवले,कर्मचारी सर्वश्री किशोर पाटील,ईश्वर ठाले,भारत सोनुने,आशिष सोळुंके,मोहन सपकाळ,अल्पबचत प्रतिनिधी संतोष शिंदे,सुनील शेरकर, उपस्थित होते.याप्रसंगी सर्व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# जागतिक संधिवात दिन - १२ ऑक्टोबर : तरुण वयोगटात वाढता संधिवात - रोबोटिक सहाय्यित सांध्याच्या बदलामुळे उपचारात क्रांती

छत्रपती संभाजीनगर १२ ऑक्टोबर २०२५ : संधिवात हा केवळ वृद्धांचा आजार आहे ही समजूत आता चुकीची ठरत आहे. आज ३० ते ५० वयोगटातील अनेक तरुण भारतीय या समस्येने त्रस्त आहेत. मेडिकव्हर हॉस्पिटल्सच्या विविध शाखांमध्ये अशा रुग्णांची संख्या वाढत असून, कामकाजाच्या वयात सांध्यांची झीज ही गंभीर आरोग्य समस्या बनत आहे. अशा रुग्णांसाठी रोबोटिक सहाय्यित सांध्यांचा बदल (ठेर्लेंीळल–-ीळींिशव गेळपीं ठशश्रिरलशाशपीं) ही एक क्रांतिकारक तंत्रज्ञान प्रक्रिया ठरत आहे – जी अचूकता, जलद पुनर्वसन आणि टिकाऊ परिणाम देते.



आज भारतात होणाऱ्या सांध्यांच्या बदलांपैकी सुमारे १५-२० टक्के रुग्ण हे ६० वर्षांखालील आहेत. हे रुग्ण लवकर कामावर परतणे आणि सक्रिय जीवन जगणे अपेक्षित ठेवतात, त्यामुळे रोबोटिक सहाय्यित शस्त्रक्रियेचे महत्त्व वाढले आहे, असे डॉ. डॉ. कपिल पोरे, वरिष्ठ सल्लागार -अस्थिविकार व सांध्यांच्या बदल विभाग, मेडिकव्हर हॉस्पिटल्स यांनी सांगितले.

भारतातील संधिवाताचे वाढते ओझे

भारतातील ४५ वर्षांवरील २२ ते ३९ टक्के लोक गुडघ्याच्या सांध्यातील ऑस्टिओआर्थ्रायटिसने (ींीशेरीींहीळींळी) त्रस्त आहेत. अतिरिक्त वजन, बसून राहण्याची जीवनशैली, खेळातील दुखापती आणि अपघातानंतरची झीज हे यामागील प्रमुख घटक आहेत. तज्ज्ञांचा इशारा आहे की, हा तरुण संधिवात कल वाढत राहिल्यास कुटुंबे, कामाची ठिकाणे आणि आरोग्य व्यवस्था यांवर ताण निर्माण होऊ शकतो.

रोबोटिक तंत्रज्ञानामुळे बदललेले परिणाम

रोबोटिक प्रणालीच्या साहाय्याने शल्यविशारद हाडांचे कटिंग आणि इम्प्लांट बसवण्याचे नियोजन उप-मिलीमीटर अचूकतेने करू शकतात. यामुळे: सांध्याचे योग्य सरेखन व संतुलन, ज्यामुळे दीर्घकाळ टिकाऊ परिणाम मिळतात. ऊतकांचे कमी नुकसान, त्यामुळे कमी वेदना आणि जलद पुनर्वसन. शस्त्रक्रियेनंतर २४-४८ तासांत चालण्यास प्रारंभ करण्याची क्षमता. अधिक टिकाऊ इम्प्लांट, जे विशेषतः तरुण व सक्रिय रुग्णांसाठी आवश्यक आहे.

रोबोटिक्स सर्जनची जागा घेत नाही, तर त्याच्या अचूकतेत भर घालते, असे डॉ. डॉ. कपिल पोरे , म्हणाले. मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये आम्ही अत्याधुनिक तंत्रज्ञान रुग्णांपर्यंत पोहोचवण्यास वचनबद्ध आहोत, जेणेकरून त्यांना जलद बरे होणे आणि जीवनमान सुधारण्याचा लाभ मिळेल.

## दावा न केलेल्या ठेवी परत मिळवण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन

अहिल्यानगर, दि. ९ – जिल्ह्यातील विविध बँकांमधील वैयक्तिक, संस्थात्मक आणि सरकारी योजनांच्या खात्यांमध्ये सुमारे १६३ कोटी रुपयांची दावा न केलेली ठेवी शिल्लक आहे. या ठेवींचा ९ लाख ४ हजार २८१ खातेदारांना परतावा मिळविण्यासाठी १ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत जिल्हा अग्रणी बँक – सेंट्रल बँक ऑफ इंडिया यांच्या पुढाकाराने आणि सर्व सदस्य बँकांच्या सहकार्याने विशेष मोहिम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक आशिष एम. नवले यांनी दिली.

देशभरात विविध बँकांमध्ये सुमारे १ लाख ३५ हजार कोटी रुपयांची दावा न केलेली ठेवी शिल्लक आहेत. त्यापैकी महाराष्ट्र राज्यात ५ हजार ८६६ कोटी रुपये असून, त्यात वैयक्तिक खात्यांच्या ठेवी ४ हजार ६१२ कोटी, संस्थांच्या ठेवी १ हजार ८२ कोटी, आणि सरकारी योजनांमधील ठेवी १७२ कोटी रुपये समाविष्ट आहेत.

जिल्ह्यातील काही बँकांमधील दावा न केलेल्या ठेवींची माहिती खालीलप्रमाणे आहे:

एडीसीसी बँक: ७१ कोटी ५४ लक्ष (५.९९ लाख खाती)

स्टेट बँक ऑफ इंडिया: ३० कोटी २८ लक्ष (०.७९ लाख खाती)

सेंट्रल बँक ऑफ इंडिया: १३ कोटी ९५ लक्ष (०.६६ लाख खाती)

युनियन बँक ऑफ इंडिया: १२ कोटी १५ लक्ष (०.४८ लाख खाती)

बँक ऑफ महाराष्ट्र: ९ कोटी ८ लक्ष (०.२४ लाख खाती)

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार, १० वर्षांपासून निष्क्रिय असलेल्या खात्यांतील ठेवी 'ठेवीदार शिक्षण आणि जागरूकता निधी' (ऊर्शिीळीीं एर्वीलरींळेप रपव -ुरीशपशीी ऋीपव - ऊए-ऋ) मध्ये हस्तांतरित केल्या जातात. तथापि, खातेदारांना आपले पैसे परत मिळवण्याचा पूर्ण हक्क आहे. ठेवी परत मिळविण्यासाठी संबंधित खातेदारांनी आपल्या बँकेत संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे आणि अद्ययावत घधउ सादर करणे आवश्यक आहे. या मोहिमेद्वारे सर्व बँकांकडून जनजागृती शिबिरे आणि ग्राहक भेटी आयोजित केल्या जातील. खातेदारांनी या संधीचा नक्की लाभ घ्यावा, असे कळविण्यात आले आहे.

## जि.प.केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे विद्यार्थ्यांनी बनविले आकर्षक आकाशकंदील




तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.११ ऑक्टोबर

सोयगाव जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा येथे जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतील दसूत्री कार्यक्रमांतर्गत तसेच सोयगाव गटशिक्षणाधिकारी सचिन शिंदे व सोयगाव केंद्रप्रमुख फिरोज तडवी यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय शाळा सोयगाव येथील कार्यानुभव निदेशक चव्हाण यांनी शाळेचे मुख्याध्यापक किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व विद्यार्थ्यां कडून सुंदर असे आकाश कंदील तयार करून घेतले.या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक किरण पाटील,पदवीधरशिक्षिका सुरेखा चौधरी,रामचंद्र महाकाळ,मंगला बोरसे,प्रतिभा कोळी,अंकुश काळे,बिलाल बागवान यांनी सहकार्य केले विद्यार्थ्यांनी स्वतः रंगीत कागदापासून रंगीबेरंगी आकाश कंदील स्वतः तयार केल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून येत होता.



## महेश अरुण सातकर यांचे निधन

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ११ ऑक्टोबर महेश अरुण सातकर वय ४५ वर्ष रा.बालाजी नगर बिडकीन ता पैठण यांचे आज दि ११ शनिवार रोजी अल्पशा आजाराने सकाळी ९:३० वाजता दु:खद निधन झाले त्याचा पार्थीवावर सायंकाळी पाच वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात आई,भाऊ असा परिवार आहे आनंद सातकर यांचे मोठे बंधू होते.

**उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी, छत्रपती संभाजीनगर**

जमृअ/सीआर-६४१/२०२५/कावि-०३ दिनांक ०९.१०.२०२५

### जाहीर प्रगटन

अर्जदार : श्री./ श्रीमती. मोहम्मद रईस शेख रशीद संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर

विरुद्ध

गैरअर्जदार : उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू, छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म मृत्यु अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज संदर्भः श्री/श्रीमती. मोहम्मद रईस शेख रशीद, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर यांचा अर्ग दि.२३.०९.२०२५

विषयाकीत प्रकरणी अर्जदार यांनी या न्यायालयात जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ चे सुधारीत अधिनियम २०२३ चे कलम १३ (३) अन्वये अर्जदार यांचे मुलगा नामे. मोहम्मद अजहर मोहम्मद रईस शेख यांचा दिनांक २३.०८.२०२४ राजा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झालेला असून, जन्म/मृत्यु नोंद नोंदवहीत घेण्यासाठी या न्यायालयाचे आदेश मिळण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे

अर्जदार श्री/श्रीमती. मोहम्मद रईस शेख रशीद यांचे मुलगा नामे, मोहम्मद अजहर मोहम्मद रईस शेख यांचो जन्म नोंद नसल्यायावत उपनिबंधक तथा विभाग प्रमुख, शा.वै.म.व रू, छत्रपती संभाजीनगर यांचा दाखला सादर केलेला आहे.

सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व गैरअर्जदार व जनतेस सुचित करण्यात येते की, अर्जदाराचे मुलगा नागे. मोहम्मद अजहर मोहम्मद रईस शेख यांचा दिनांक २३.०८.२०२४ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय. छत्रपती संभाजीनगर येथे जन्म झाला असून, सदर प्रमाणपत्र जारी करण्यास जर कुणाचा काही उजर /आक्षेप/हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदरचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आत आपला उजर/आक्षेप/हरकत/तक्रार मुळ कागदपत्रांसह उपविभागीय दंडाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कार्यालय, आलमगीर कॉलनी, जिल्हाधिकारी कार्यालय परीसर, छत्रपती संभाजीनगर येथे नांव, संपुर्ण पत्ता व संपर्क क्रमांक स्पष्ट नमुद करून लेखी स्वरुपात नोंदवावा. मुदतीनंतर आलेला उजर / आक्षेप / हरकत/तक्रार ग्राहय धरली जाणार नाही तसेच अर्जदारांचे प्रमाणपत्रासाठीचा आदेश नियमाप्रमाणे देण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

सदर जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्यानिशी दिनांक / / २०२५ रोजी देण्यात आले.

दिनांक: //२०२५

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर,

उप विभाग अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी,
छत्रपती संभाजीनगर करीता

**(मौजे खडकनारळा शिवार ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. १०५ मधील एकुण गटाचे क्षेत्र ३ हे. ९५ आर पैकी क्षेत्र 0 हे. ८0 आर शेतजमीन)**

### जाहिर प्रगटन

सर्व जनतेस कळविण्यात येते की, माझ्या पक्षकाराने मौजे खडकनारळा शिवार ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. १०५ मधील एकुण क्षेत्र ३ हे. ९५ आर शेतजमीनीपैकी क्षेत्र ० हे. ८० आर शेतजमीन श्री. बन्सी मारोती थोरात रा. खडकनारळा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी विक्री केलेली असून त्याबाबत कोणाचा काही आक्षेप, उजर असल्यास अथवा सदर शेतजमीनीसंबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा खरेदी विक्री, तारण, गहाण, दान, कुळ, लिज, वारसहक्क, दावा, हस्तांतरण, इतर मार्गाने अधिकार पोहोचत असेल, तर त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत त्यांचा उजर/आक्षेप मुळ कागदपत्रासह लेखी स्वरूपात माझ्या कार्यालयात नोंदवावा, तद्नंतर सदरील मिळकत निर्दोष समजून आमचे पक्षकार विक्रीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेल्या उजर/आक्षेप माझ्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ठ 'अ' (मिळकतीचे वर्णन) : मौजे खडकनारळा शिवार ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर येथील गट नं. १०५ मधील क्षेत्र ० हे. ८० आर शेतजमीन

चतुः सिमा

पूर्वेस – सरकारी गायरान | पश्चिमेस – याच गटातील जमीन

दक्षिणेस – कैलास भवाने यांची जगीन | उत्तरेस – रेल्वे हद्द

करीता हे जाहीर प्रगटन.

दिनांक : ११/१०/२०२५.

सही,
अॅड. एस.पी.लबडे

पत्ता : सुलतानाबाद ता. गंगापूर जि. छ. संभाजीनगर मो. नं. ९८६०३४५६६१

## अग्रलेख...

# भारत-ब्रिटन मैत्रीचा नवा अध्याय

राजकारणात तसेच आंतरराष्ट्रीय संबंधात कोणीच कोणाचा कायमचा शत्रू वा मित्र नसतो, असे म्हणतात. त्याचा प्रत्यय गेल्या काही दिवसांतील घडामोडींवरून येत आहे. मित्र असलेले शत्रू होत आहेत, तर कधीकाळी शत्रू असलेले मैत्रीचा हात पुढे करत आहेत. टेरिफच्या मुद्यावरून भारताच्या अमेरिकेसोबतच्या द्विपक्षीय संबंधात काहीशी कटुता आली असताना भारताने ब्रिटनसोबतचे आपले मैत्रीपूर्ण संबंध आणखी दृढ केले, ही दोन्ही देशांच्या दृष्टीने समाधानाची बाब म्हणावी लागेल. भारताच्या दौऱ्यावर असलेले ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर आणि भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची मुंबईतील राजभवनात भेट झाली. या भेटीत अनेक महत्त्वपूर्ण करार करण्यात आले. त्याचे ऐतिहासिक या शब्दातच वर्णन करावे लागेल. दोन महिने आधी दोन्ही देशांत विस्तृत असा व्यापारी आणि आर्थिक करार झाला होता. त्याला यामुळे गती मिळाली आहे.

कीर स्टार्मर यांच्यासोबत ब्रिटनचे जम्बो शिष्टमंडळ आले होते. त्याची उपयुक्तता दोन देशांत झालेल्या विविध करारांतून दिसून आली. सामान्यपणे कोणत्याही देशाच्या राष्ट्रप्रमुखाशी वा सरकारप्रमुखाशी आपल्या देशाच्या पंतप्रधानांची वा राष्ट्रपतींची भेट ही राजधानी दिल्लीतील हैदराबाद हाऊस वा राष्ट्रपती भवनात होत असे. पण यावेळी दोन देशांच्या सरकारप्रमुखांची भेट ही देशाची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत व्हावी, याचे वेगळे असे महत्त्व आहे. विशेष म्हणजे पंतप्रधान मोदी जुलै महिन्यात ब्रिटनच्या दौऱ्यावर गेले होते. त्यावेळी झालेल्या द्विपक्षीय चर्चेच्या प्रारूपावर दोन देशांत झालेल्या कराराने कळस चढला आहे. भारत आणि ब्रिटन यांच्यात करार होणे, या घटनेला एक वेगळे महत्त्व आहे, ते म्हणजे १९४७ पर्यंत म्हणजे जवळपास दीडशे वर्षे आपल्यावर देशावर ब्रिटिशांची हुकुमत होती. आपण इंग्रजांच्या गुलामगिरीत होतो. इंग्रज राजवटीने आपल्यावर अन्याय आणि अत्याचारही मोठ्या प्रमाणात केला होता. त्यांच्या गुलामगिरीविरुद्ध महात्मा गांधींच्या नेतृत्वात देशाने अहिंसक मार्गाने स्वातंत्र्यलढा दिला. त्यामुळे ब्रिटिशांना देश सोडून पळून जावे लागले. मात्र आपला देश सोडून जाताना ब्रिटिशांनी धार्मिक आधारावर देशात फूट पाडली. पाकिस्तानची निर्मिती केली. याची किंमत अजूनही आपल्याला चुकवावी लागत आहे.

तर अशा या ब्रिटनसोबत मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने अनेक द्विपक्षीय करार केले. टेरिफच्या माध्यमातून अमेरिका भारताची शिकार करण्याच्या प्रयत्नात असताना ब्रिटनने त्यांचे 'शिकारी' हे क्षेपणास्त्र भारताला देण्यास सहमती दर्शवली आहे. ब्रिटनचे शिकारी हे क्षेपणास्त्र कमी अंतरावरील शत्रूचे ड्रोन आणि क्षेपणास्त्र हवेत मारा कधन निकामी करण्यात सक्षम आहे. शिकारी क्षेपणास्त्राला मार्कलेटस नावानेही ओळखले जाते. मार्कलेटस हे पुराणातील एका पक्ष्याचे नाव असून जो कधीही विश्रांती घेत नाही, असे म्हणतात. या शिकारी क्षेपणास्त्रामुळे भारताची लष्करी ताकद आणखी वाढणार आहे. ३८८४ कोटी रुपयांच्या संरक्षणविषयक करारावरही यावेळी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी ब्रिटनसोबत शिक्षण, व्यापार आणि तंत्रज्ञानविषयक अनेक करारही करण्यात आले. सध्या ब्रिटनशी आपला ५६ अब्ज डॉलर्स एवढा व्यापार आहे. २०३० पर्यंत तो दुप्पट करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.

शैक्षणिक क्षेत्राबाबतच्या करारामुळे ब्रिटनमधील ९ शिक्षण संस्थांना भारतात आपले कॅम्पस उघडण्याचा मार्ग प्रशस्त झाला आहे. यामुळे आता कोणाला उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची गरज पडणार नाही. परदेशातील शिक्षण संस्थाच भारतात चालून आल्या आहेत. यामुळे भारतातील विद्यार्थ्यांना मोठा फायदा मिळणार आहे. त्यांचा कमीत कमी पैशात उच्च शिक्षणाचा मार्ग खुला होणार आहे. दोन देशांतील चर्चेची सर्वांत मोठी उपलब्धी म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खलिस्तानवादी अतिरेक्यांचा मुद्दा उपस्थित करत त्यांच्यावर कारवाईची मागणी केली. अतिरेकी कारवाया आणि हिंसाचार यांना कोणत्याही लोकशाहीवादी देशात जागा नसते, याकडे मोदी यांनी लक्ष वेधले होते. ज्याला ब्रिटनच्या पंतप्रधानांनी सहमती दर्शवली. ब्रिटनच्या काही भागांत अजूनही खलिस्तानवादी अतिरेकी अधूनमधून डोके वर काढत असतात, त्याचा ब्रिटनला फारसा उपद्रव होत नसला तरी भारताला होतो, हे आपल्याला विसरता येणार नाही.

महत्त्वाचे म्हणजे भारत ही २०२८ पर्यंत जगातील तिसरी मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या मार्गावर आहे, असे कौतुकोद्गार कीर स्टार्मर यांनी काढले, ही आपल्या दृष्टीने अभिमानाची बाब म्हटली पाहिजे. अमेरिकेने भारतावर ५० टक्क्यांपर्यंत टेरिफ लादले आहे. म्हणजे भारतातून अमेरिकत जाणाऱ्या वस्तू ५० टक्क्यांनी महागणार आहेत. याचा फटका भारतीय उद्योगक्षेत्राला जसा बसणार आहे, तसाच तो अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेलाही बसणार आहे. या पृष्ठभूमीवर भारताने ब्रिटनमधून येणाऱ्या वस्तूवरील कर १५ टक्क्यांवरून ३ टक्के करण्याचा निर्णय घेतला आहे. तर भारतातून ब्रिटनमध्ये जाणाऱ्या ९९ टक्के वस्तूंवर ब्रिटनने शून्य टक्के कर आकारण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे. मित्र कसा नसावा, हे जसे अमेरिकेने टेरिफच्या मुद्यावरून भारतासोबत जगालाही दाखून दिले असले तरी मित्र कसा असतो आणि कसा असावा, हे ब्रिटनने आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे, त्याबद्दल ब्रिटनचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. या निर्णयाचा फायदा दोन्ही देशांना होणार आहे.

भारतातील हिंदी चित्रपट रशियासह अनेक देशांत पाहिले जातात. त्यात ब्रिटनचाही समावेश आहे. ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी आपल्या मुंबई दौऱ्याच्या पहिल्या दिवशी यशराज स्टुडिओला भेट दिली. एवढेच नाही तर तीन मोठ्या चित्रपटांची निर्मिती ब्रिटनमध्ये करण्याच्या करारावर स्वाक्षरी केली. दोन देशांत अशा प्रकारचा करार बहुधा पहिल्यांदा झाला असावा. त्यामुळेच भारत आणि ब्रिटन हे एकदुसऱ्याचे नैसर्गिक भागीदार आहेत, असे विधान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. जग अनिश्चिततेच्या भोवऱ्यात सापडले असताना भारत आणि ब्रिटन यांच्या द्विपक्षीय संबंधांना नवीन ऊर्जा मिळाली असल्याचा आश्वासक दावा मोदी यांनी केला, जो व्यवहार्य आणि वस्तुस्थितीला धरून म्हणावा लागेल. भारत आणि ब्रिटन संबंधाचा पाया लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य या संकल्पेनवर आधारित असल्याचा निर्वाळाही मोदी यांनी देत अप्रत्यक्षपणे अमेरिकेच्या थोबाडीत मारली आहे. जगातील सर्वांत जुनी लोकशाही म्हणून टिमकी मिरवणाऱ्या अमेरिकेत सध्या अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची हडेलहप्पी सुरू आहे. राक्षसी टेरिफ आणि एचवन बी व्हिसाच्या मुद्यावरून भारतीयांची कोंडी करणाऱ्या ट्रम्प यांना ब्रिटनचे पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी भारतासमोर सौहार्दपूर्ण मैत्रीचा हात पुढे करून एकप्रकारे त्यांची जागा दाखवली, असे म्हटले तर ते फारसे चूक ठरू नये.

परराष्ट्र संबंध हा कोणत्याही देशाचा आत्मा असतो. आज जग एवढे छोटे झाले आहे की एका देशातील बऱ्या-वाईट गोष्टींचा परिणाम दुसऱ्या देशांवर लगेच होत असतो. रशिया आणि युक्रेन यांच्यात सुरू असलेल्या युद्धाचा परिणाम त्या दोन देशांवर निश्चितच होत असला तरी जगातील अन्य देशही यापासून वाचू शकत नाही. गाजा पट्टीतील संघर्षाबाबतही असेच म्हणावे लागेल. मात्र हे दोन्ही संघर्ष चर्चेच्या आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून सोडवण्याच्या प्रयत्नांचे भारत समर्थन करतो, असे मोदी यांनी म्हटले. तर कीर स्टार्मर यांनी युक्रेनमध्ये तत्काळ आणि स्थायी शांतीची आवश्यकता प्रतिपादित केली. भारताचे परराष्ट्र धोरण जगा आणि जगू द्या, या भूमिकेचे आहे. त्यामुळे भारत स्वतःहून कधी दुसऱ्या देशांवर आक्रमण करत नाही, मात्र त्याला कोणी छेडले तर त्याला तो सोडतही नाही. त्यामुळे भारत आणि ब्रिटन यांच्यातील द्विपक्षीय करार दोन देशांतील संबंधात मैत्रीचा नवा अध्याय सुरू करेल, यात शंका नाही. ▮

## यंगिस्तान

# मोदी सत्तेची २४ वर्षे आणि जेन झी

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

७ ऑक्टोबर २००१. गुजरातमध्ये एक नवीन अध्याय सुरू झाला. नरेंद्र मोदी यांनी पहिल्यांदाच मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्या वेळी 'हा माणूस किती काळ टिकेल' अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. गंमत म्हणजे ही चर्चा करणाऱ्यांना आज लोक ओळखत नाहीत. लोक ओळखतात ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना. ७ ऑक्टोबर २०२५ रोजी या घटनेला तब्बल २४ वर्षे पूर्ण झाली आहेत. या २४ वर्षांत मोदी सातत्याने सत्तेच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. प्रथम गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे पंतप्रधान म्हणून. हा प्रवास एका सामान्य कार्यकर्त्यापासून ते राष्ट्रीय नेत्यापर्यंतचा आहे. एका प्रेरणादायी अशा चित्रपटाच्या रोमांचक कथेसारखा आहे. नरेंद्र मोदी यांचा जन्म १७ सप्टेंबर १९५० रोजी गुजरातच्या वडनगर येथे एका सामान्य कुटुंबात झाला. १९६० च्या दशकात ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेले. १९७० च्या दशकात आणिबाणीच्या काळात त्यांनी भूमिगत राहून संघर्ष केला. नरेंद्र मोदींची राजकारणातील सुरुवात प्रचारक म्हणून झाली, असे म्हणावे लागेल. त्यांनी भाजपासाठी जमिनीवर काम केले, रस्त्यांवर फिरले, सामान्य माणसाच्या घरात जाऊन संवाद साधला. हीच त्यांची खरी ताकद होती. अगदी नवतरुण असताना त्यांनी संघाचा स्वयंसेवक ते प्रचारक म्हणून काम केले असल्याने त्यांना रस्त्यावरची परिस्थिती ठावूक आहे. २००१ मध्ये गुजरातमध्ये भूकंपानंतर राजकीय अस्थिरतेत मोदींना मुख्यमंत्रिपदाची जबाबदारी देण्यात आली. त्यांनी गुजरातला विकासाच्या मार्गावर नेले. वायब्रंट गुजरात समिट्सद्वारे परदेशी गुंतवणूक आणली. कृषी आणि उद्योग क्षेत्रात क्रांती घडवली. ही क्रांती इतकी अद्भुत होती की, गुजरात मॉडेलची चर्चा विरोधकांमध्येही होऊ लागली. २००२ च्या दंगलींनंतर आलेल्या वादळांना सामोरे जात, त्यांनी २००२, २००७ आणि २०१२ च्या निवडणुकांत विजय मिळविला. २०१४ मध्ये त्यांनी राष्ट्रीय नेतृत्व स्वीकारले आणि भारतीय जनता पक्षाला एकहाती बहुमत मिळवून दिले. त्यानंतर २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकांतही ते विजयी झाले. या प्रवासात मोदींच्या डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, स्वच्छ भारत अभियान यांसारख्या योजनांनी देशाला नवी दिशा दिली.

सध्या जिकडे तिकडे 'जेन झी'चे वारे सुटलेले आहे. या पृष्ठभूमीवर नरेंद्र मोदींनी राजकीय सत्तेचे २४ वर्षे पूर्ण करीत २५ व्या वर्षात पाऊल ठेवले आहे. जेन झी म्हणजे १९९७ ते २०१२ दरम्यान जन्मलेली पिढी. म्हणजे आज १३ ते २८ वर्षांतील तरुण मुलं. श्रीलंका, बांगलादेश आणि विशेषतः नेपाळमध्ये हिंसक, अमानवी, भारतीय दृष्टिकोनातून संविधान विरोधी क्रांती झाली. त्यामागे जेन झी होती, असे म्हटले जाते. भारतातील डाव्या हिंसक विचारांच्या लोकांना भारतातही अशी क्रांती हवी आहे. संवैधानिक सत्ता तरुणांनी लाथाडून हिंसक मार्गाने मोदींना



पायउतार करायला लावणे हे स्वयंघोषित पुरोगाम्यांचे दिवास्वप्न आहे. पण पुरोगाम्यांचा आणि जेन झीचा संबंध तुटल्यामुळे, मुळात तो कधीच नसल्यामुळे भारतातील जेन झीला काय हवे आहे, हे तथाकथिक पुरोगाम्यांना माहीत नाही. यासाठी इतर जेन झी पुरोगाम्यांच्या कामी येणारी नाही. मात्र, 'भटके हुए जिहादी नौजवान' हे त्यांच्या कामी येऊ शकतात. असो. आता २०२४ मध्ये निवडणूक झाली तेव्हा भाजपाला अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्या असल्या, तरी एनडीएला बहुमत गाठता आले आहे. याचा अर्थ बहुसंख्य जेन झी ही मोदींच्या मागे खंबीरपणे उभी आहे. कारण मोदी त्यांच्यासाठी विकासाचे प्रतीक आहे. मोदी डिजिटल इंडियाच्या माध्यमातून ऑनलाईन शिक्षण आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देतात.

सोशल मीडियावर 'मोदी है तो मुमकिन है'सारखे ट्रेंड्स जेन झीच चालवते. जेन झीला मोदी का आवडतात? कारण मोदी त्यांच्यासारखेच 'डिजिटल' आहेत. ट्विटर, इन्स्टाग्रामवर सक्रिय आहेत. २०१४ ला मोदी निवडून आल्यानंतर भाजपाच्या आणि मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांना त्यांनी सोशल मीडियावर सक्रिय राहण्याचे आदेश सोडले होते. मोदींमुळे 'रांग संस्कृती' संपुष्टात येत आहे. पूर्वी भारतात काही करायचे असेल तर रांग लावावी लागायची. ही पद्धत वेळखाऊ आणि कंटाळवाणी होती. मोदींनी ऑनलाईन पद्धतीचा प्रचंड प्रचार आणि प्रसार केला. पूर्वी ऑनलाईन व्यवहार नव्हते असे नव्हे; पण मोदींनी त्रुटी शोधून उपाय केले. डिजिटल पेमेंटची किती लोकांनी थट्टा केली होती आठवतंय का? पण पाश्चात्त्य देशांना मागे टाकून भारत डिजिटल पेमेंटमध्ये आघाडीवर आहे. फुले विकणारी अडाणी आज्जीसुद्धा डिजिटल पेमेंट स्वीकारते, ही खरी क्रांती आहे. सर्वसामान्य जनतेला नाटकांच्या दुनियेबद्दल फारसे माहीत नाही म्हणून हे उदाहरण देतोय. पूर्वी नाटकाचे सेन्सॉर करायला प्रत्यक्ष जावे लागायचे. ती प्रक्रिया कंटाळवाणी होती. आता नाटकाचे सेन्सॉर ऑनलाईन होत आहे. महाराष्ट्राच्या कोणत्याही जिल्ह्यातील, गावातील लेखक त्याची संहिता मोबाईलच्या माध्यमातून सेन्सॉर करून घेऊ शकतो. अशा गोष्टी जेन झीला आकर्षक वाटतात. त्याचबरोबर शत्रूशी व्यवहार करताना मोदींची कठोर निर्णयक्षमता, जसे की सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक, ऑपरेशन सिंदूर यामुळे तरुणांच्या आतमध्ये असलेली रग जिरते. पूर्वी चित्रपटांच्या माध्यमातून तरुण आपली रग जिरवू शकत होता. म्हणूनच अमिताभचा 'अँग्री यंग मॅन' खूप गाजला. पाश्चात्त्य राष्ट्रांत बॅटमॅनसारखे कॅरेक्टर म्हणूनच यशस्वी झाले होते. आता भारतात अँग्री यंग मॅनचा शोध या पिढीला चित्रपटांत घ्यायची गरज नाही. त्यांच्या ७५ वर्षांच्या पंतप्रधानाच्या निर्णयांमध्येच त्यांना 'अँग्री यंग मॅन'चा साक्षात्कार होतो. म्हणूनच '५६ इंच का सीना' हा डायलॉग खूप गाजला.

मात्र, भारतातील डावे हिंसक संविधानविरोधी लोक जेन झीला मोदींच्या विरोधात भडकवण्याचा प्रयत्न करीत आहेत. खरे पाहता, या पिढीने काँग्रेसला नाकारले आहे. ही पिढी डाव्यांच्या मेंदूप्रमाणे सडकी नाही, तर लोकशाही आणि संविधानावर विश्वास ठेवणारी आहे. ही पिढी हिंसक क्रांतीचे स्वप्न पाहणाऱ्या डाव्यांना उत्तर देते, पण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संवैधानिक पद्धतीने. आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला १०० वर्षे पूर्ण झाली आहेत. विजयादशमीला सुरू झालेल्या या संघटनेने राष्ट्रनिर्माणात योगदान दिले आहे. संघाची 'जेन झी'सुद्धा सज्ज झाली आहे. शाखांमध्ये सक्रिय, सेवा कार्यात सहभागी होत आहे. ही पिढी राष्ट्रसेवेसाठी पूर्णपणे तयार आहे. ही पिढी डाव्यांच्या हिंसक सत्ता निर्माणाच्या स्वप्नांना धक्का लावत आहे. संघ एक मजबूत किल्ला झाला आहे आणि संघाची जेन झी संघाचे मजबूत खांदे आहेत जणू... डाव्या विचारधारेच्या लोकांना वाटतं की, जेन झी दिशाहीन आहे, पण हे चूक आहे. जेन झी ही शिवधनुष्य उचलणाऱ्या प्रभू श्रीरामांच्या आदर्शावर चालणारी आहे. म्हणूनच राम मंदिराच्या निर्माणावेळी जेन झीने जल्लोष केला होता. ही पिढी निधर्मी नसून धार्मिक आहे; त्याचबरोबर विज्ञानवादीदेखील आहे. मोदींच्या २४ वर्षांच्या सत्ताकाळात अनेक राजकीय सुधारणा दिसून आल्या. जेन झी ही या प्रवासाची साक्षीदार होत आहे. हीच पिढी भारताला पुढे घेऊन जाणार आहे. मागून जेन अल्फा तयार होत आहे. ▮

writerjayeshmestry@gmail.com

# व्यक्ती निर्माणातून राष्ट्र निर्माण
## राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची शताब्दी

अदिकाव्य रामायणात भगवान श्रीराम लक्ष्मणाला सांगतात 'जननी जन्मभूमीश्चः स्वर्गादपी गरीयसी' आई आणि मातृभूमी ही स्वर्गापेक्षाही श्रेष्ठ असते. याच विचारधारेचा वारसा पुढे नेत मातृभूमीच्या उत्थानासाठी निस्वार्थ, त्याग, सेवा आणि शिस्त यांचा संगम साधणारी संस्था म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. विजयादशमी, इ.स. १९२५ रोजी नागपूर येथे डॉ. केशव बळीराम हेडगेवार या दूरदृष्टीसंपन्न राष्ट्रभक्ताने राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना केली. आज या संस्थेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. ही केवळ शतकपूर्ती नाही तर त्याग, सेवा आणि राष्ट्र निष्ठेचो स्वर्णगाथा आहे. या शतकामध्ये लाखो स्वयंसेवकांनी आणि प्रचारकांनी संघाच्या ध्येयासाठी अखंडपणे, अविरतपणे कार्य केले. तीन वेळा बंदी, उपेक्षा आणि संकटांचा सामना करूनही संघ कधीच विचलित झाला नाही. संघाने दाखवून दिले की, स्वार्थ त्यागाशिवाय काम उभे रहात नाही आणि बलिदानाशिवाय क्रांती होत नाही.

**संघ - राष्ट्रीय चारित्र्य निर्माणाची कार्यशाळा** - संघाच्या शाखांवर बालपणीच शिस्त, संघ भावना, राष्ट्र निष्ठा आणि सेवा यांचे संस्कार दिले जातात. संघ स्वयंसेवक म्हणजे स्वयंपूर्ण, परोपकारी, कर्तव्यनिष्ठ व्यक्ती. तो पदासाठी नव्हे तर दायित्वासाठी कार्य करतो. संघात कोणताही पदाधिकारी स्वतःला 'अमूक पदावर आहे' असे न सांगता 'माझ्याकडे अमूक दायित्व आहे' असे म्हणतो. ही भावना दर्शविते की, संघात पदाला नव्हे तर कार्याला आणि उत्तरदायित्वाला अनन्यसाधारण महत्व आहे. गीतेतील वचन 'न में कर्मफले स्पृहा' मला कर्मफळाची अपेक्षा नाही.

**सेवाभावातून राष्ट्रभाव** - स्वयंसेवकाच्या अंतःकरणात देशभक्ती हीच प्रेरणा असते. त्याच्यासाठी प्रश्न असतो 'देश माझ्यासाठी काय करतो ?' 'नव्हे तर मी देशासाठी काय करतो?' हीच वृत्ती राष्ट्रनिर्माणाची बिजे रोवतो, स्वातंत्र्यवीर सावरकर म्हणतात, 'हे मातृभूमे, तुजला मन वाहिले ' मन वाहून गेले की, भौतिक अपेक्षा नष्ट होतात. संघातील प्रत्येक स्वयंसेवक हेच तत्व आचरणात आणतो.

**वसुधैव कुटुंबकमब - समरसतेचा मार्ग** -आज संघाचे हजारो सेवा प्रकल्प देशभर कार्यरत आहेत. ३५ कोटींपेक्षा अधिक लोक या कार्याशी जोडले गेले आहे. परदेशातही संघाच्या शाखा चालतात. संघाचा मूलमंत्र आहेवसुधैव कुटुंबकमब, संपूर्ण पृथ्वी हे एक कुटुंब आहे. संघात जात, पंथ, धर्म, वंश या भेदांना स्थान नाही. संघ म्हणतो 'वयंम सर्वे सहोदराः आपण सर्व एका मातृभूमीचे अपत्य आहोत. समरसता हेच संघाचे अधिष्ठान आहे.

**संघाचे कार्य व्यक्तीपासून राष्ट्रापर्यंत** -संघाची श्रद्धा आहे 'इदं न मम, इदं राष्ट्राय स्वाहा' हे माझे नाही तर हे राष्ट्रासाठी अर्पण आहे. संघ मानतो की, राष्ट्रनिर्मिती ही व्यक्ती निर्माणातूनच सुरू होते. व्यक्ती घडली, तर कुटुंब घडते, कुटुंब घडले की समाज घडतो आणि समाज घडला की राष्ट्र उज्वल बनते. म्हणून संघाचे संपूर्ण कार्य व्यक्ती निर्माण या पायावर अवलंबून आहे.

**संघाचे पंचसूत्री अभियान** -आज संघ समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संवर्धन, स्वबोध आणि नागरी शिष्टचार या पंचसूत्री तत्वांवर काम करीत आहे. ही अभियाने केवळ समाज सुधारणेची नव्हे, तर संस्कारसंपन्न राष्ट्र निर्मितीची दिशा दाखवितात.

**संघाची शताब्दी दृढनिश्चयाची वाटचाल** - १९२५ ते २०२५ हा काळ म्हणजे निष्ठा, त्याग आणि राष्ट्रभक्तीचा अमृतकाळ, या शंभर वर्षाच्या प्रवासात संघाने भारताच्या आत्म्याला जागविले, व्यक्तीमत्वांना घडविले आणि राष्ट्रभावनेचा ज्योतीष्क प्रज्वलित ठेवला. आज संघ शताब्दी साजरी करीत असताना हो शताब्दी फक्त गौरवाची नाही तर पुढील पिढ्यांना प्रेरणा देणारे आहे, 'व्यक्तो निर्माणातून राष्ट्र निर्माण' आजही तितकाच जीवंत आणि प्रासंगिक आहे. संघ हे केवळ संघटन नव्हे तर विचार आहे. एक शिस्तबद्ध, राष्ट्रनिष्ठा, संस्कारित आणि समरस भारत घडविण्याचा हा विचार भारताच्या शिरावरचा तेजोमय दिपस्तंभ आहे. संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त सर्व स्वयंसेवकांना आणि राष्ट्रभक्तांना कोटी कोटी शुभेच्छा.

**- सचिन जगताप**

## प्रासंगिक...

# सप्तशक्ती संगम

**श्रीकांत देशपांडे**

संघ शताब्दीच्या निमित्ताने अखिल भारतीय विद्या भारती द्वारा विद्यालय स्तरीय सप्तशक्ती संगम हा कार्यक्रम पाच ऑक्टोबर २०२५, राणी दुर्गावती जयंतीपासून सुरू होऊन, २३ जानेवारी २०२६ सुभाषचंद्र बोस जयंतीपर्यंत चालणार असून महिलांद्वारा, महिलांसाठी एक अनोखा असा प्रयोग आहे.

श्रीमद्भगवद्गीतेमधील दहाव्या अध्यायातील चौतिसाव्या श्लोकात भगवान म्हणतात,

कीर्तिः श्री वाक् च नारीणां स्मृतिर् मेधा धृतिः क्षमा ॥

स्त्रियांमध्ये दिसणारे यश (कीर्ती), समृद्धी (श्री), वाणी (वाक्), स्मृतिशक्ती (स्मृति), बुद्धी (मेधा), धैर्य (धृति) आणि क्षमा (क्षमा) हे माझेच अंश आहे. भारतीय महिला ही केवळ एक व्यक्ती नाही तर ती एक संपूर्ण चेतना आहे जी कुटुंबाचा पाया आहे, समाजाची प्रेरणा आहे, राष्ट्राचा आत्मा आहे. शतकानुशतके, महिलांना मानवता आणि निसर्गाप्रति जबाबदारी घेणारी म्हणून आदरणीय मानले जाते. भारतीय संस्कृतीत, महिलांना शक्ती, करुणा, प्रेम, समर्पण आणि त्यागाचे मूर्त स्वरूप मानले जाते. ती कुटुंबाच्या प्रतिष्ठेची रक्षक आहे, समाज उभारणीत मार्गदर्शक आहे आणि आई, पत्नी, बहीण आणि मुलगी अशा विविध भूमिकांमध्ये, ती अनुक्रमे प्रेरणा, विश्वासपात्र आणि आशेचा किरण बनून जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात कर्तव्याचा एक अद्भुत समन्वय सादर करते.

भारतीय स्त्रीमध्ये असे अनेक अंतर्निहित गुण आहेत जे बाह्य स्वरूपाच्या पलीकडे जातात आणि तिला लक्षणीय बनवतात. तिची लवचीकता, संयम, करुणा, निःस्वार्थ सेवा आणि जन्मजात शहाणपण हे असे गुण आहेत जे संकटाच्या काळात उदयास येतात आणि केवळ तिच्या कुटुंबाला, समाजाला आणि राष्ट्रालाच नव्हे तर संपूर्ण मानवतेला दिशा देतात. प्राचीन भारतात, गार्गी, मैत्रेयी आणि अनसूया यासारख्या अनेक स्त्रिया ज्ञान, तपस्या, नैतिकता आणि शिक्षणाचे प्रतीक होत्या. आधुनिक काळात, महिलांनी शिक्षण, प्रशासन, उद्योग, शेती, संरक्षण आणि क्रीडा यासह सर्व क्षेत्रांत आपली उपस्थिती निर्माण केली आहे.




संयुक्त कुटुंबे, सामूहिक राहणीमान, निसर्गाशी सुसंगत अन्न आणि वर्तन, परंपरा आणि सण, पर्यावरणाप्रति व्यावहारिक वर्तन इत्यादी असे अनेक विषय आहेत जे जागतिक शांततेला हातभार लावतात. भारतीय महिला या सर्वांचा पाया आहेत आणि त्या हे काम केवळ त्यांची जबाबदारीच नाही तर त्यांचा धर्म देखील मानतात.

संघ शताब्दी वर्षात प्रवेश करताना अनेक कार्यक्रम राबवत असताना विद्या भारतीने भारतीय कुटुंब व्यवस्थेतील महत्त्वाची भूमिका असलेल्या नारीला केंद्रस्थानी मानून सप्तशक्ती संगम हा कार्यक्रम राबविण्याचे ठरवले आहे. नारी ही सृष्टीचा आधारस्तंभ असून, तिच्याशिवाय जीवन अपूर्ण मानले जाते. ती आई, बहीण, पत्नी आणि कन्या या रूपांत समाज आणि कुटुंबाला घडवते, नारी समाजाची आदर्श शिल्पकार आहे, जी कुटुंबात संस्कार फुलवते आणि समाजाची निर्मिती करते तिच्यावर लक्ष केंद्रित करते.

भारतीय कुटुंबातील शाश्वत विकास आणि जीवनमानाची गुरुकिल्ली जर कोणी असेल तर ती मातृशक्ती आहे. नुकतीच नवरात्रीमध्ये घरोघरी देवीची आराधना केली गेली. भारतीय संस्कृतीत नारीला देवीसमान मानले जाते, कारण ती जीवन निर्माण करणारी शक्ती आहे. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' या संस्कृत श्लोकानुसार, जिथे नारीची पूजा होते तिथे देवता निवास करतात.

त्यामुळेच देशभरात निदान १५ हजार सप्तशक्ती संगम कार्यक्रमाद्वारे ७५ लाख महिला सहभागी करून ३.५ कोटी परिवारांसोबत संपर्क करून भारतीय दृष्टिकोनातून कुटुंब प्रबोधन आणि पर्यावरणसंबंधी भारतीय विचार आणि आचार त्यांच्यापर्यंत पोहचविताना भारताच्या विकासात महिलांचे योगदान या माध्यमातून शिशु, बाल, तरुण वयात पालकांनी आपल्या कुटुंबात केले जाणारे संस्कार, श्लोक, कविता, गोष्टी, नाट्य, नृत्य, पोहणे यातून व्यक्तित्व विकास करताना, शिस्त, नियमित दिनचर्या, यातून स्वाभिमान निर्माण व्हावा म्हणून महापुरुषांचे चरित्र वाचणे किंवा ऐकणे यासाठी प्रयत्न करताना, भविष्याची रूपरेषा काय असावी त्यासाठी मुलांसोबत चर्चा करून विविध क्षेत्रांतील प्रेरणादायी व्यक्तींना घरी आमंत्रित करून त्यांचे विचार मुलांनी ऐकून प्रेरणा घ्यावी असा प्रयत्न करावा. त्याचप्रमाणे स्वबद्दल स्वाभिमान निर्माण करण्यासाठी स्वभाषा, भूषा, भोजन, भ्रमण आणि भजन यावर घरी भर देऊन, पर्यावरण रक्षण करण्यासाठी जन, जमीन, जल, जंगल, जनावर यांना समोर ठेवून किमान वृक्षारोपण, जल संरक्षण आणि पॉलिथिनमुक्त समाज असे तीन उपाय करून आपण पर्यावरण रक्षण करू शकतो हा भाव कुटुंबात निर्माण केल्यास मुलांच्या मनात सेवाभाव निर्मिती करण्याची किमया महिला करू शकतात. सप्तशक्ती जागृत करून समाज परिवर्तनातून समृद्ध भारत निर्माण करणे हा यामागील उद्देश आहे. तरी शिक्षण संस्था संचालक, मुख्याध्यापक आणि सर्व शिक्षकांना विनम्र आवाहन आहे की आपल्या विद्यालयामध्ये माता पालकांसाठी कार्यक्रम आयोजित करावा. चला तर मग आपण सर्व मिळून समृद्ध भारत निर्मितीसाठी एकत्र येऊ आणि सुसंस्कार, समर्पण, सेवाभाव या माध्यमातून सप्तशक्ती जागृती करून सशक्त, सुदृढ आणि सुंदर भारत बनवू या. ▮

अध्यक्ष, विद्या भारती, नागपूर महानगर

## आजचे संघगीत

### आम्ही पुत्र अमृताचे

आम्ही पुत्र अमृताचे आम्ही पुत्र या धरेचे
उजळून आज दावू भवितव्य मातृभूचे ॥धृ॥

पृथ्वीस जिंकणारे आले अनेक येथे
नाही निशाण त्यांचे उरले जगात कोठे
गेली सहस्र वर्षे लढलो न थांबताही
गझनी सिकंदराची उरली न मृत्तिकाही
आम्ही काळपुत्र आम्हा येईल मरण कैसे ॥१॥

हे राष्ट्र संकटांशी लढले अनेक वेळा
कोणी न जिंकले हे भासे अजेय काळा
आदर्श जीवनाचा हा वृक्ष अमर याला
जरी तोडिले बळाने तरी स्पर्शितो नभाला
त्याचेच पुत्र आम्ही जयवंत जे सदाचे ॥२॥

जरी काळकूट प्यालो तरी नाही मृत्यु आला
अग्नीत पद्मिनीचा जळतो कधी न आत्मा
दाहीर कन्यकांचे जरि देह आज नुरले
आत्मे तरी तयांचे अतीदिव्यरूप झाले
ते प्राण आमुचे अन् आम्ही प्राण या जगाचे ॥३॥

ही चिन्मयी भरतभू जगतास ज्ञान देता
ही देव जन्मभूमी धर्मास ग्लानी येता
ही मूर्त अन्नपूर्णा जगतास पाळताना
जी काली रूप घेते दुष्टास शासताना
या माऊलीस अर्पू गुरुस्थान या जगाचे ॥४॥

## वाचक पत्रे

### देवदुर्लभ संघशताब्दी

१९२५च्या विजयादशमीला डॉ. केशव बळीराम हेडगेवार, या राष्ट्रभक्त नेत्याने एक रोपटे नागपूरच्या भूमीत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावाने रुजवले. अशी संघटना संपूर्ण विश्वात दुसरी नाही. इथे आज शंभर वर्षानंतरही संस्थेत प्रवेश घेण्याची काही प्रक्रिया, कागदपत्रे, शुल्क लागत नाही. तुम्ही संघाच्या कोणत्याही शाखेत गेले, भगव्या ध्वजाला प्रणाम केला, व्यायाम योग, खेळ, गीत, प्रार्थना म्हटली की झाले तुम्ही संघ स्वयंसेवक.

इथे कोणतीही गोष्ट लपून छपून कधीच होत नाही. सगळा पारदर्शी कारभार. जात-पात, उच्च-नीच, गरीब-श्रीमंत असा कोणताही भेद कधीच पाळला जात नाही. अनुशासन, वरिष्ठाची आज्ञा पाळणे, समय पालन, मुख्य म्हणजे स्वतःचा गणवेश स्वतः विकत घेणे, कोणताही कार्यक्रम/बैठक स्वतःच्या वाहनाने किंवा स्वतः खर्च करून उपस्थित राहणे आणि वर्षातून एकदा गुरुदक्षिणेच्या कार्यक्रमात स्वतःला शक्य तेवढी गुरुदक्षिणा भगव्या ध्वजाला अर्पण करणे. मला काय मिळेल हे न पाहता संघाला तन, मन, धनाने सहकार्य करणे. ती राशी कोणी किती दिली याचा कधीही कुठेच उलेख होत नाही.

राष्ट्र प्रेमाने ओतप्रोत, अनवरत, निरलस, आपपरभावहीन कर्म करणाऱ्या अनाम लोकोत्तर पुरुषांचा संघ, म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ. आज एक, तुम्हाला काहीही भौतिक लाभ न देऊ शकणारी संघटना, काही वर्षे निरंतर, ध्येयापासून न भरकटता कार्य करत असेल ही अशक्यप्राय गोष्ट आहे. अशी संघटना ज्या संघटनेला जातीयवादी, बुरसटलेल्या, प्रतिगामी, इतिहासात रमणारी अशा खोट्या प्रचाराने समाजाची सतत दिशाभूल करणे हाच विरोधकांचा उद्देश राहिला आहे.

गांधी हत्येचा दुरुपयोग करत आणलेली १९४८ ची संघबंदी, १९७५ची आणिबाणीतील संघबंदी, संघ स्वयंसेवकांच्या अमानुष हत्या, तरी हातावर शिर घेऊन संघकार्याचा प्रचार करणारे, कोणत्याही प्रसिद्धीपासून दूर राहून समाजाभिमुख कार्य करणारे प्रचारक ही संघाची खरी पुंजी. आज ही दैवी संघटना लाखो अडथळे पार करत विजिगीषुवृत्तीने देशातच नव्हे संपूर्ण विश्वात आपली शताब्दी संपन्न करत आहे. खरोखर देवदुर्लभ संघ शताब्दी वर्षात विविध कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होणे हे नक्कीच गतजन्मीचे संचित. असा हा संघाचा शंभर वर्षांचा कंटकाकीर्ण मार्गांवरील प्रवास, भारतमातेला नक्कीच भविष्यात गतवैभव प्राप्त करून देईल.

**रवी वाघमारे**/नागपूर

### उपाययोजना करूनच संकटांवर मात शक्य

१० ऑक्टोबर २०२५ च्या तरुण भारतातील अग्रलेखाने इस्पितळातील अतिदक्षतेचा मागोवा घेताना तो मृत्यूचा सापळा का ठरावा यावर मार्मिक विवेचन केले आहे. देशभरातील रुग्णालयांत अशी अप्रिय घटना घडल्यानंतरची शासकीय औपचारिक घोषणा आणि केलेल्या तरतुदी, तूटपुंज्या ठरण्यास कारणीभूत कोण आहे यावर खरे तर वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी यांची भारतीय स्तरावर समिती स्थापन करणे आवश्यक आहे. अतिदक्षता विभागात तेथील नर्स आणि परिचारिका यावरच सेवा शुश्रूतेची मदार असते हे वास्तव आहे. वेळोवेळी तेथील इलेक्ट्रॉनिक संसाधनांची तपासणी करण्यासाठी प्रत्येक रुग्णालयात टेक्निशियन असणे किंवा फिरते पथक संलग्न केल्यास असे अपघात टाळता येऊ शकतात. रुग्णालयातील प्रशासकीय अधिकारी यांच्या अनुभवातील एक त्रैमासिक अहवाल तेथील सर्जन यांनी प्रसारित केल्यास रुग्णालयातील कर्मचारी जागृत राहून संभाव्य अपघात टाळू शकतील. ▮

**वि. ल. उईके**/८२७५५२८०१६

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

CMYK

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## जिल्हाध्यक्षपदी शिवाजी राठोड यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ ऑक्टोबर**

भारतीय जनता पार्टीच्या भटक्या विमुक्त आघाडीच्या जिल्हा अध्यक्षपदी क्षलल चे संचालक तथा युवा उधोजग श्री मिथुन शिवाजी राठोड यांची निवड करण्यात आली आहे.

ही निवड भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून या निवडीच्या निमित्ताने जिल्ह्यातील विविध तसेच तालुक्यांतून कार्यकर्त्यांनी राठोड यांचा सत्कार करून अभिनंदन केले.



राठोड यांनी पक्षाच्या धोरणांनुसार भटक्या विमुक्त समाजाच्या प्रश्नांवर काम करण्याचा आणि पक्षवाढीसाठी तत्पर राहण्याचा निर्धार व्यक्त केला असून या निवडीचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे,



## संक्षिप्त वृत्त...



### आरळीचा पैलवान सम्यक गायकवाड विभागस्तरावर उपविजेता

**तुळजापूर, दि.११ ऑक्टोबर -**

आरळी बुद्रुक येथील जिल्हा परिषद शाळेचा विद्यार्थी आणि श्रीमंत कुस्ती आखाड्याचा पैलवान सम्यक किरण गायकवाड शालेय १४ वर्ष वयोगटातील मॅट कुस्ती स्पर्धेत तालुकास्तरीय प्रथम क्रमांक मिळवला. यानंतर लातूर येथे झालेल्या विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेत सम्यक उपविजेता ठरला. आरळी बुद्रुक येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल मध्ये श्रीमंत कुस्ती आखाड्याचे फौजदार संजय पारवे यांनी स्थानिक तरुणाईला कुस्तीमध्ये मार्गदर्शन मिळावे यासाठी आखाडा व मॅट हॉल निर्माण केले आहेत. सम्यक गायकवाडच्या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक राठोड, आखाड्याचे प्रमुख संजय पारवे, वस्ताद अजित भोसले, पैलवान महेश उकरंडे, महादेव कचरे, बबलू पारवे यांच्यासह स्थानिक कुस्ती प्रेमींनी कौतुक व्यक्त करून अभिनंदन केले आहे.



### तेरणा महाविद्यालयात अभिजात मराठी भाषा सप्ताह समारोप

**धाराशिव, दि.११ ऑक्टोबर -**

तेरणा महाविद्यालय, धाराशिव येथे अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा समारोप सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलनाने करण्यात आली. महाविद्यालयाच्या मराठी विभागतर्फे निबंध, काव्यवाचन व काव्यलेखन स्पर्धा तसेच विविध उपक्रम राबवण्यात आले. समारोप प्रसंगी प्रा. राजा जगताप (मराठी विभाग प्रमुख, रामकृष्ण परमहंस महाविद्यालय) यांनी मराठी भाषा: प्राचीनत्व व वर्तमान परिस्थिती या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. डी. बी. मोरे यांनी मराठी भाषेच्या संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. प्रास्ताविक प्रा. डॉ. अविनाश ताटे, सूत्रसंचालन कुमारी मनीषा जांगीड, आभार कुमारी गायत्री जांगीड यांनी मानले. कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते, आणि समारोप राष्ट्रगीत गायनाने झाला.

### जिल्हास्तरीय शालेय सेपक टकारा स्पर्धेत श्री कुलस्वामिनी विद्यालयाचे यश

**तुळजापूर, दि.११ ऑक्टोबर -**

येथील श्री कुलस्वामिनी विद्यालयाच्या खेळाडूंनी जिल्हास्तरीय शालेय सेपक टकारा स्पर्धेत यश मिळवले आहे.१४ वर्षे व १७ वर्ष मुलींच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवून लातूर विभागीय स्पर्धेसाठी जिल्हा मुलींच्या संघाची निवड झालेली आहे. यशस्वी खेळाडूना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक अनिल धोत्रे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांच संस्थेचे सचिव रामचंद्र आलुरे, ॲड. लक्ष्मीकांत पाटील, ॲड. नागनाथ कानडे, मुख्याध्यापक सिद्धेश्वर कबाडे, अशोक सोमवंशी, दिलीप भालेराव, राजू ससाणे, धनाजी राऊत, बालाजी कोणे, वैशाली कासार, मैंदर्गी, प्रदीप बिरादार, गवळी, दत्ता राऊत यांनी अभिनंदन केले.



### मतदार यादीत घोळ; प्रशासनावर आरोप

**धाराशिव, दि.११ ऑक्टोबर -**

शहरातील मतदार यादीत मोठा गोंधळ झाल्याचा आरोप महाविकास आघाडीकडून करण्यात आला आहे. एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात गेल्याने नागरिकांना मतदानात अडचण येणार असल्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. काँग्रेसचे शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, राष्ट्रवादीचे अय्याज शेख, आणि ठाकरे गटचे सोमनाथ गुरव यांनी हा मुद्दा उपस्थितीत केला आहे.

# जमीन महसुल, वीज बिल, कर्ज व परीक्षा शुल्कात सवलती : जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार

### अतिवृष्टी व पूरग्रस्तांना दिलासा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ ऑक्टोबर -**

जिल्ह्यात जून ते सप्टेंबर २०२५ मध्ये आलेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बधितांसाठी राज्य शासनाने जाहीर केलेल्या विशेष मदत व विविध सवलती लागू करण्यात आल्या आहे.

जिल्ह्यातील धाराशिव,तुळजापूर,उमरगा, लोहारा, भूम, परंडा, कळंब व वाशी या तालुक्यांमधील अनेक गावे अतिवृष्टी व पुरामुळे मोठ्या प्रमाणावर बाधित झाली असून शासनाच्या निर्णयानुसार जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागांना आदेश दिले आहेत. या आदेशानुसार बाधित भागातील नागरिकांना पुढीलप्रमाणे सवलती मिळणार आहेत. यामध्ये जमिन महसुलातून सूट, सहकारी कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीवर स्थगिती (एक वर्षासाठी) तिमाही वीज बिलावर माफी,१० वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्यात आली आहे.



शासनाच्या या निर्णयामुळे पूरग्रस्त व अतिवृष्टीग्रस्त शेतकरी, नागरिक व विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. आदेशाची अंमलबजावणी संबंधित विभागांनी तातडीने करून अहवाल शासनास पाठविण्याचे निर्देशही जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

## इटकळ शिवारात सोयाबीनला आग

**शेतकऱ्यांचे जवळपास अडीच लाखांचे नुकसान**

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.११ ऑक्टोबर -**

इटकळ येथील शेतकरी अंबादास भानुदास हाक्के यांच्या ५ एकर सोयाबीनच्या ढिगास दि.१० ऑक्टोबरच्या मध्यरात्री अज्ञात व्यक्तीने आग लावल्याची घटना घडली. यामुळे सोयाबीनसह प्लास्टिक पाईप व दोन ताड पत्री जळून अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले.



शेतकरी हाक्के यांनी आपल्या पाच एकर शेतातील पाच पिशव्या सोयाबीन ढिगात मातीवर लावलेल्या सोयाबीनची काळजी घेतली होती, मात्र आग लागल्याने मोठ्या कष्टाने पिकविलेला सोयाबीन भस्मसात झाला. ही माहिती मिळताच कृषि अधिकारी कुलकर्णी, तलाठी तोडकरी, पोलीस हेड कॉन्स्टेबल संदीप कोळी व पोलीस पाटील विनोद सलगरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. पंचनाम्यानुसार, सुमारे दोन हेक्टर क्षेत्रावरील सोयाबीन जळून नष्ट झाली असून, शेतकऱ्यांना त्वरित शासकीय मदत मिळावी अशी मागणी येथील शेतकरी वर्गाने केली.

घटनास्थळी ग्रामविकास अधिकारी नितीन कांबळे, उपसरपंच फिरोज मुजावर, माजी सरपंच अरविंद पाटील व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते.

## भ्रष्टाचाराविरोधात शेतकऱ्याचे आमरण उपोषण सुरू; प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.११ ऑक्टोबर -**

शासकीय योजनांमधील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याच्या मागणीसाठी कळंब तालुक्यातील पानगाव येथील शेतकरी रामचंद्र दत्तात्रय चव्हाण यांनी आपले 'आमरण उपोषण' सुरू केले आहे. काल, शुक्रवार दि. १० पासून पानगाव ग्रामपंचायत कार्यालयासमोर त्यांनी उपोषणाला सुरुवात केली असून, प्रशासन जोपर्यंत दोषींवर कारवाई करत नाही, तोपर्यंत मागे हटणार नसल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

सन २०20 ते २०२५ दरम्यान गावात मंजूर झालेल्या सिंचन विहीर, घरकुल, गायगोठा व फळबाग योजनांमध्ये स्थानिक अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी संगनमत करून लाखोंचा गैरव्यवहार केल्याचा गंभीर आरोप चव्हाण यांनी केला आहे. अनेक कामे केवळ कागदोपत्री दाखवून निधी हडप करण्यात आला, तर काही ठिकाणी अर्धवट काम करून पूर्ण रक्कम उचलण्यात आली, असे त्यांचे म्हणणे आहे.

याप्रकरणी त्यांनी यापूर्वी १९ सप्टेंबर रोजी गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली होती. मात्र, महिनाभरानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई किंवा चौकशीचे आश्वासन न मिळाल्याने, अखेर त्यांनी उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.

## भैरवनाथ शुगरचा बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.११ ऑक्टोबर -**

तालुक्यातील तांदुळवाडी येथील भैरवनाथ शुगर वर्क्स लिमिटेड वाशी येथे २०२५-२६ हंगामासाठी बॉयलर अग्नी प्रदीपन सोहळा दि. ११ ऑक्टोबर, शनिवार रोजी पार पडला. सोहळ्याचे उद्घाटन नवनिर्वाचित चेअरमन अनिल सावंत व व्हाईस चेअरमन विक्रम उर्फ केशव सावंत यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिवशक्ती शेतकरी सहकारी साखर कारखाना वाशीचे माजी संचालक अण्णासाहेब देशमुख, शिवाजीराव धुमाळ, बाबुराव घुले, विष्णू मुरकुटे तसेच तालुक्यातील सर्व शिवसेना पदाधिकारी प्रमुख उपस्थित होते.

प्रस्ताविक तालुका प्रमुख सत्यवान गपाट यांनी केले. नूतन चेअरमन अनिल सावंत यांनी बोलताना सांगितले की, मागील ११ वर्षांपासून कारखान्याचे सतत विक्रमी गाळप चालू असून, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर देऊन समाधान राखले आहे. यावर्षी तीन लाख मे.टन उसाचे गाळप हे उद्दिष्ट असून, भैरवनाथ उद्योग समूहाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त ऊस दर देण्याचा निश्चय व्यक्त केला.



गेल्या तेरा वर्षांपासून बंद अवस्थेत असलेला नरसिंह सहकारी साखर कारखाना, इंदापूर, यावर्षी गाळपासाठी सज्ज करण्यात आला असून, सर्व शेतकऱ्यांनी आपला ऊस गाळपासाठी देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले.

उपस्थितीत सभासद शेतकरी, तोडणी ठेकेदार, कारखान्याचे कर्मचारी व कामगार उपस्थित होते. सोहळ्याचे सूत्रसंचालन बाळासाहेब मांगले यांनी केले तर आभार व्हाईस चेअरमन विक्रम उर्फ केशव सावंत यांनी मानले.

## मराठी भाषेचे संवर्धन करण्याची जबाबदारी युवापिढीवर : प्रा. चंदनशिवे




**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.११ ऑक्टोबर -**

मराठी भाषेचे वैभव टिकवून तिचे संवर्धन करण्याची जबाबदारी आता युवापिढीवर आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र साहित्य संघाचे अध्यक्ष आणि साहित्यिक प्रा. यशवंत चंदनशिवे यांनी केले.

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक (नागपूर) अंतर्गत जिजाऊ मेमोरियल प्रशासकीय सेवा महाविद्यालय, लोहारा (जि. धाराशिव) येथे अभिजात मराठी भाषा दिन सप्ताहानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

प्रा. चंदनशिवे यांनी आपल्या भाषणात संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीतून मराठीला ज्ञानपरंपरेची दिशा दिली आणि छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यव्यवहार कोष तयार करून मराठीला स्वाभिमान दिला, असे सांगितले. मराठी साहित्यिकांनी आपल्या लेखणीद्वारे सामान्य बोलीला साहित्यिक दर्जा दिल्यामुळेच मराठीला अभिजात भाषेचा सन्मान मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

तंत्रज्ञानाच्या युगात वाचन संस्कृती कमी होत चालली असल्याचे सांगत, युवापिढीने वाचन संस्कृती जोपासून मराठी भाषेचा जागर करावा, असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ईश्वरी जमादार, वैष्णवी लोहार, राणी माटे, राधा कुंभार, दिव्या बनसोडे, विकास डोबे यांनी परिश्रम घेतले.

## उमरगा नगरपरिषद निवडणुकीची रंगत वाढली

**घराणेशाही की नवे नेतृत्व? नागरिकांचे लक्ष उमरग्याकडे...**



**आकाश पोतदार**
**उमरगा, दि.११ ऑक्टोबर -**

उमरगा नगरपरिषद निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर शहरातील राजकीय वातावरण तापले असून प्रत्येक गल्लीबोळात चर्चांना उधाण आले आहे. यंदा नगराध्यक्ष पद खुल्या प्रवर्गासाठी आरक्षित झाल्याने राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. त्यामुळे या वेळची निवडणूक घराणेशाही विरुद्ध नवे नेतृत्व अशी ठरणार असल्याचे स्पष्ट संकेत दिसत आहेत.

नगराध्यक्षपद खुले झाल्याने इच्छुकांची संख्या विक्रमी वाढणार हे निश्चित असून, या निवडणुकीत चुरस पाहायला मिळणार आहे. नगराध्यक्षपदासाठी अनेक जुन्या दिग्गजांसह नव्या चेहऱ्यांचीही भाऊगर्दी दिसत आहे. आधीच गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेल्यांना संधी चालून आली आहे, तर नव्या पिढीतील तरुण, शिक्षित आणि सामाजिक कार्यात सक्रिय असणारे अनेक उमेदवारही मैदानात उतरण्याच्या तयारीत आहेत. नगराध्यक्षपद खुले झाल्यामुळे मतदार माऊलीचा आशीर्वाद मिळवण्यासाठी इच्छुकांची स्पर्धा वाढली आहे.

महायुती एकत्र लढणार की स्वतंत्र भाजप असा निर्णय अद्याप स्पष्ट झालेला नाही; तर महाविकास आघाडी मात्र एकत्र लढवणार असल्याचे संकेत आहेत. पक्षीय बलावर की आघाड्यांच्या माध्यमातून लढा दिला जाणार, यावरच पुढील समीकरणे ठरणार आहेत. नगराध्यक्षपदावर डोळा ठेवत अनेकांनी जोडण्या लावण्यास सुरुवात केली असून, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवात त्याचे प्रत्यंतर स्पष्टपणे दिसून आले.

उमरगा शहरात पाच वर्षांपूर्वीच्या निवडणुकापर्यंत ब्राह्मण समाजाचे एक ते दोन नगरसेवक सातत्याने निवडून यायचे शहरात जवळपास ३५० ते ४०० ब्राह्मण समाजाची घरी आहेत. एकीकडे भाजपला सुवर्णकाळ येत असताना भाजपचा एकनिष्ठ असलेला मतदार ब्राह्मण समाज दुरावला जात आहे, अशी शहरात चर्चा आहे.

### पक्ष स्वतंत्र लढाईच्या तयारीत...

सर्व प्रमुख राजकीय पक्षांच्या बैठकींना वेग आला असून, काँग्रेस, भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (दोन्ही गट), शिवसेना (शिंदे गट), शिवसेना (उबाठा गट) तसेच मनसे हे पक्ष स्वतंत्रपणे निवडणूक लढविण्याच्या तयारीत आहेत. काही ठिकाणी आघाड्यांचे संकेत असले तरी अद्याप कोणतीही अधिकृत घोषणा झालेली नाही. खुल्या प्रवर्गामुळे या वेळेस चार ते सहा पॅनल उभे राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

### इच्छुकांची गर्दी आणि बंडखोरीची चिन्हे...

नगराध्यक्ष पद खुल्या प्रवर्गात गेल्यामुळे सर्वच पक्षांमध्ये इच्छुकांची गर्दी वाढली आहे. तिकिट वाटपात गोंधळ निर्माण होण्याची शक्यता असल्याने बंडखोरीची शक्यता नाकारता येत नाही. एका जागेसाठी सहा ते सात उमेदवार इच्छुक असल्याची चर्चा असून, त्यामुळे काही प्रमुख पक्षांनी स्वतंत्र लढतीचा पर्याय खुला ठेवला आहे.

### मुस्लिम व दलित मतदार ठरवतील निकाल...

उमरगा शहरातील राजकीय समीकरणात मुस्लिम आणि दलित मतदारांचे प्रमाण लक्षणीय आहे. या मतदारवर्गाकडे सर्व पॅनलनी आपला मोर्चा वळवला असून, समाजप्रबोधन कार्यक्रम, बैठकांच्या माध्यमातून त्यांच्याशी संपर्क साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत. या घटकांचा झुकाव निवडणुकीच्या निकालात निर्णायक ठरणार आहे.

### संघाच्या पथसंचलनानंतर नव्या चर्चांना उधाण...

दरम्यान, नुकत्याच पार पडलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या भव्य पथसंचलनानंतर शहरात नव्या चर्चांना उधाण आले आहे. या कार्यक्रमातून काही राजकीय संकेत दिले गेले काय, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. काहींच्या मते हा धार्मिक-सांस्कृतिक उपक्रम असला तरी त्याचा अप्रत्यक्ष प्रभाव राजकीय पातळीवर दिसू शकतो.

### नागरिकांचा मुद्दा-विकासच प्राधान्य...

शहरातील नागरिक मात्र या राजकीय हालचालींपेक्षा विकासाच्या मुद्द्यांवर अधिक भर देत आहेत. पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, नाल्यांची स्वच्छता, कचरा व्यवस्थापन, पथदिवे या समस्या सोडविणे हेच त्यांच्या दृष्टीने प्रमुख मुद्दे आहेत.

### घराणेशाही विरुद्ध नवे नेतृत्व-कसोटीची निवडणूक...

एकूणच, उमरगा नगरपरिषद निवडणूक ही यंदा घराणेशाही विरुद्ध नव्या नेतृत्वाची खरी कसोटी ठरणार आहे. कोणाचे पॅनल नागरिकांचा विश्वास संपादन करेल, कोण बदलाचा चेहरा ठरेल, आणि कोणाला शहरवासीयांचा पाठिंबा मिळेल, याकडे केवळ उमरगा नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## पूरग्रस्त गोशाळेला दिलासा; अमरनाथ ग्रुपचा सामाजिक बांधिलकीतून पुढाकार






**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.११ ऑक्टोबर -**

अलीकडील महापूरामुळे कळंब तालुक्यातील अनेक गावांप्रमाणे मंगरूळ येथील नवजीवन गोशाळा देखील गंभीर अडचणीत सापडली होती. सलग पावसामुळे जनावरांच्या चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण झाली होती. या परिस्थितीची जाणीव ठेवून रिव्हर नेस्ट आणि अमरनाथ ग्रुप ऑफ कंपनीज, पुणे यांनी सामाजिक बांधिलकीतून पुढाकार घेत थेट गोशाळेत हिरवा व कोरडा चारा पोहोचविला.

गोशाळेतील सुमारे दोनशे हून अधिक गुरे या पूरस्थितीमुळे अन्नावाचून होती. गोशाळा व्यवस्थापनाने मदतीसाठी आवाहन केल्यानंतर अमरनाथ ग्रुपने तत्काळ प्रतिसाद देत चारा पाठविला. ही मदत थेट मंगरूळ येथील गोशाळेपर्यंत पोहोचविण्यात आली. गोशाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य तसेच ग्रामस्थांनी अमरनाथ ग्रुपचे आभार मानत सांगितले की, ही मदत म्हणजे पूरग्रस्त जनावरांसाठी देवदूतच ठरली. पूरामुळे अडचणीत सापडलेल्या गोशाळेतील जनावरांना या मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला असून, ग्रामीण भागात या उपक्रमाचे कौतुक होत आहे. रिव्हर नेस्ट अमरनाथ ग्रुप ऑफ कंपनीज दादासाहेब जाधव व टीमच्या या पुढाकारामुळे इतर संस्थांसाठीही एक प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले आहे.

### गो-मातांसाठी मदतीचे आवाहन...

अमरनाथ ग्रुपने यापूर्वीही विविध सामाजिक उपक्रमांद्वारे ग्रामीण भागातील विकास, पर्यावरण संरक्षण, तसेच आपत्तीग्रस्तांसाठी मदतकार्य राबविले आहे. समाजाप्रती असलेली जबाबदारी आणि संवेदनशीलतेचा दाखला देत त्यांनी पुन्हा एकदा सामाजिक बांधिलकी जपली आहे. यांनी मदतीसाठी नवजीवन गोशाळा मंगरूळ पाटी (ता. कळंब, जि. धाराशिव) किंवा गो-सेवक अध्यक्षा वैशालीताई बारकुल ८८०५६९६२२१, सचिव प्रशांत दादा मगर ८६००५७८७९६ यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन गोशाळा संस्थापक अध्यक्षा वैशाली बारकुल यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# चेन्नईच्या संस्थेकडून जिल्ह्यात १०६ क्षेत्रा-वरील पाणथळ जमिनीचे सर्वेक्षण

## केंद्र शासनाला अहवाल सादर करणार, पर्यावरण पूरक कामे केली जाणार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ आक्टोबर**

हिंगोली जिल्ह्यातील १०६ पाणथळ क्षेत्रावरील जमिनीचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले असून पाचही तालुक्यातील सर्वेक्षणानंतर त्याचा अहवाल केंद्र शासनाकडे सादर केला जाणार आहे. त्यानंतर पुढील काही दिवसांतच या जमिनीवर पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून कामे घेतली जाणार आहेत.

हिंगोली जिल्ह्यातील पाचही तालुक्यात १०६ क्षेत्रावर पाणथळ जमिनी आहेत. सुमारे ३०० हेक्टर पेक्षा अधिक पाणथळ असलेल्या या जमिनीचे सर्वेखण करण्याच्या सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत. जिल्ह्यातील पाणथळ क्षेत्राचे नकाशे तसेच ब्रिफ डाक्युमेंट तयार करण्यासाठी नॅशनल सेंटर फॉर सस्टनेबल कोस्टल मॅनेजमेंट संस्था चेन्नई यांच्या पथकाद्वारे या पाणथळ क्षेत्राचे सर्वेक्षण सुरू करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी महसूल यंत्रणांची बैठक घेऊन या संस्थेच्या पथकाला आवश्यक माहीती व मदत करण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डी जी पोत्रे, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख प्रशांत बिलोलीकर यांच्यासह इतर विभागाचे विभाग प्रमुख यांची उप-स्थिती होती. सर्व तहसीलदार व नगर परिषदेचे मुख्याधिकारी ऑनलाईन बैठकीला उपस्थित होते.

दरम्यान या संस्थेच्या पथकामध्ये संशोधक डॉ जे सेल्वीन, डॉ के मुरूगन, डॉ सतीश कुमार, रतन बाबू, अक्षय पारसकर, पी जी आदर्श, के अफाम यांचा समावेश आहे. या पथकातील दोन सदस्यांकडून प्रत्येक तालुक्यात पाणथळ जागेची पाहणी केली जात आहे. मागील पंधरा वर्षापूर्वी झालेले सर्वेक्षण व त्यानंतर सध्याची परिसराची स्थिती, पाणथळ जागेचा परिसरातील जमिनीवर झालेला परिणाम, पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून काय उपाययोजना करता येईल याची माहीती घेतली जात आहे. पुढील आठवड्यात पाहणी करून या संदर्भातील सविस्तर अहवाल केंद्र शासनाकडे सादर केला जाणार आहे. त्यानंतरच या ठिकाणी पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून जलसंधारण, वृक्षलागवड यासह इतर कामांबाबत निर्णय घेतला जाणार आहे. या भागात पर्यावरण पूरक कामे केली जाणार आहेत.

# जिल्ह्यातील तीनही पंचायत समितीवर येणार महिलाराज

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ आक्टोबर**

हिंगोली जिल्ह्याच्या पंचायत समितीच्या आरक्षण पदाचे आरक्षण शुक्रवारी जाहीर करण्यात आले असून तीन पंचायत समितीवर महिला राज येणार आहे. कळमनुरी पंचायत समितीचे सभापतीपद सर्वसाधारण गटासाठी सुटल्याने याठिकाणी निवडणुकीत चुरस निर्माण होणार आहे.

जिल्ह्यातील विविध पंचायत समित्यांतील सभापती पदांसाठी आरक्षणाची सोडत आज नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय हिंगोली येथे पार पडली. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली ही सोडत पद्धतीने प्रक्रिया पार पडली. या सोडतीत पंचायत समितीनिहाय सभापती पदांचे आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहे. वसमत-अनुसूचित जाती, औंढा नागनाथ - अनुसूचित जमाती (महिला), सेनगाव -नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला),कळमनुरी- सर्वसाधारण आणि हिंगोली - सर्वसाधारण (महिला) या सोडतीच्या प्रक्रियेस अतिरिक्त जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, प्रकल्प संचालक नामदेव केंद्र यांच्यासह संबंधित अधिकारी तसेच विविध पंचायत समित्यांचे प्रतिनिधी, नागरिक उपस्थित होते.

हिंगोलीत २०, कळमनुरीत २२, सेनगाव २०, औंढा नागनाथ १८, वसमत २४ पंचायत समिती गण आहेत. जिल्हा परिषदेच्या ५२ जिल्हा परिषद गटासाठी तसेच १०४ पंचायत समिती गणासाठी लवकरच निवडणुक होणार आहे. त्यादृष्टीने प्रशासनाकडून जय्यत तयारी केली जात आहे. जिल्हा परिषदेच्या ५२ गटासाठी सोमवारी पाचही तालुक्यात उपविभागीय कार्यालयात आरक्षण सोडत होणार आहे. त्यानुसार उपविभागीय कार्यालयाकडून तयारी पूर्ण करण्यात आली आहे. कळमनुरी पंचायत समितीचे सभापतीपद सर्वसाधारण साठी सुटल्याने कळमनुरी तालुक्यात चुरस निर्माण हा-णार आहे. पंचायत समिती सभापतीपदाचे आरक्षण सुटल्यानंतर आता जिल्हा परिषद गटाच्या आरक्षणाकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

## संक्षिप्त वृत्त

### अवैध वाळू वाहतुक करणारे टिप्पर पकडले

हिंगोली- सेनगाव तालुक्यातील सेनगाव ते आजेगाव रस्त्यावर महसुल मंडळ अधिकारी कल्पना साळवी यांच्या पथकाने आज सकाळी सहाच्या सुमारास अवैध वाळूची वाहतुक करणारे एमएच ३८ एक्स ३९६८ क्रमांकाचे टिप्पर पकडले असून याप्रकरणी सेनगाव पोलिस ठाण्यात आरोपी कृष्णा संतोष राठोड आणि युवराज कैलासराव देशमुख यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच पोलिसांनी सदर टिप्पर ज्याची किंमत २० लाख असून अडीच ब्रास वाळू साठा ज्याची किंमत १५ हजार आहे असा एकूण २०१५००० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पुढील तपास सेनगाव पोलिस करीत आहेत.

### गंगाप्रसाद अग्रवाल यांना अभिवादन



हिंगोली- ज्येष्ठ स्वतंत्रसेनानी तथा सर्वोदय विचारवंत गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या स्मृतिदिना निमित्त वसमत येथे विविध संस्था संघटनांच्या वतीने दि. ११ शनिवारी अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, नशामुक्त भारत अभियान समिती, नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य या संस्था संघटनेच्या वतीने स्वातंत्र्यसेनानी तथा सर्वोदय विचारून तर गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या सातव्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे राज्य कार्याध्यक्ष तथा महामंत्री विशाल अग्रवाल, ज्येष्ठ सर्वोदय कार्यकर्ते प्रकाश अंभोरे, जिल्हाध्यक्ष अध्यक्ष शुभदा सरोदे, गंगाप्रसाद फेदराम, जेजेराव लुंगारे आदींची उपस्थिती होती. स्वातंत्र्यसेनानी गंगाप्रसादजी अग्रवाल यांच्या प्रतिमेस खा-दीचा सूत्रहारार्पण करण्यात आला. गंगाप्रसादजी अग्रवाल लिखित पुस्तकांचे प्रदर्शनाचे आयोजन सर्वोदय मंडळ आणि नशाबंदी मंडळाच्या वतीने करण्यात आले. गंगाप्रसादजी अग्रवाल लिखित पुस्तकांचे वितरण सर्वोदय कार्यकर्त्यांना आले.

### सन्मती कॉलनीतील उघडी डीपी जीवघेणी

हिंगोली- शहरातील सन्मती कॉलनीसाठी उभारण्यात आलेल्या डिपीचे दारे नेहमीच उघडे असल्याने रस्त्यावरून ये जा करणार्या नागरीकांना जीव मुठीत धरुन जावे लागत आहे. दोन दिवसापूर्वी या ठिकाणी रात्रीच्या सुमारास एक मद्यपी जात असताना तो या उघड्या डिपीवर कोसळला. परंतु या ठिकाणी रस्त्यावरून ये जा करणाऱ्या काही नागरीकांच्या निदर्शनास येताच त्यांनी बाजूला असलेल्या काठीने सदर व्यक्तीचे प्राण वाचविले.अनेक महिन्यापासून ही डिपी उघडी असताना त्याकडे महावितरणचे दुर्लक्ष होत आहे. धोकादायक असलेली उघडी डिपी अनेकांसाठी जीवघेणी ठरत आहे. डिपीचे केबल अधून मधून जळत असल्याने कधी कधी डिपीमधून जाळ निघतो.

# शासकीय महाविद्यालयात प्रकल्प प्रेरणा, मानसिक आरोग्य कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ आक्टोबर**

प्रकल्प प्रेरणा व जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम हिंगोली तसेच एम पावर संवेदना प्रकल्प बिर्ला ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने १० ऑक्टोंबर २०२५ रोजी शासकीय महाविद्यालय व रुग्णालय हिंगोली येथे संपन्न झाला.

यावेळी अधिष्ठाता डॉ.चक्रधर मुंगल, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. नितीन तडस यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक मानसिक आरोग्य दिवसानिमित्त कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. सदर कार्यक्रमाला, डॉ. नितीन पुरोहित, डॉ.अवचार सर (मानसोपचार तज्ञ) नर्सिंग विद्यालयाचे प्राचार्य कुलदीप कांबळे, रुग्णालयाचे मेट्रन बाळासाहेब चिंचकर यांनी उपस्थितांना मानसिक आजार, टेलिमानस १४४१६ याविषयी मार्गदर्शन केले. त्याचबरोबर सदर कार्यक्रमासाठी अब्दुल शेख, शांतीरत्न थोरात, रामेश्वर अंभोरे तसेच संवेदना प्रकल्प बिर्ला ग्रुपचे बाळू बगाटे यांनी परिश्रम घेतले.

# सरन्यायधीश हल्ला विरोधात जिजाऊ ब्रिगेडचे निवेदन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ आक्टोबर**

न्यायमूर्ती भूषण गवई हल्ल्याविरोधात जिजाऊ ब्रिगेडच्यावतीने जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांना निवेदन सादर करून ठोस कारवाईची मागणी करण्यात आली.

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याविरोधात आ-पला तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. दरम्यान तातडीने कार्यवाही करा अन्यथा राज्यभर आंदोलन केली जाईल, असा इश-ारा देखील यावेळी जिजाऊ ब्रिगेड च्या वतीने देण्यात आला. यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्षा ज्योतीताई, विभागीय सचिव अर्चनाताई मेटे, हिंग-ोली नुतन जिल्हाध्यक्षा प्रियंकाताई भोयर, छायाताई अंभोरे, ज्योतीताई राऊत, अर्चना मोरे, संगीताताई जोगी आदी जिजाऊ ब्रिगेडच्या पदाधिकारी यावेळी उपस्थित होत्या.

# आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या मदतीसाठी पोलिस तत्पर

## पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचे आवाहन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ आक्टोबर**

कुठल्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना मदत हवी असल्यास नागरिकांनी ११२ या क्रमांकावर संपर्क साधल्यास तातडीने पोलिसांची मदत मिळणार आहे. नागरिकांनी या क्रमांकावर पोलिसांशी संपर्क साधल्यास तातडीने मदत मिळणार असल्याची माहीती पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिली आहे.

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी जिल्ह्या-तील सराईत गुन्हेगारांवर वचक बसविण्यासाठी जिल्ह्यात ऑपरेशन ऑलआऊट सुरू केले आहे. याची चोखपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच आता जिल्ह्यातील नागरिकांनी आपत्कालीन परिस्थितीत घाबरून न जाता ११२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन कोकाटे यांनी केले आहे. संबंधित नागरिकाला तातडीने पोलिसांची मदत मिळणार आहे. याशिवाय सायबर स्कॅममध्ये एखाद्या नागरिकाची फसवणूक झाली आहे असे आढळून आल्यास संबंधित नागरिकांनी १९३० किंवा १९४५ या क्रमांकावर संपर्क साधल्यास तातडीने पोलिसांची मदत मिळणार आहे. नागरिकांनी या दोन्हीही सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले आहे.



**हिंगोली- अवघ्या काही दिवसांवर दिपावलीचा सण आला असून यानिमित्त येथील बाजारपेठेत विविध साहीत्य विक्रीसाठी आले आहेत. बाजारपेठेत साहीत्य खरेदीसाठी नागरिकांची गर्दी होत असून दिपावलीनिमित्त विविध रंगाचे आणि आकर्षक असे आकाशदिवे नागरिकांचे लक्ष वेधून घेत आहेत. छाया- सुनील पाठक**

# हिंगोली, सेनगाव तालुका वाढीव भरपाईच्या यादीत समाविष्ट

## भाजप आ. तान्हाजीराव मुटकुळेंचा पाठपुरावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ आक्टोबर**

शासनाने अतिवृष्टीग्रस्त तालुक्याच्या यादीमधून हिंगोली आणि सेनगाव तालुका वगळल्यानंतर शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त केला होता. परंतु जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळवून देण्यासाठी हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी तत्काळ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी संपर्क साधून परिस्थिती समजावून सांगितली. मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या मागणीची गंभीर दखल घेत दोन्हीही तालुके एकाच दिवसात नवीन शासन निर्णय काढून त्यात हिंगोली आणि सेनगाव तालुका वाढीव भरपाईच्या यादीत टाकले.

हिंगोली जिल्ह्यात ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे मोठे नुकसान झाले. ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीत २ लाख ७१ हजार हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाल्याचे स्पष्ट झाले होते. महसूल प्रशासनाने या ठिकाणी पंचनामे करून शासनाकडे अहवाल देखील सादर केला. त्यानंतर शासनाने २३१कोटी रूपयांचा निधी हिंगोली जिल्ह्याला दिला.

त्यानंतर सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे उरलेसुरले पीकही नष्ट झाले. जिल्ह्याचे प्रमुख पीक समजल्या जाणारे सोयाबीन, कापूस, हळद या पिकांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला मात्र त्यानंतरही शासनाने गुरूवारी दि ९ आक्टोबर रोजी राज्यातील २५३ तालुक्यांचा अतिवृष्टीच्या वाढीव मदतीसाठी शासन निर्णय जारी केला परंतु यामध्ये हिंगोली जिल्ह्या-तील सेनगाव आणि हिंगोली तालुके वगळण्यात आले होते. या प्रकारानंतर या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता आणि संताप व्यक्त होत होता. यानंतर भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी समाज माध्यमात व्हीडीओ जारी करीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा झाली असून त्यांनी हिंगोल व सेनगाव तालुके वाढीव मदतीच्या यादीत टाकण्याचे आश्वासन दिल्याचे सांगितले. शेतकऱ्यांनी शासन निर्णय येईपर्यंत संयम ठेवण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर दि १० आक्टोबर रोजी दुपारी नव्याने शासन निर्णय जारी करण्यात आला असून यामध्ये हिंगोली आणि सेनगाव तालुक्याचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना वाढीव मदत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# तायक्वांदो क्रिडा स्पर्धेत लिटल फ्लावरचे जिल्हा व विभागस्तरावरील स्पर्धेत यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ११ आक्टोबर**

शहरातील जिजामाता नगरातील लिटल फ्लावर इंग्लीश स्कुलचा विद्यार्थी सुरज कोरडे याने जिल्ह-ास्तरीय तायक्वांदो क्रिडा स्पर्धेत प्रथम आला तर विभागीय स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला असून त्याचा संस्था व शिक्षकांच्यावतीने सत्कार करण्यात आला आहे.

क्रिडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे तसेच जिल्हा परिषद हिंगोली, क्रिडा विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या जिल्हास्तरीय तायक्वांदो क्रिडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत विविध शाळे-तील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. लिटल फ्लावर इंग्लीश स्कुलचा विद्यार्थी सुरज भगीरथ कोरडे याने १४ वर्षे वयोगटातून गोल्ड मेडल मिळवीत प्रथम क्रमांक तर विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक पटकाविला आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांच्याहस्ते त्याचा सत्कार करण्यात आला. यावेळी विजय घ्यार, रोहीणी काशिदे, मयुरी ठाकूर, मंजुषा जैन, शुभांगी हजारे, अंकीता वालाले, पूजा लाटे, वेदश्री ठमके, सायली बरडे राणी भुसारे, गीता गाडे, आरती बहादुरे आदींची उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष आणि सर्व जागेवर नगरसेवक निवडून आणणार-आ.संदीप क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ ऑक्टोबर**

बीड नगर पालिकेच्या निवडणुकीत आपलाच उमेदवार नगराध्यक्ष म्हणून निवडून येणार असा विश्वास आ.संदीप क्षीरसागर यांनी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त केला.

आगामी बीड नगर पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दि.११ (शनिवार) रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) च्या वतीने आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व कार्यकर्त्यांची आणि पदाधिकाऱ्यांची महत्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीला मोठी गर्दी पाहावयास मिळाली. हजारोच्या संख्येने कार्यकर्ते, पदाधिकारी आणि इच्छुक उमेदवार उपस्थित होते. या बैठकीत आ. संदीप क्षीरसागर यांनी कार्यकर्त्यांना नगर परिषद निवडणुकी संदर्भातील संघटनात्मक तयारी, उमेदवार निवड प्रक्रिया, प्रचार आराखडा आणि पक्ष बळकटीकरण यावर मार्गदर्शन केले.

यावेळी बोलताना म्हणाले की,अतिवृष्टीच्या पावसामुळे अनेक ग्रामीण भागात नुकसान झाल्यामुळे नगर पालिकेची निवडणूक अगोदर होणार आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधक जातीचे राजकारण करतील. त्यांना न जुमानता जोमाने कामाला लागा. लोकांना काम करून दाखवायचे आहे. लोकांचे काम केले तर लोक डोक्यावर घेतील. लोकांशी संवाद साधून त्यांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी तत्पर रहा. प्रत्येक वॉर्डात कार्यकर्त्यांनी समस्या सोडवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे. येणाऱ्या नगर पालिकेच्या निवडणुकीत पक्ष प्रामाणिक आणि निष्ठावंतांनाच संधी देणार असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी स्पष्ट केले. तसेच बीड नगर पालिकेत नगराध्यक्ष पदाचा आपलाच उमेदवार हा १० हजार मताने निवडून येणार असल्याचा विश्वास व्यक्त केला. तसेच सर्व जागेवर नगरसेवक निवडून येतील. आमदारकीच्या निवडणुकीत सोबत राहिलेल्या आणि माझ्यासाठी एकनिष्ठ प्रामाणिक राहून काम करणाऱ्या जिवाभावाच्या कार्यकर्त्यांसाठी घरातला सदस्य समजून काम करून निवडून आणणार ते असल्याचे सांगून कार्यकर्त्यांना बळ दिले यावेळी आ.संदीप क्षीरसागरांना देखील कार्यकर्त्यांनी देखील आ.संदीप भैय्या जो उमेदवार देतील त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे सांगितले.



यावेळी माजी आमदार सय्यद सलीम, पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांच्यासह पक्षाचे वरिष्ठ नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.शहरातील कोणत्याच प्रभागामध्ये साखळी तुटली नाही पाहिजे. साखळी जर तुटली नाही तर नगर पालिका आपल्याच ताब्यात येणार. जर का कोणी उमेदवार साखळी तोडून गेला तर लोकांना तो माझा उमेदवार नाही असे सांगेल. साखळी तोडणाऱ्याला निवडणुकीत धडा शिकवण्यासाठी जनताच पुढाकार घेईल असा इशारा देखील आ.संदीप क्षीरसागरांनी बैठकीत दिला.

# जन शिक्षण संस्थानच्या विश्वकर्मा लाभार्थ्यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ ऑक्टोबर**

महाराष्ट्रातील सर्व शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अल्पकालीन व्यावसायिक अभ्यासक्रमाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला.दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबई येथून आभासी पद्धतीने पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. मुंबई येथून अभासी कार्यक्रमात राज्याचे राज्यपाल मा.आचार्य देवव्रत जी, मा.मुख्यमंत्री देवेंद्र जी फडणवीस, उप मुख्यमंत्री मा. एकनाथ जी शिंदे, मा.अजित दादा पवार , कौशल्य विकास मंत्री मा.मंगलप्रभात जी लोढा इत्यादी मान्यवर उपस्थित होते. माननीय पंतप्रधानांनी युवकांनी अल्पकालीन कौशल्य प्रशिक्षण घेऊन स्वतःचे उद्योग व्यवसाय सुरू करून स्वावलंबी होण्यासाठी हे अभ्यासक्रम शासकीय खढख मध्ये मिळणार असल्याने युवकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन त्यांनी केले.

बीड येथील कै. विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत संपन्न झालेल्या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून जन शिक्षण संस्थान बीड येथे पी.एम. विश्वकर्मा योजने अंतर्गत प्रशिक्षण घेतलेले विश्वकर्मा श्री बंडू चित्रे हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कै. विनायकराव मेटे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आय एम सी मेंबर व जन शिक्षण संस्थान बीड चे संचालक श्री गंगाधर देशमुख हे होते.या कार्यक्रमाला राणी पद्मिनीबाई शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आय एम सी मेंबर व जन शिक्षण संस्थान बीड च्या कार्यक्रम अधिकारी सौ सीमा ताई मनूरकर, प्रा.बाळासाहेब साळवे श्री रसाळ, प्राचार्य डॉ. उखळीकर साहेब, प्राचार्य श्री पंडित मुने, कौशल्य विकास अधिकारी श्री समाधान किरवले यांची उपस्थिती होती.बीड येथील कार्यक्रमात श्री बंडू चित्रे, माजलगाव येथील कार्यक्रमासाठी श्री राम शामसुंदर पांचाळ,धारूर येथे ज्ञानेश्वर पांचाळ,अंबाजोगाई महादेव क्षीरसागर तर गेवराई येथे अमोल शिवाजी सांगळे ,वडवणी येथे मुंजाबा अंबुरे सर्व जण जन शिक्षण संस्थान बीड पी एम विश्वकर्मा योजने अंतर्गत प्रशिक्षित व यशोगाथा यांना मुख्य अतिथी म्हणून बहुमान मिळाला आहे.

खऱ्या अर्थाने पंडित दीनदयालजी उपाध्याय यांचे अंत्योदय विचाराचे स्वप्न साकारताना सबंध देश पाहत आहे.एवढ्या मोठ्या कार्यक्रमात पी. एम.विश्वकर्मा योजने अंतर्गत प्रशिक्षण घेऊन त्यांना एक लाख रु अर्थसाह्य मिळालेल्या विश्वकर्मा कारागिरांना सन्मान मिळाला आहे. तसेच जन शिक्षण संस्थान बीडच्या दृष्टीने सुद्धा ही अभिमानाची बाब आहे.

# एकनाथ शिंदेंचा बीड जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ ऑक्टोबर**

अतिवृष्टीमुळे बीड जिल्ह्यात निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीने शेतकरी व नागरिक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. या भीषण परिस्थितीत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरणा मानत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. ना. श्री. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसद रत्न खासदार मा. डॉ. श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात देण्यात आला.

शिवसेना कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली दि. ९ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता सिंदफना नदीकाठच्या पूरग्रस्त गावातील शेतकऱ्यांना मदत कीट वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे पूरग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने दिलासा देण्याचे कार्य करण्यात आले. या वेळी ठाणे उपजिल्हाप्रमुख राजेश कदम आणि बीड शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी सांगितले की, मदतीचे तोरण हेच शिवसेनेचे धोरण आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली मदतीचा हात पुढे केला आहे.

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा आनंद सक्रातेची राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेत निवड

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.११ ऑक्टोबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे व छत्रपती संभाजीनगर विभागीय क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने ९ ऑक्टोबर रोजी घेण्यात आलेल्या विभागीय जलतरण स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा चि. आनंद एकनाथ सक्राते हा विद्यार्थी ४००मी. वैयक्तिक मिडले मध्ये द्वितीय आला असून, त्याची लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या विद्यार्थ्याला प्रा. नवनाथ आवारे, प्रा. प्रविण कोरडे, प्रा. चंद्रकांत फड, यांचे मार्गदर्शन लाभले.या यशस्वी विधार्थ्यांचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश दादा सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए.कवळे, प्रा.प्रकाश गवते,



प्रा.पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे, प्रा. एस.एस.टाक. प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक के.बी.भोंडवे, प्रा. सुदर्शन स्वामी,प्रा. मस्के सर. आदींनी शुभेच्छा दिल्या.

# रोटरीच्या नेशन बिल्डर अवॉर्ड पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.११ ऑक्टोबर**

येथील रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या नेशन बिल्डर अवॉर्ड या पुरस्काराचे वितरण खोलेश्वर महाविद्यालयाच्या गोपीनाथराव मुंडे सभागृहात झाले.शिक्षकांचा सन्मान, शांतीचे मूल्य आणि विद्यार्थ्यांची प्रेरणा हेच या उपक्रमाचे खरे उद्दिष्ट होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून शिक्षणतज्ज्ञ महेश पाटील,तर व्यासपीठावर सहाय्यक प्रांतपाल प्रवीण देशपांडे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा रोहिणी पाठक, सचिव मंजुषा जोशी, प्रकल्प संचालक प्रा.संतोष मोहिते,राजेंद्र घोडके, यांची उपस्थिती होती. आपल्या मार्गदर्शनात महेश पाटील यांनी सध्याच्या शिक्षण पद्धतीत शिक्षक ,मुख्याध्यापक आणि विद्यार्थी यांच्यातील समन्वय आणि जे ई ई, नीट या स्पर्धात्मक परीक्षेत तयारीसाठी शालेय स्तरावरील कार्य करण्यास प्रोत्साहन दिले.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक रोटरी अध्यक्ष प्रा.रोहिणी पाठक यांनी केले. प्रकल्प प्रमुख संतोष मोहिते यांनी या पुरस्काराची भूमिका विषद केली. प्रकल्प प्रमुख राजेंद्र घोडके यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संचालन गीतांजली कुलकर्णी यांनी तर पाहुण्यांचा परिचय स्वरूपा कुलकर्णी यांनी करून दिला

हे आहेत पुरस्काराचे मानकरी:

नेशन बिल्डर अवॉर्ड या पुरस्काराने लेफ्ट. डॉ साधना चामले- पन्हाळे(योगेश्वरी महाविद्यालय), सुरेखा काळे(खोलेश्वर शाळा), रागीणी पवार (मुकुंदराज विद्यालय) , स्नेहल लाखे (जिल्हा परिषद,ममदापूर) , सय्यद अफसान बेगम(मिलिया उर्दू स्कूल), तर घाटनांदुर येथील सिनर्जी नॅशनल स्कूल चे मुख्याध्यापक अजहर पठाण ठरले नॅशन पीस बिल्डर चे मानकरी. यांना शाल, पुष्पगुच्छ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देण्यात आले.

शांतता सप्ताहातील बक्षिसे:

शांतता सप्ताह मध्ये घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा आणि निबंध स्पर्धा यातील बक्षीस पात्र विद्यार्थी.चित्रकला -- प्रथम श्रेया मानकरी, द्वितीय .ईशान वाडखेलकर आणि सौमित्र रामदासी, तृतीय आस्था ढेले आणि स्वराली घाडगे,उत्तेजनार्थ गायत्री काकडे.निबंध स्पर्धा - प्रथम तन्मय पवार, द्वितीय मानसी जोगी आणि प्रज्वल पाटोळे, तृतीय आनंदी गीते आणि फायजा मुंशी, उत्तेजनार्थ आरोही राजमाने.

# स्वा.सावारकर महाविद्यालय, बीड येथे राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) युनिटतर्फे भारतरत्न नानाजी देशमुख जयंती निमित्त प्रतिमापूजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ ऑक्टोबर**

स्वा. सावारकर महाविद्यालय, बीड, येथील राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S.) युनिटतर्फे भारत रत्न चंडीकादास अमृतराव देशमुख उर्फ नानाजी देशमुख यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन ११ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य प्रा. डॉ. सुहास मोराळे यांनी भूषविले. त्यांनी भारत रत्न नानाजी देशमुख, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ केला. या प्रसंगी डॉ. टी. पी. सोंडगे (डीन, कला शाखा), डॉ.डी.बी. नागरगोजे (समन्वयक, लाइफलॉन्ग लर्निंग एज्युकेशन), प्रा. संजय काळे (स्टाफ सचिव) तसेच N.S.S. प्रोग्राम ऑफिसर श्री. राजपाल जाधव, श्री. राम गव्हाणे आणि प्रा. सौ. दीपा देशपांडे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये दुपारी १२:३० वाजता करण्यात आले होते. या प्रसंगी प्राचार्य प्रा. डॉ. सुहास मोराळे यांनी आपल्या भाषणात भारत रत्न नानाजी देशमुख यांच्या प्रेरणादायी जीवनाचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी देशमुख यांच्या समाजसेवा, ग्रामीण विकास, शिक्षण आणि राष्ट्रनिर्माणातील बहुमोल योगदानावर प्रकाश टाकला.



आपल्या भाषणात प्राचार्यांनी सांगितले की, नानाजी देशमुख हे खरे अर्थाने समाजकारणी, शिक्षणप्रेमी आणि राष्ट्रसेवक होते. त्यांनी भारतीय जनता संघाच्या सामाजिक शाखेची स्थापना करून समाजातील वंचित घटकांसाठी कार्य केले. दीनदयाळ रिसर्च इन्स्टिट्यूट स्थापन करून ग्रामीण स्वावलंबन, आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रात त्यांनी आदर्श निर्माण केला. त्यांनी आदिवासी कल्याण, महिलांचे सशक्तीकरण आणि ग्रामविकासासाठी अनेक योजना राबवल्या. ग्रामीण युवकांना व्यावसायिक आणि पारंपरिक शिक्षणाद्वारे स्वावलंबी बनविण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. नानाजी देशमुख यांनी राष्ट्रीय एकात्मता, सांस्कृतिक मूल्यांचे जतन आणि अखंड मानवतावाद या विचारसरणीचा प्रसार करून राष्ट्रनिर्मितीत मोलाची भर घातली. त्यांच्या कार्यामुळे ते केवळ राजकारणी नव्हते, तर खरे राष्ट्रपुरुष आणि प्रेरणास्थान ठरले. कार्यक्रमाचा समारोप स्टाफ सचिव प्रा. संजय काळे यांच्या मनःपूर्वक धन्यवादप्रस्तावाने झाला. त्यांनी सर्व मान्यवर, प्राध्यापकवर्ग, विद्यार्थी आणि N.S.S. स्वयंसेवकांचे आभार मानले.

# पिंपळनेर पोलिसांची जुगारावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ ऑक्टोबर**

बीड जिल्ह्याच्या पिंपळनेर पोलिसांनी ११ ऑक्टोबर २०२५ रोजी एका गुप्त माहितीच्या आधारे तिरंट नावाचा जुगार खेळणाऱ्या ५ जणांवर यशस्वी कारवाई केली आहे. या कारवाईत २ लाख ७६ हजार ५१० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

घडलेली घटना:

पोलीस स्टेशन पिंपळनेर येथे कार्यरत गोपनीय अंमलदार पोशि/ ४६८ संतोष वामन तावरे यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार, मौजे म्हाळसजवळा ते पिंपळनेर जाणाऱ्या रस्त्यावर सारंग खांडे यांच्या शेतात चिंचेच्या झाडाखाली काही इसम पैशांवर पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली होती.

कारवाई:

प्रभारी अधिकारी सपोनि श्री. घुगे साहेब यांना ही माहिती कळवल्यानंतर, पोउपनि अर्जुन गोलवाल, ग्रेड पोउपनि दिगांबर मेखले आणि इतर पोलीस कर्मचाऱ्यांच्या पथकाने १४.३५ वाजता खाजगी वाहनाने घटनास्थळी छापा टाकला.

पोलीस पथकाला पाहताच जुगार खेळणारे पाच इसम पळून जाण्याच्या तयारीत असताना त्यांना ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेले आरोपी व गुन्हे:

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपींमध्ये खालील पाच इसमांचा समावेश आहे:

१. नितीन चिंतामन खांडे (वय ४५, रा. पिंपळगाव मजरा, ता. जि. बीड)

२. राजेंद्र भगवान खांडे (वय ३५, रा. म्हासापुर तांडा, ता. जि. बीड)

३. संभाजी गोपीचंद खांडे (वय ३४, रा. पिंपळगाव मजरा, ता. जि. बीड)

४. अनिल रामा कोरडे (वय ३६, रा. म्हाळसापुर, ता. जि. बीड)

५. शिवाजी गोपीचंद खांडे (वय ३४, रा. पिंपळगाव मजरा, ता. जि. बीड)

जप्त मुद्देमाल:

आरोपींकडून आणि जुगाराच्या ठिकाणावरून खालीलप्रमाणे एकूण २,७६,५१०/- किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला:

रोख रक्कम: त्यांच्या अंगझडतीतील रोख रक्कम व जुगार खेळण्याच्या जागेवरची रोख रक्कम

दोन मोटारसायकली: रॉयल इन्फिल्ड (बुलेट) (क्र. चक२३-घ७९५०) आणि होंडा शाईन चार मोबाईल फोन: ओपो (२), रियल मी (१) आणि सॅमसंग (१)

जुगाराचे साहित्य: ५२ पत्त्यांची गड्डी

पोलीस शिपाई संतोष वामन तावरे यांच्या फिर्यादीवरून, सर्व आरोपींविरुद्ध कलम १२ (अ) नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पिंपळनेर पोलीस स्टेशन करत आहे.सदर कारवाई मा पोलीस अधीक्षक नवनीत कावत सो, अपर पोलीस अधीक्षक पांडकर सो तसेच उपविभागीय पोलीस अधीकारी पूजा पवार सो यांच्या मार्गदर्शनात सपोनि मधुसूदन घूगे, पो उपनिरीक्षक अर्जुन गोलवाल, पोलीस उप निरीक्षक मेखले व पोलीस अंमलदार अविनाश सानप, संतोष तावरे यांनी केली आहे.

# पन्नास वर्षांपूर्वीचा रस्ता खुला तहसीलदार शेळकेंची धडक कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.११ ऑक्टोबर**

बीड तालुक्यातील ससेवाडी - मोरगाव परिसरात मागील पन्नास ते साठ वर्षांपासून बंद असलेला जुना रस्ता अखेर खुला झाला . दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली महसूल , पोलीस व ग्रामपातळीवरील प्रशासनाच्या संयुक्त कारवाईतून हा ऐतिहासिक निर्णय प्रत्यक्षात उतरला.



ही कारवाई महाराष्ट्र राज्याचे महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शेतकरी हिताचे निर्णयानुसार विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर आणि बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली . महसूल विभागाच्या शेतकरीहिताच्या धोरणात्मक कार्यपद्धतीचा हा ठोस परिणाम असल्याचे मानले जात आहे .

गेल्या पाच - सहा वर्षांपासून हा रस्ता काही व्यक्तींनी अडवून ठेवला होता. त्यामुळे ससेवाडीच्या सुमारे १५० शेतकऱ्यांना शेतीकामासाठी तसेच नागरिकांना दळणवळणासाठी मोठा त्रास सहन करावा लागत होता . अखेर महसूल प्रशासनाने कायदेशीर चौकटीत राहून धाडसी कारवाई केली आणि रस्ता पुन्हा खुला करून ग्रामस्थांना दिलासा दिला .

या कार्यवाहीदरम्यान मंडळ अधिकारी सोनाली कदम , ग्राम महसूल अधिकारी रेश्मा तानगे , ससेवाडीचे सरपंच अरुण रसाळ , संदीप कदम , एम . खान तसेच अनेक स्थानिक शेतकरी उपस्थित होते . पोलीस प्रशासनाच्या वतीने सहाय्यक उपनिरीक्षक विठ्ठल राठोड , म . पो . रमा तुरुकमारे , पोलीस नाईक सुदाम शेलार यांनी शिस्तबद्ध सुरक्षेची जबाबदारी पार पाडली .

भूमापक ए . बी . चव्हाण , संजय जायभाये आणि ए . एन . बीडकर यांनी रस्त्याच्या सीमारेषा मोजून तांत्रिक अडथळे दूर करत कार्यवाहीची पूर्तता केली . उपस्थित प्रशासनिक पथकाने जेसीबीच्या साहाय्याने रस्त्यावरील अडथळे हटवून मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुला केला . या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले की , शेतकऱ्यांचा हक्क आणि सार्वजनिक मार्ग सुरक्षित ठेवणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे . शासनाच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांच्या हितासाठी आम्ही तत्पर आहोत.

महाराष्ट्र शासनाने अलीकडेच शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय जाहीर केले आहेत . खरीप हंगामासाठी ई - पीक पाहणीस मुदतवाढ देण्यात आली होती . या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना पीकविमा , अनुदान आणि शासकीय योजनांचा लाभ सोयीस्कररीत्या मिळणार आहे . नैसर्गिक आपत्ती नुकसानभरपाई प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी ऑनलाइन पंचनामे प्रणाली राबविण्यात येत आहे . तसेच ड्रोन सर्वेक्षण आणि आधुनिक भूमापन पद्धतीद्वारे नकाशा सुधारणा कार्य देखील सुरू आहे .

तहसीलदार शेळके यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले की , प्रत्येक शेतकऱ्याने स्वतःची ई - पीक पाहणी नोंदणी तात्काळ पूर्ण करावी . शासनाच्या विविध लाभयोजनांसाठी ही प्रक्रिया आवश्यक आहे . ग्राम महसूल अधिकारी आणि तलाठी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करत आहेत.

या कारवाईनंतर ससेवाडी , मोरगाव आणि परिसरातील नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण आहे . अनेक शेतकऱ्यांनी महसूल विभागाचे आभार मानत म्हटले की , प्रशासनाने आमचा हक्काचा रस्ता पुन्हा परत मिळवून दिला . आता आमची शेती , वाहतूक आणि दैनंदिन कामे सहज पार पडतील .

या घटनाक्रमातून महसूल प्रशासनाने आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवत एक आदर्श उदाहरण निर्माण केले आहे . शेतकरीहित , कायद्याचा सन्मान आणि विकास या तिन्ही बाबींचा संगम असलेली ही कारवाई बीड जिल्ह्यात सकारात्मक बदलाचे द्योतक ठरत आहे.

# विहिंप तर्फे आज जिल्ह्यात मंदिर स्वच्छता महाअभियान

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ ऑक्टोबर-**

मंदिर स्वच्छता महाअभियानांतर्गत वि.हिं.प. मंदिर आयामातर्फे १२ ऑक्टोबर रोजी मंदिरे बौद्धविहार जैन मंदिरे स्वच्छता मोहीम राबवली जाणार. विश्व हिंदू परिषद आणि मंदिर अर्चक पुरोहित आयाम नांदेड जिल्हा तर्फे दीपावलीच्या पार्श्वभूमीवर मंदिर बौद्ध विहार जैन मंदिर गुरुद्वारे स्वच्छता रोषणाई व भगवा ध्वज पूजनाचे महाअभियान राबविण्यात येणार आहे.

मंदिराचा गाभारा ते अंगण या संकल्पनेवर आधारित १२ ऑक्टोबर रोजी नांदेड जिल्ह्यात सुद्धा नांदेड शहर व सर्व तालुक्यात सकाळी ७ ते ११ असे ४ तास सर्व भाविक बंधू-भगिनी व सर्व सेवाभावी संस्थांनी मंदिरात येऊन करसेवा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. संपूर्ण नांदेड जिल्ह्यात एकूण ५०० मंदिरांमध्ये तर नांदेड शहरात एकूण २०० मंदिरात स्वच्छता उपक्रम पार पाडण्याचे लक्ष निश्चित करण्यात आले आहे. माझे मंदिर, माझी जबाबदारी हा अभियानाचा मुख्य संदेश आहे दीपावलीच्या उत्सवामध्ये घराघराप्रमाणेच मंदिरावरही रोषणाई करून त्यांना प्रकाशमय आकर्षक करण्याचा उपक्रम राबविण्यात येणार आहे तसेच या काळात मंदिरा-वरील भगवा ध्वज बदलून नवीन भगव्या ध्वजाची प्रतिष्ठापना करण्यात येईल. भगवा ध्वज मंदिरावर लावण्यापूर्वी हिंदू समाजाच्या विविध घटकातील तरुण जोडप्याच्या हस्ते ध्वजाचे पूजन करून नंतरच लावण्यात येणार आहे. यातून समरसतेचा व एकतेचा संदेश दिला जाणार आहे. विश्व हिंदू परिषद मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे हे मंदिर स्वच्छता अभियान तिसऱ्या वर्षात पदार्पण करत असून मागील वर्षी नांदेड जिल्ह्यात ४०० तर नांदेड शहरात ११२ मंदिरामध्ये एकाच दिवशी स्वच्छता अभियान यशस्वीपणे राबवण्यात आले होते. या अभियानात महिला विश्वस्त महिला पुरोहित व भाविकांचा मोठा सहभाग असून संत महंतांनीही अभियानाचे कौतुक करून सहभागाचे आवाहन केले आहे मंदिरे हे केवळ दर्शनाचे केंद्र न राहता स्वच्छता व करसेवेचे केंद्र व्हावे हा या अभियाना मागचा उद्देश आहे सत्यम शिवम सुंदरम या तत्त्वाचे आचरण घडून आणण्यासाठी पर्यावरण विषयात काम करणाऱ्या संस्था स्वच्छता अभियानात भाग घेणाऱ्या संस्था तसेच भाविक भक्त मंदिर विश्वस्त पुरोहित सामाजिक कार्यकर्ते व तरुण कार्यकर्त्यांनी आपल्या जवळच्या मंदिरात जाऊन स्वच्छता सेवा व रोषणाई ध्वज पूजन यात सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे जिल्हामंत्री राजकुमार गोडसे, सहमंत्री गणेश कोकूलवार व मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे जिल्हा संपर्कप्रमुख भास्कर उंचाडकरसह कंधारकर, सचिन भायेकर व महानगर मंत्री कृष्णा इंगळे यांनी केले आहे.

# संयम कोचिंग क्लासवर प्रश्नचिन्ह!

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. ११ ऑक्टोबर-**

उमरी शहरात जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांकडून गेल्या सात वर्षांपासून अनधिकृतपणे चालविल्या जाणाऱ्या संयम कोचिंग क्लास या शिकवणीविषयी संताप व्यक्त केला जात आहे. बाबा महाराज संस्थान च्या इमारतीत २०१८ पासून हे क्लासेस सुरू असून, ८ वी ते १० वी विज्ञान तसेच १० वी ते १२ वी बायोलॉजी व केमिस्ट्री विषयांचे वर्ग येथे घेतले जात असल्याची माहिती समोर आली आहे.

शासकीय नियमांनुसार जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना खासगी शिकवणी घेण्यास स्पष्ट बंदी आहे. तरीदेखील उमरी शहरात गेल्या अनेक वर्षांपासून हे क्लासेस सुरू राहणे हे शिक्षण विभागाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे.

विशेष म्हणजे, तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी दर्शनवाड हे शाळांचा दर्जा उंचावण्यासाठी गावोगावी जाऊन मार्गदर्शन करत असताना, त्यांच्या कार्यालयाच्या अगदीमागेचमोठमोठ्याजाहिरातींसह हे अनधिकृत क्लासेस सुरु आहेत. त्यामुळे गटशिक्षणाधिकाऱ्यांची या क्लासला मूक समंती आहे का? असा सवाल नागरिक व पालक वर्गातून उपस्थित केला जात आहे. अनेक सामाजिक संघटनांनी या अवैध शिकवणीविरोधात संबंधित अधिकाऱ्यांकडे लेखी निवेदने दिली असूनही, आजवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. परिणामी या प्रकरणात शिक्षण विभागाकडून होत असलेल्या दुर्लक्षाबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, शासकीय शिक्षकच जर स्वतःच्या विद्यार्थ्यांकडून शुल्क आकारून शिकवणी घेत असतील, तर शासन नियमांना आणि प्रामाणिक शिक्षकांना धक्का बसतो.

या सर्व घडामोडींवर शिक्षण विभागाने तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी उमरी तालुक्यातील सामाजिक संघटना भीम आर्मी तर्फे पालक व स्थानिक जनतेकडून होत आहे.

## पाचुंदा येथे कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

**माहूर-** माहुर तालुक्यातील पाचुंदा येथील शेतकरी गौतम किशन पाटील (४०) यांनी गत काही वर्षांपासून सततच्या नापिकीत यंदाच्या अतिवृष्टीची पडलेली भर यामुळे नापिकीतून ओढवलेल्या कर्जबाजारीपणाला कंटाळून राहत्या घरी विष प्राशन करून



आत्महत्येचा प्रयत्न केल्याने त्यांना किनवटच्या गोकुंदा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता,उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना दि.१० ऑक्टोबर रोजी घडल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. मागील काही वर्षांपासून मराठवाड्यात शेतकरी आत्महत्यांचे सत्र सुरू आहे. नापिकी, कधी कोरडा दुष्काळ तर कधी अतिवृष्टी व पूरामुळे होणारे नुकसान यामुळे ओढवलेला कर्जबाजारीपणा आदी कारणांमुळे शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. त्यातच यंदा पावसामुळे मराठवाड्यात धुमाकूळ घातला आहे.विशेषतः सप्टेंबर महिन्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली. हाताशी आलेली खरिपाची लाखो हेक्टरवरील पिके वाया गेल्यामुळे शेतकरी आणखीनच संकटात सापडला आहे.अशातच माहूर तालुक्यातील मौजा पाचुंदा येथील गौतम पाटील हे अल्पभूधारक शेतकरी आता कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवावा, कौटुंबिक जबाबदाऱ्या कशा पार पाडाव्यात या विचारात ताणतणावाने चिंताग्रस्त होते. दि.१० रोजी सकाळी १० ते ११ वा.च्यादरम्यान पाचुंदा येथील राहते घरी त्यांनी विष प्राशन केले. ही घटना नातेवाईकाना कळताच त्यांना किनवट येथील उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला.त्यांचे पश्चात पत्नी दोन मुले असा परिवार असून,मृतकाचा मुलगा वैदिक गौतम पाटील याने किनवटच्या पोलीस ठाण्यास घटनेची माहिती कळविली. या आत्महत्येच्या दुर्दैवी घटनेतील मयत गौतम पाटील या अल्पभूधारक शेतकऱ्याने अतिपावसामुळे शेतपिकांचे प्रचंड नुकसान झाल्याने आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलले असून, संपूर्ण नांदेड जिल्ह्यात माहूर तालुक्यात सर्वाधिक अतिवृष्टी होऊन तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाल्याने आणखी आत्महत्या होण्याची वाट न पाहता सध्या अतिवृष्टीने नुकसान होऊन पुरता कोलमडून पडलेल्या शेतकऱ्यांच्या या बिकट परिस्थितीत सरकारने शेतकऱ्यांना वैयक्तिक स्वरूपाची मदत करुन सरसकट कर्जमाफी देऊन या घटनेतील मयत शेतकऱ्याच्या वारसांना तात्काळ शासकीय मदत उभी करून द्यावी,अशी मागणी मयताच्या कुटुंबियासह तालुक्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांमधून होत आहे.

## क्रीडा स्पर्धेत श्री संत निवृत्ती महाराज विद्यालयच्या विद्यार्थ्यांचा दबदबा



**कंधार-**क्रिडा व युवक संचनालय पुणे व जिल्हा क्रीडा अधिकारी नांदेड यांच्या विद्यमाने कंधार तालुका स्तरीय शालेय १४,१७,१९ वयोगटातील विद्यार्थ्यांची मैदानी क्रीडा स्पर्धा दिनांक ७ ऑक्टोबर रोजी श्री सिद्धी विनायक मिल्ट्री कॅम्प कंधार येथे आयोजीत करण्यात आल्या होत्या. या शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत कंधार येथील श्री संत निवृत्ती महाराज विद्यालयाच्या विद्यार्थ्यांने दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मैदानी स्पर्धेत आपला दबदबा कायम ठेवला आहे. त्यामध्ये १४ वर्षाखालील मुलामध्ये ८० मी.हार्डल्स मध्ये मारोती गित्ते या विद्यार्थीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला तर रुद्रा गोरखवाड या विद्यार्थ्यांने द्वितीय क्रमांक पटकावला. उंच उडी मध्ये ओम वारकड या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला तर नारायण वाघमारे या विद्यार्थिनीने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला. तसेच २०० मी. धावणे मध्ये ओम वारकड या विद्यार्थ्यांने तालुक्यातून तिसरा क्रमांक पटकावला. १४ वर्षाखालील मुली ८०मी. हार्डल्स मध्ये विठाबाई गित्ते या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला तर सपना डोईवाड या विद्यार्थिनीने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला. उंच उडी मध्ये लक्ष्मी डुबुकवाड या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला तर साक्षी बारोळे या विद्यार्थिनीने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला, १७ वर्षाखालील मुले , ११० मी. हार्डल्स मध्ये सतीश कळकेकर या विद्यार्थ्यांने तालुक्यातून प्रथम पटकावला तर नरसिंग बटलवाड या विद्यार्थ्यांने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला., ४००मी. हार्डल्स मध्ये दत्ता बामनवाड या विद्यार्थ्याने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला., १७ वर्षाखालील मुली, १०० मी. हार्डल्स मध्ये अंजली बामनवाड या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला तर दुर्गा वाघमारे या विद्यार्थिनीने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला. उंच उडी मध्ये विश्रांती गोरखवाड या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला तर श्रध्दा दहिफळे या विद्यार्थिनीने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला ३ कि . मी. चालणे मध्ये नेहा तेलंगे या विद्यार्थिनीने तालुक्यातून द्वितीय क्रमांक पटकावला. ४०० मी. हार्डल्स मध्ये वैष्णवी केंद्रे या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. ३००० मी. धावने मध्ये कार्तिकी कौशले या विद्यार्थिनीने तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. या सर्व विद्यार्थ्यांची जिल्हा स्तरावर निवड झालेली आहे. या सर्व यशस्वी खेळाडूंना बहुमोल असे मार्गदर्शन शाळेचे क्रीडा शिक्षक नवनाथ तोरणे यांचे लाभले. या यशाबद्दल संस्थेचे सचिव बाबुराव पाटील गिरे,मुख्याध्यापक बाबुराव पाटील शिंदे, गोटमवाड डी के, शिंदे जे बी, जोगपेठे एस डी, सौ. कविता आवटे , हणमंते ए व्हि, कल्याणकर एन व्ही, कदम जे डी, गिरे जी एस, शालेय समितीचे सदस्य बालाजी देवकांबळे, बरुरे एम बी यासह सर्व कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. सदरील विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पर्यावरण रक्षणासाठी माध्यमिक आश्रम शाळेचा हिरवा संकल्प

**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. ११ ऑक्टोबर-**

निसर्गातील बदलत्या ऋतूमानामुळे सध्या पर्यावरणाच्या संवर्धनाची गरज अधिकच जाणवू लागली आहे. याच पार्श्वभूमीवर नायगांव तालुक्या तील बालक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित माध्यमिक आश्रम शाळेत 'हरित व स्वच्छ विद्यालय एक पेड मा के नाम' या संकल्पनेतून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शुक्रवार, दि. १० ऑक्टोबर रोजी सकाळी झालेल्या या कार्यक्रमाचे नेतृत्व शाळेचे प्राचार्य विजयकुमार देशमुख यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली शाळे च्या भव्य प्रांगणात करंजी, लिंब या वृक्षा सारख्या अनेक औषधी गुणधर्म असलेल्या विविध वृक्षांची लागवड करण्यात आली. या उपक्रमा वेळी पिक शास्त्राचे प्राध्यापक पांडुरंग येवले, माध्यमिक आश्रम शाळेचे शिक्षक,आनंदराव सूर्यवंशी, दिपक बि-हाडे, देविदास किशन राठोड,यांच्यासह अनेक मान्यवरांनी सहभाग घेतला. यावेळी शाळेतील चतुर्थ कर्मचारी उत्तम राठोड,विद्यार्थी साईनाथ पवार सह, अनेक विद्यार्थी आणि शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्राचार्य देशमुख यांनी आपल्या संकल्पनेतून एक आदर्श प्रस्थापित केला असून, शाळेच्या विकासात पर्यावरण पूरक विचारांची ही भर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासास निश्चितच उपयुक्त ठरणार आहे.

# माजी आ. मोहन हंबर्डे यांच्या लक्षवेधीमुळे अनेक जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत शिक्षक नियुक्त

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. ११ ऑक्टोबर-**

माजी आमदार मोहनराव हंबर्डे यांनी केलेल्या लक्षवेधीमुळे शेकडो जिल्हा परिषद शाळांच्या संच मान्यतेत दुरुस्ती होऊन शिक्षक अनेक माध्यमिक विद्यालयात शिक्षकांच्यी नियुक्ती करण्यात आल्याने शिक्षकांचा प्रश्न सुटला.

शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ प्रमाणे जिल्हा परिषद शाळांच्या संच मान्यता आणि शिक्षकांची मंजुरी होत असते परंतु गेल्या अनेक वर्षापासून विशेष करून मराठवाड्यातील जिल्हा परिषद शाळांच्या संच मान्यतेत विद्यार्थी संख्या व वर्ग तुकड्यानुसार शाळांच्या संचमान्यता व्यवस्थित



होत नव्हत्या आणि यामुळे विद्यार्थ्याप्रमाणे शिक्षक उपलब्ध होत नव्हते, जिल्हाभरातील शाळांच्या संच मान्यता दुरुस्तीचे अधिकार शिक्षण संचालक आणि शालेय शिक्षण विभागाला असल्याकारणाने जिल्हा परिषदेच्या शिक्षणाधिकारी सुद्धा हतबल झाले होते,हे प्रश्न आमदार मोहनराव हंबर्डे यांच्याकडे काय शिक्षण तज्ञांनी मांडल्यानंतर, मोहनरावजी हंबर्डे यांनी २०२३ मध्ये विधानसभेत लक्षवेधी प्रश्न उपस्थित करून आणि चर्चा करून शासनाचे लक्ष या विषयाकडे वेधले होते, जिल्हा परिषद हायस्कूल विष्णूपुरी, ही लातूर विभागात मुख्यमंत्री माजी शाळा सुंदर शाळा या उपक्रमामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम आलेली शाळा असून या शाळेत ३१ तुकड्या असून शिक्षक संख्या २७ होती, परंतु माननीय आमदार प्रयत्नामुळे आज या शाळेच्या संच मान्यतेत दुरुस्ती होऊन ४२ शिक्षक मान्य झालेले आहेत.आमदार मोहन रावजी हंबर्डे यांच्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्यामध्ये नेहमीच मोलाचा वाटा असतो. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजू हंबर्डे,विश्वनाथरावजी हंबर्डे, राजेजी हंबर्डे, बाबुरावजी हंबर्डे नारायण हंबर्डे, हरीश हंबर्डे व शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सन्माननीय सदस्य तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका उज्वलाताई जाधव उदय हंबर्डे, एमए खदीर, मारुती काकडे,शिवाजी वेदपाठक,संतोष देशमुख,आनंद वळगे, व इतर शाळेतील शिक्षकांनी माजी आ.मोहनरावजी हंबर्डे यांच्या सत्कार करून त्यांचे विशेष आभार व्यक्त केले, याप्रसंगी हंबर्डे यांनी सदैव शैक्षणिक आणि सामाजिक कार्यामध्ये मी कदापी मागे राहणार नाही २४ तास जनतेच्या सेवेसाठी मी उपलब्ध आहे आणि भविष्यात सुद्धा जनतेच्या कल्याणकारी कामे करतच राहील अशा शब्दात भावना व्यक्त केल्या आहेत.

# उद्यान अधिक्षक मिर्झा फरहतउल्ला बेग यांच्याकडील अतिरीक्त कार्यभार काढण्याची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ११ ऑक्टोबर-**

मनपाचे मुख्य उद्यान अधिक्षक मिर्झा फरहतउल्ला बेग मिर्झा नजीर बेग यांच्याकडे असलेला अतिरिक्त कार्यभार त्वरीत काढून घेण्यात यावा अशी मागणी ॲड. प्रमोद नरवाडे यांनी एका निवेदनाद्वारे मनपा आयुक्तांकडे केली आहे.

नांदेड वाघाळा शहर महागनरपालीका नांदेडच्या आस्थापनेवर नव्याने पदोन्नती मिळालेले मुख्य उद्यान अधिक्षक म्हणून कार्यरत असलेले मिर्झा फरहतउल्ला बेग हे त्यांच्या मुळ पदस्थापनेवर असतांना सुद्धा त्यांच्याकडे अशोक नगर झोन क्र.२ चा सहाय्यक आयुक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार होता. त्यावेळेस त्यांनी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला असून सर्व सामान्य नागरिकांना त्रास दिलेला आहे. त्यानंतर त्यांना आयुक्तांनी शासनाला शिफारस करुन मुख्य उद्यान अधिक्षक केले. त्यामुळे त्यांच्याकडे मोठी जबाबदारी आली आहे. मुख्य उद्यान अधिक्षक असल्यामुळे सर्व शहरातील उद्यानाची देखभाल, त्यांचा विकास, रस्त्याच्या लगत लावण्यात आलेली झाडे, दुभाजकामध्ये लावण्यात आलेली झाडे आणि नांदेड शहरातील असलेले उद्याने व इतर बाबींचा मोठ्या कामाचा तान त्यांच्यावर आहे. त्यांच्याकडे मुख्य उद्यान अधिक्षक पदाचा कार्यभार असतांना त्यांना इतर अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे उद्यानासंबंधी काम करणे त्यांना शक्य होत असल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येत आहे. नागरिकांच्या समस्यांना वेळ देता येत नाही. त्यामुळे उद्याने ओस पडल्याचे निर्दशनास येत आहे. आणि विशेष म्हणजे आयुक्त यांना मिर्झा फरहतउल्ला बेग यांनी अतिरिक्त कारभार देण्याची विनंती केली असल्यास त्यासंबंधीचे पत्र दाखवावे तसेच आयुक्तांनी अतिरिक्त कार्यभार दिल्याचे शासकिय पत्र दाखविण्यात यावे अशी मागणी निवेदनात केली आहे.

मिर्झा फरहतउल्ला बेग यांना अतिरिक्त कार्यभार दिल्यामुळे शहराचे शान असलेले उद्याने त्यांच्याकडे वेळ देता येता नसल्यामुळे त्या उद्यानामध्ये जेष्ठ नागरिक यांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत असुन नांदेड शहरामध्ये आगोदरच कमी प्रमाणात असलेल्या उद्यांनाची व्यथा जेष्ठ नागरिक मांडत आहेत.

मुख्य उद्यान अधिक्षक मिर्झा फरहतउल्ला बेग मिर्झा नजीर बेग यांच्याकडील जे-जे अतिरिक्त कार्यभार आहेत ते त्वरीत काढुन घेण्यात यावे अन्यथा उपोषणे, आंदोलने, करावी लागतील त्यावरही आपण न्याय दिला नाही तर उच्च न्यायालयात दाद मागावी लागेल असा इशारा ॲड. प्रमोद नरवाडे यांनी दिला आहे.

# रिसनगावचे सरपंच प्रकाश पवार यांच्यासह अनेकांचा राष्ट्रवादीमध्ये प्रवेश

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. ११ ऑक्टोबर-**

लोहा -कंधार मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत रिसनगावचे सरपंच प्रकाश पवार यांच्यासह रिसनगाव येथील अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत जाहीर प्रवेश केला आहे.

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेकजण आपापल्या सोयीनुसार विविध राजकीय पक्षात प्रवेश करीत आहेत. यात रिसनगावचे सरपंच प्रकाश पवार यांच्यासह सुनील पवार, बळीराम पवार, विठ्ठल पवार, गणेश पवार, शत्रुघ्न पवार, बालाजी पवार, भीमराव मोकले, धोंडीबा पवार, माधव पवार, विठ्ठल पवार, हनमंत पवार, विकास पवार, वैजनाथ जाधव, भागवत पवार, दिपक पवार, देविदास पवार, ज्ञानोबा पवार, माधव माणिकराव पवार, शिवाजी पवार, अमोल तिगोटे, बाबुराव नाईक यांच्यासह अनेकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.या सर्वांचा आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची दस्ती टाकुन सत्कार केला व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. तसेच या प्रवेश केलेल्या सर्वांनी आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा शाल, पुष्पहार घालून सत्कार केला.

# धोबी समाजाला मागासवर्गीय प्रवर्गात समाविष्ट करा; डेबूजी फोर्सची मागणी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. ११ ऑक्टोबर-**



देशातील १५ राज्य व दोन केंद्रशासित प्रदेशात मागासवर्गीय प्रवर्गात असलेल्या धोबी समाजाला महाराष्ट्रातही मागासवर्गीय प्रवर्गात समावेश करावा या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य डेबूजी फोर्सच्या वतीने बिलोली तहसीलदार गजानन शिंदे यांना डेबुजी फोर्स प्रदेशाध्यक्ष कैलास तेलंग टेभुर्णीकर यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

राज्यातील महायुती सरकार धोबी समाजाला न्याय देत नसेल तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा कैलास तेलंग यांनी सरकारला दिला आहे. या वेळी शंकर नाना राखे, बालाजी इप्तेवार, गणेश हुसेपोड, दिगाबंर बिलोलीकर, सामंत हरणे, अरविंद पवनकर, बालाजी हरणे सह अनेक समाज बांधव उपस्थित होते.

# नगराध्यक्ष पदासाठी इच्छुकांच्या गर्दीत कोणाची लागणार वर्णी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. ११ ऑक्टोबर-**




दि. ६ ऑक्टोबर रोजी मुंबई येथील मंत्रालयात नगराध्यक्षपदाचे आरक्षण सोडतीमध्ये मुदखेडचे नगराध्यक्षपद सर्वसाधारण महिला जाहीर होताच अनेक दिवसांपासून तयारी करीत असलेल्या इच्छुकांची संख्या मात्र भरपुर वाढली आहे.

यामध्ये सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाकडून सौ. विश्रांती माधव कदम, सौ.ज्योती रामसिंग चव्हाण,सौ. अर्चना शंकर राठी,सौ.ज्योती संदिप चव्हाण,सौ.निर्गुणा संजय आऊलवार,सौ.ज्योती गंगाधर डांगे, सौ. स्मिता विनोद चंद्रे, माजी नगराध्यक्ष नारायण कोत्तावार यांच्या धाकट्या सुन सौ.रत्ना श्रीरंग कोत्तावार,यांच्यासह अनेक इच्छूकांची संख्या वाढली आहे.

सध्यातरी काँग्रेस पक्षाकडुन इच्छूकांची संख्या कमी असली तरी या दोन नावाची चर्चा मात्र शहरात समोर येत आहे. यामध्ये सौ.शिलाबाई राजबहादूर कोत्तावार, नाजेमा खातून बंदेअलीखान पठाण, शिवसेना (उबाठा) गटाकडून सौ.कल्याणी अविनाश झमकडे, तर शिवसेना एकनाथ शिंदे गटाकडून भाग्यरताबाई शिवाजी माने पाटील, यांच्यासह अनेकजन निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक आहेत.

नगर पालिका निवडणुकीची प्रक्रिया आता लवकरच सुरू होणार असून, शहरात आतापासुनच राजकीय वातावरण तापले आहे. सर्वसाधारण महिला आरक्षणामुळे आता या इच्छुकांमधून कोणाची वर्णी लागणार आहे याकडे सर्व शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# भोकर नगरपालीकेच्या निवडणूकीत भरणार रंग; नगराध्यक्ष पदासाठी अनेकजण ईच्छूक

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. ११ ऑक्टोबर-**

नगराध्यक्ष पदासाठी आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली असुन नगराध्यक्ष हे सर्वसाधारण पुरुषांसाठी आरक्षित केल्याने अनेक उमेदवार आतापासून गूडघ्याला बाशिंग बांधून तयार असल्याने निवडणूकित रंग भरणार आहे. नगराध्यक्ष पद थेट जनतेतुन असल्याने मोठी उत्सूकता वाढली असून भोकरची जनता कोणत्या उमेदवाराला पसंती देतील हे येणारा काळ ठरवेल भोकर शहराचा मोठ्या प्रमाणात विकासाची कामे झाली व अनेक विकासात्मक कामे चालू आहेत नगर परिषद अस्तित्वात आल्या पासुन येथे माजी मूख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांचे वर्चस्व राहिले आहे कोरोना मूळे नगरपरिषदेची निवडणूक रखडली प्रदिर्घ कालावधीनंतर निवडणूक होण्याच्या हालचाली सूरु झाल्या नुकतेच नगर परिषदच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण जाहीर केले आहे. त्यानंतर प्रभागनिहाय सदस्याचे आरक्षण काढण्यात आले खूल्या प्रवर्गासाठी नगराध्यक्ष पद सूटल्याने अनेकांच्या भूवया उंचावल्या ओबिसी प्रवर्गासाठी नगराध्यक्ष सूटण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती पण खूल्या प्रवर्गासाठी पद सूटल्याने ओबिसी प्रवर्गात नाराजीचा सूर आहे नगराध्यक्ष थेट जनतेतुन निवडुण येणार असल्याने अनेकजण निवडणूक लढवण्याची भाषा करत आहेत नगर पालिका आपल्या ताब्यात ठेवण्यासाठी सर्वच राजकिय पक्ष प्रयत्नांची पराकाष्ठा करतील भाजप कडुन विनोद पा.चिंचाळकर, भगवान दंडवे, बाळा साखळकर, खन्ना पाटील,युसुफ शेख, राष्ट्रवादी काँग्रेसकडुन राजेश्वर कदम, नागनाथ घिसेवाड, इंजी. विश्वभंर पवार, जवाद्दीन बरबडेकर, शिवसेना शिंदे कडुन माधव पा.वडगावकर, प्रदिप पाटील दौलतदार, अमोल पवार तर काँग्रेस पक्षाकडून सुभाष पा. किन्हाळकर, युवा नेते संदिपगौड पाटील आदि ईच्छूक आहेत.

# काँग्रेसकडून नगराध्यक्ष पदासाठी प्रणिता सूर्यवंशी यांच्या नावाची चाचपणी

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. ११ ऑक्टोबर-**

हदगाव पालिकेच्या नगराध्यक्ष पदाचे आरक्षण सर्वसाधारण महिलेसाठी आरक्षित झाले असल्याने सर्वच पक्षाकडून अध्यक्ष पदासाठी सक्षम महिलेच्या नावाची चाचपणी केली जात असली तरीही काँग्रेसकडून मात्र प्रणिता अजय सूर्यवंशी या नावाची चर्चा होताना दिसून येत आहे.

प्रणिता अजय सूर्यवंशी ह्या माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांचे खाजगी सचिव अजय सूर्यवंशी यांच्या पत्नी असून त्यांना राजकारणाचा मोठा अभ्यास आहे. मागील पाच वर्षात माजी आ. जवळगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरासह मतदारसंघात मोठा निधी खेचून आणण्यासाठी त्यांचे विशेष परिश्रम राहिले हे सर्वश्रुत आहे.



अजय सूर्यवंशी यांचा जनसंपर्क मोठा असून सर्वच धर्मीयांमध्ये त्यांचा वावर आहे. ते सर्वांच्या सुखदुःखात धावून जातात हीच बाब लक्षात घेऊन त्यांच्या पत्नी प्रणिता अजय सूर्यवंशी यांना नगराध्यक्ष पदाची उमेदवारी देण्याकरिता काँग्रेसच्या गटात हालचाली सुरू असल्याचेही दिसून येत आहे.

मागील काळात अनेक वर्ष पत्रकारितेच्या माध्यमातून शहरातील अनेकांना न्याय देण्याचे काम अजय सूर्यवंशी यांच्या माध्यमातून झाल्याचे सर्वश्रुत आहे. त्याचबरोबर शहरातील व्यापारी बांधवांसोबत सलोख्याचे संबंध असून व्यापारी बांधवांचे एक शिष्टमंडळ अजय सूर्यवंशी यांच्या पत्नीच्या उमेदवारीसाठी माजी आ. माधवराव पाटील जवळगावकर यांची भेट घेणार असल्याचेही बोलल्या जात आहे.

**राजकीय व प्रशासकीय अनुभवाचा होणार शहराच्या विकासाकरिता फायदा**

अजय सूर्यवंशी यांच्या पत्नी प्रणिता सूर्यवंशी यांना लोकनेते माधवराव पाटील जवळगावकर यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस पक्षाने उमेदवारी दिल्यास अजय सूर्यवंशी यांचा प्रशासकीय कामांचा अनुभव त्याचबरोबर राजकीय क्षेत्रातील अनुभव पाहता शहराच्या विकास कामाकरिता शासन स्तरावरून निधी खेचून आणण्याच्या बाबतीत त्यांचा मोठा हातखंडा असल्याने शहराच्या विकास कामात मोठी भर होईल हे डोळ्यासमोर ठेवून अजय सूर्यवंशी यांचे नाव समोर येताच अनेकांनी लोकनेते माधवराव पाटील जवळगावकर यांच्याकडे अजय सूर्यवंशी यांच्या पत्नीच्या उमेदवारीच्या बाबत हेच उमेदवार योग्य व सक्षम राहतील याबाबत आग्रह धरणार असल्याचेही या निमित्ताने बोलले जात आहे.